इचलकरंजी ICHALKARANJI ▶ वर्ष - ४१ ▶ अंक - २१२ ▶शुक्रवार,ता.५ डिसेंबर २०२५ ▶ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### सोन्याच्या दरात मोठी घसरण

मुंबई,ता.४ –

लग्नसराईची धामधूम सुरु असतानाच सोने-चांदीच्या किंमतींत चढ उतार पाहायला मिळत आहे. जळगाव सराफ बाजारात बुधवारी सोने दरात नोंदविण्यात आली होती. मात्र आज गुरूवारी सकाळी बाजार उघडल्यावर सोन्याच्या दरात घट नोंदवली गेली. यामुळे लग्नाच्या खरेदीची तयारी करणाऱ्या ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. जळगाव सराफ बाजारात बुधवारी ११३३ रूपयांची वाढ नोंदवण्यात आल्याने सोने तीन टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ३२ हजार ५६१ रूपयांपर्यंत पोहोचले होते. गुरूवारी सकाळी बाजार उघडल्यावर पुन्हा ९२७ रूपयांची घट नोंदवली गेली. त्यामुळे सोने जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ३१ हजार ६३४ रूपयांपर्यंत खाली आले.दुसरीकडे चांदी दरात पुन्हा एकदा वाढ झाली.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

फंगल इन्फेक्शन
रामबाण आयुर्वेदीक औषध
३ दिवसात कमी
होण्याची हमी
- संपर्क -
रणजित हारगुले, अब्दुललाट
9730390355 / 9766692792

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# व्लादिमीर पुतिन यांचे नवी दिल्लीत जंगी स्वागत

## पंतप्रधान मोदींनी घेतली गळाभेट;एकाच गाडीतून रवाना



■ नवी दिल्ली,ता.४–

**रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर गुरुवारी सायंकाळी नवी दिल्लीत पोहोचले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पालम विमानतळावर त्यांचे स्वागत केले. पुतिन यांच्या सन्मानार्थ विमानतळावर संगीत आणि नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.**

स्वागत कार्यक्रमानंतर पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष पुतिन एकाच कारमध्ये बसून विमानतळावरून रवाना झाले. गेल्या तीन महिन्यांत ही दुसरी वेळ आहे जेव्हा मोदी आणि पुतिन एकाच कारमध्ये बसले आहेत.

कारमध्ये एकत्रित प्रवास करून ते पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे रवाना झाले. या उबदार स्वागताने आणि सामायिक प्रवासाने जगाला स्पष्ट संदेश मिळाला की भारत-रशिया संबंध खूप खोल, विश्वासार्ह आणि धोरणात्मक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत.

यूक्रेन युद्धानंतर ही पुतिन यांची पहिली भारत भेट आहे. अध्यक्ष पुतिन आज पंतप्रधान मोदींसोबत द्विपक्षीय चर्चेत सहभागी होतील. त्यानंतर ते पंतप्रधानांच्या निवासस्थानी आयोजित अनौपचारिक रात्रीच्या भोजनास उपस्थित राहतील. दुसऱ्या दिवशी म्हणजे ५ डिसेंबरला पुतिन यांचे राष्ट्रपती भवनात औपचारिक स्वागत केले जाईल. त्यानंतर ते राजघाट येथे जाऊन महात्मा गांधी यांना श्रद्धांजली अर्पण करतील. पुढे ते हैदराबाद हाऊस येथे द्विपक्षीय बैठक आणि प्रतिनिधीमंडळ पातळीवरील चर्चेत सहभागी होतील. या बैठकीत काही प्रमुख उद्योगपतीही सहभागी होण्याची शक्यता आहे. यानंतर पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष पुतिन भारत-रूस बिझनेस फोरममध्येही सहभागी होतील. त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निमंत्रणावरून पुतिन राष्ट्रपती भवनातील भोजसाठी उपस्थित राहतील.या कार्यक्रमांनंतर अध्यक्ष पुतिन मॉस्कोकडे परत प्रयाण करतील.

याआधी सप्टेंबरमध्ये शांघायीत पंतप्रधान मोदी आणि पुतिन एकाच कारमध्ये बसून शिखर संमेलनात सहभागी झाले होते, तेव्हा जागतिक कूटनीतीच्या सर्व औपचारिकता मागे ठेवण्यात आल्या होत्या. आज पुन्हा एकदा दोघे नेते एकाच कारमध्ये दिसले. मोदी आणि पुतिन यांच्या या भारत दौऱ्यावर संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिले आहे.

### शिखर परिषदेकडे जगाचे लक्ष

**शुक्रवारी होणाऱ्या शिखर परिषदेत द्विपक्षीय व्यापार वाढवणे, संरक्षण सहकार्याला अधिक बळकटी देणे, आणि महत्त्वाचे म्हणजे बाह्य दबावापासून द्विपक्षीय व्यापाराचे रक्षण करणे यावर भर दिला जाईल. भारताने रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल खरेदी केल्यामुळे निर्माण झालेल्या व्यापार तुटीचा मुद्दा यावेळी प्रकर्षाने उपस्थित होण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांनी २०२५ पर्यंत व्यापाराचा आकडा १०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या परिषदेत लहान मॉड्यूलर अणुभट्ट्यामधील संभाव्य सहकार्यासह १० आंतर-सरकारी दस्तावेज आणि १५ हून अधिक व्यावसायिक करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे.**

# नृसिंहवाडीत श्री दत्त जयंती सोहळा उत्साहात साजरा

## पहाटेपासूनच भक्तांची दर्शनासाठी अलोट गर्दी

■ नृसिंहवाडी,ता. ४ (वार्ताहर)–

**'दिगंबरा दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा अखंड दत्त नामाचा गजर करत अवघी नृसिंहवाडी दत्तमय झाली. लाखो भाविकांच्या उपस्थितीत गुरूवारी येथे दत्त जयंतीचा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

पहाटे तीन वाजल्यापासून थंडीची चिंता न करता अनेक दत्तभक्त चालत नृसिंहवाडीत दाखल होत होते. येणाऱ्या भक्तांच्या (पान २ वर)



नृसिंहवाडी : श्री दत्त जयंती निमित्त भाविकांनी दत्त दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती.

## मामा-भाच्यावर कोयत्याने हल्ला

■ मिरज,ता.४ (प्रतिनिधी)–

**मिरजेत मामा-भाच्यावर चाकू व कोयत्याने हल्ला करत चाकूने भोकसून व कोयत्याने वार करून दोघांना जखमी करण्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसात फिर्याद देण्यात आली असून मिरज शहर पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**

रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास कमानवेस येथे ही घटना घडली आहे. पोलिसांनी काही आरोपींना ताब्यात घेतले आहे.

परसराम बसाप्पा सत्यनावर (वय ५५, रा.कमान वेस, मिरज) यांनी पोलिसात (पान २ वर)

# वर्षात टोल बूथ संपतील

## -ना.गडकरी

■ नवी दिल्ली,ता.४–



**पुढील एका वर्षात महामार्गावरील सध्याची टोल वसुली प्रणाली बंद होईल. त्याऐवजी पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक, बॅरियर-लेस टोल प्रणाली लागू केली जाईल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत दिली.**

गडकरी म्हणाले की, नवीन प्रणालीची सुरुवात सध्या १० ठिकाणी करण्यात आली आहे आणि

### नवी बॅरियर-लेस प्रणाली येणार;दहा ठिकाणी प्रायोगिक प्रकल्प सुरू

एका वर्षाच्या आत ती संपूर्ण देशात लागू करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यांनी सांगितले की, सध्या देशभरात सुमारे ४,५०० महामार्ग प्रकल्प सुरू आहेत, ज्यांची एकूण किंमत अंदाजे १० लाख कोटी रुपये आहे. आधी टोल प्लाझावर गाड्यांना थांबून रोख किंवा कार्डने पैसे भरावे लागत होते, नंतर आल्याने थांबण्याचा वेळ कमी झाला, आता पुढील पाऊल बॅरियर-लेस म्हणजेच बॅरियर नसलेल्या हायटेक टोलच्या दिशेने आहे.नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने नॅशनल इलेक्ट्रॉनिक टोल (पान २ वर)



### देशात यंदा साखरेचे विक्रमी उत्पादन होणार

■ पुणे,ता.४–

**राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने वर्तविलेल्या अंदाजानुसार चालू साखर हंगाम साखर उत्पादनाच्या आणि साखर उताऱ्याच्या दृष्टीने 'गोड' ठरणार आहे.**

देशात गत हंगामापेक्षा ५३ लाख टन जादा म्हणजेच ३१५ लाख टन साखर निर्मिती होणार आहे.अतिरिक्त साखर गोदामात पडून राहू नये यासाठी एकूण १० लाख (पान १ वरून)

## १८ कोटी रुपयांचे ड्रग्ज बंगळूरू पोलिसांकडून जप्त

■ बंगळूरू,ता.४(प्रतिनिधी)–

**नवीन वर्षाच्या पार्टीसाठी येणाऱ्यांना लक्ष्य करून बनवण्यात आलेले १८ कोटी रुपयांचे ड्रग्ज बेंगळुरू पोलिसांनी जप्त केले आहेत.**

हायड्रो गांजा, नियमित गांजा आणि एमडीएमएसह एकूण १८.७५ कोटी रुपयांचे विविध ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. (पान २ वर)



# बीएलओंवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी नेमा

## सुप्रीम कोर्टाचे राज्यांना निर्देश

■ नवी दिल्ली,ता.४–



**बारा राज्यांमध्ये सुरू असलेल्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेमुळे बूथ-स्तरीय अधिकाऱ्यांवर (बीएलओ) प्रचंड दबाव आला आहे.या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाने आता राज्य सरकारांना निर्देश जारी केले आहेत.**

बीएलओंचे कामाचे तास कमी करण्यासाठी राज्य सरकारांनी अतिरिक्त कर्मचारी तैनात करावेत असे न्यायालयाने निर्देश दिले आहेत. (पान २ वर)

### एसआयआर काय आहे?

**ही निवडणूक आयोगाची एक प्रक्रिया आहे. यात मतदार यादी अद्ययावत केली जाते. यात १८ वर्षांवरील नवीन मतदारांची नावे जोडली जातात. ज्या लोकांचा मृत्यू झाला आहे, जे स्थलांतरित झाले आहेत त्यांची नावे वगळली जातात. मतदार यादीतील नाव, पत्त्यातील चुकाही दुरुस्त केल्या जातात. बीएलओ घरोघरी जाऊन स्वत: फॉर्म भरून घेतात.**

# अजमेर दर्ग्यास बॉम्बने उडवण्याची धमकी

■ नवी दिल्ली,ता.४–



**अजमेर दर्ग्यात आणि जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी दुपारी बॉम्ब लावल्याची धमकी देणारा मेल जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर प्राप्त झाल्याने एकच खळबळ उडाली.**

या मेलमध्ये असा दावा करण्यात आला होता की अजमेर जिल्हाधिकारी कार्यालय आणि गरीब नवाज दर्ग्यात ४ आरडीएक्स आयईडी ठेवण्यात आले आहेत, जे पुतिन येथे येताच स्फोट करतील. मेल समोर येताच जिल्हा प्रशासन, अजमेर पोलिस, बॉम्ब डिस्पोजल पथक आणि गुप्तचर यंत्रणा तात्काळ सक्रिय झाल्या आणि शहरात हाय अलर्ट जाहीर करण्यात आला. या घटनेची सूचना मिळताच (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १२७९०० रु. | १७८५०० रु. |

अंडी ७१५ रुपये शेकडा

### हास्यतुषार




# कोल्हापूरमधील रस्ते दर्जेदार करा

## नियमानुसारच काम होवू द्या;कोल्हापूर उच्च न्यायालय

■ कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)–

**कोल्हापूरमधील सजग व सामाजिक जाणीव असलेल्या लोकांनी रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेमुळे प्रशासनाने कोल्हापुरातील रस्त्यांची कामे सुरू केलेली आहेत. याबाबत कौतुक करून, प्रशासनाने रस्ते दुरुस्त करण्यासाठी सकारात्मक पाऊले उचलायला सुरुवात केली आहे, असा उल्लेख आज कोल्हापूर उच्च न्यायालयातील न्या.मकरंद कर्णिक आणि न्या. अजित कडेठाणकर यांनी सुनावणी दरम्यान केला.**

कोल्हापूर शहरातील रस्ते गेली अनेक वर्षे खराब होत चाललेले आहेत, परंतु रस्त्यांच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष केले जातेय, असा आरोप करणारी याचिका उदय नारकर, डॉ. रसिया पडळकर, डॉ. अनिल माने, भारती पोवार, अॅड. सुनीता जाधव, डॉ.तेजस्विनी देसाई यांनी अॅड. असीम सरोदे व सहकारी वकील अॅड. श्रीया आवले, अॅड. योगेश सावंत आणि अॅड. सिद्धी दिवाण यांच्या मार्फत दाखल केलेली आहे.




कोल्हापूरमधील रस्ते पावसामुळे खराब झाल्याचे कारण प्रशासनातर्फे देण्यात येते, हा बेजबाबदारपणा आहे व रस्त्यांची अवस्था अत्यंत गंभीर आहे, असे याचिकाकर्ते उदय नारकर म्हणाले. सध्या अत्यंत अशास्त्रीय पद्धतीने केली जाणारी कोल्हापूर शहरातील रस्त्यांची डागडुजी आक्षेपार्ह असल्याचे सांगण्याचा प्रयत्न आजच्या सुनावणी दरम्यान अॅड.असीम सरोदे यांनी केला; परंतु रस्ते दुरुस्तीचे कामकाज एक-एक पायरी नीट ठरवून होऊ द्या व आपण सविस्तर विचार नंतर करू, असे न्या. मकरंद कर्णिक म्हणाले.

कोठेही, कशाही पद्धतीने रस्ते उकरायला दिली जाणारी परवानगी आणि विविध युटिलिटीच्या कामांसाठी उकरलेले रस्ते यामुळे कोल्हापूर शहर हे एखाद्या (पान २ वर)

# कर्जबुडव्या साखर कारखान्यांवर बडगा

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटील;अनेकांवर आरआरसी जारी

■ कराड,ता.४(प्रतिनिधी)–

**राज्यातील कर्जबुडव्या सहकारी साखर कारखान्यांवर सरकारने कारवाईची गती वाढवली असून, मोठ्या प्रमाणातील अनुत्पादक कर्जे घेतलेल्या आणि एफआरपी न दिलेल्या अनेक कारखान्यांवर आरआरसी (जमाक्रिया प्रक्रिया) काढण्यात आल्याची माहिती सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. अजूनही अशा कारखान्यांची नावे असतील तर द्या, त्यांच्यावरही निश्चित कारवाई करू, असा ठाम इशारा त्यांनी दिला.**

येथील यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी अभिवादन केल्यानंतर माध्यमांशी ते संवाद साधत होते. यावेळी आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादीचे नेते उदयसिंह पाटील-उंडाळकर, राजेश पाटील - वाठारकर, प्रा. शरद काटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्यातील काही सहकारी साखर कारखाने भरमसाठ कर्ज उचलतात, ढिसाळ व्यवस्थापनामुळे कारखाने डबघाईला येऊन कर्ज बुडवतात, यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होते. अशा कारखान्यांवर काय कारवाई करणार आहात? या प्रश्नावर बोलताना त्यांनी अशा कारखान्यांची नावे द्यावीत, त्यांच्यावर नक्कीच कारवाई करू. या संदर्भातील आमच्याकडे नावे आलेल्या कारखान्यांवर आम्ही कारवाई करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संस्थांच्या लेखापरीक्षणात 'अ वर्ग' शेरा असतानाही गैरव्यवहार उघड होत असल्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले, लेखा परीक्षकांना जबाबदार धरण्याचा कायदा करण्याचे काम सुरू आहे. नागरिकांकडूनही सूचना मागविल्या असून, नवीन कायदा मजबूत आणि कडक असेल, असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत (पान २ वर)

(पान १ वरून)

## विक्रमी उत्पादन होणार

टन अतिरिक्त (एकूण २५ लाख टन) साखर निर्यातीस परवानगी द्यावी, अशी मागणी 'एनएफसीएसएफ'ने केंद्र सरकारकडे केली आहे. तसेच एमएसपी (किमान साखर दर) वाढेल, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने (एनएफसीएसएफ) देशाचे साखर उत्पादनाचे अंदाज जाहीर केले.मागील हंगामात २६१ लाख टन साखर निर्मिती झाली होती.चालू हंगामात ३५ लाख टन साखर इथेनॉल निर्मितीकडे वळविली जाईल.यानंतरही उत्पादन वीस टक्क्यांनी वाढून ३१५ लाख टनांवर पोचेल. सद्यःस्थितीत देशातील तेरा राज्यात आतापर्यंत ४२४ कारखाने सुरू झाले आहे. देशात ४१ लाख टन साखर निर्मिती झाली आहे.साखर उतारा आतापर्यंत गतहंगामापेक्षा (८.२९ टक्के) चांगला म्हणजेच ८.५२ टक्के इतका आहे.अनुकूल हवामानामुळे उत्तरप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्र या तिन्ही राज्यांचा उतारा वाढण्याचा 'ट्रेंड' दिसून येत आहे.

## अतिरीक्त कर्मचारी नेमा

राज्य सरकारांनी अतिरिक्त कर्मचारी तैनात करावेत जेणेकरून त्यानुसार कामाचे तास कमी करता येतील.जर एखाद्या कर्मचाऱ्याकडे कर्तव्यातून सूट मागण्याचे विशिष्ट कारण असेल तर संबंधित अधिकारी केस-बाय-केस आधारावर या मुद्यावर विचार करू शकतात. जिथे १०,००० कर्मचारी असतील तिथे २०,००० किंवा ३०,००० कर्मचारी तैनात करता येतील.जर कोणी आजारी किंवा अशक्त असेल, तर राज्य बदली कर्मचारी तैनात करू शकते.याचा अर्थ असा नाही की,राज्ये निवडणूक आयोगासाठी आवश्यक कर्मचारी तैनात करण्यास बांधील आहेत.गरजेनुसार ही संख्या वाढवता येते.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की,हे एक वैधानिक कार्य असल्याने, राज्य सरकारांनी विद्यमान कर्मचाऱ्यांचे कामाचे तास आणि कामाचे तास प्रमाणानुसार कमी करण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी पुरवावेत.सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाविरुध्द याचिकाकर्त्यांचे आरोप स्वीकारण्यास नकार दिला.मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी टिप्पणी केली की, बीएलओ हे राज्य सरकारी कर्मचारी आहेत. जर कोणी आजारी किंवा अशक्त असेल तर राज्य त्यांच्या जागी बदली करू शकते. याचिकाकर्त्याने म्हटले आहे की, एसआयआर आयोजित केलेल्या नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधून डेटा प्रदान करण्यात आला आहे.प्रत्येक राज्यात, अशी कुटुंबे आहेत ज्यांची मुले अनाथ झाली आहेत आणि पालक वेगळे झाले आहेत कारण निवडणूक आयोग बीएलओंना कलम ३२ नोटीसा पाठवत आहे. निवडणूक आयोगाने याचिका पूर्णपणे खोटी आणि निराधार असल्याचे म्हटले आहे आणि ती फेटाळून लावावी असे म्हटले आहे.

सध्या अंदमान-निकोबार, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर प्रक्रिया सुरू आहे.

## बॉम्बने उडविण्याची धमकी

सर्वप्रथम दर्गाह शरीफ परिसर तात्काळ रिकामा करण्यात आला. दुपारी सुमारे १ वाजल्यापासून यात्रेकरूंना प्रवेश बंद करण्यात आला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी दर्गाहच्या प्रत्येक भागाची नाकेबंदी करून मेटल डिटेक्टर, डॉग स्क्वॉड आणि बॉम्ब निष्क्रिय पथकाच्या मदतीने सखोल तपासणी सुरू केली. जवळपास अडीज तास चाललेल्या शोध मोहिमेत दर्गाहचा कोना-कोना तपासण्यात आला, परंतु कोणताही बॉम्ब किंवा संशयास्पद वस्तू आढळली नाही.अंजुमन सैयद जादगानचे सचिव सैयद सरवर चिश्ती यांनी सांगितले की, दर्गाह सीओ लक्ष्मण राम यांना धमकीबाबत कळताच अंजुमनच्यावतीनेही परिसर रिकामा करण्यास आणि यात्रेकरूंना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यास पूर्ण सहकार्य करण्यात आले. त्यांनी सांगितले की आगामी उर्स लक्षात घेता सुरक्षा आधीच कडक करण्यात आली आहे आणि या घटनेनंतर सुरक्षेत आणखी कडकपणा आणण्यात आला आहे.जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातही पोलिसांनी तातडीने मोर्चा सांभाळला. सर्व कर्मचारी आणि नागरिकांना बाहेर काढण्यात आले आणि कार्यालयाचा प्रत्येक भाग तपासण्यात आला. जवळपास एक तास चाललेल्या तपासणीत येथेही कोणतीही संशयास्पद सामग्री सापडली नाही. या काळात संपूर्ण परिसर सील करण्यात आला होता. प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शांतता राखावी. दर्गाहमधील सुरक्षा निश्चित झाल्यानंतर संध्याकाळी यात्रेकरूंचा प्रवेश पुन्हा सुरू करण्यात आला.

## वर्षात टोल बूथ संपतील

कलेक्शन कार्यक्रम तयार केला आहे. हे संपूर्ण देशासाठी एकसमान आणि परस्परांशी जोडलेले इलेक्ट्रॉनिक टोल प्लॅटफॉर्म आहे. याचा उद्देश वेगवेगळ्या महामार्गांवरील वेगवेगळ्या प्रणालींची अडचण दूर करणे आणि एकाच तंत्रज्ञानाने सहजपणे टोल वसूल करणे हा आहे.

या प्रणालीचा मुख्य भाग आहे, जो रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन तंत्रज्ञानावर आधारित टॅग असतो आणि तो वाहनाच्या पुढील काचेवर (विंडस्क्रीन) चिकटवला जातो. वाहन टोल लेनमधून जाताच, सेन्सर हा टॅग वाचून वापरकर्त्याच्या लिंक केलेल्या बँक खात्यातून किंवा वॉलेटमधून टोल आपोआप कापून घेतात.

सरकार आता सोबत ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशनसारखे तंत्रज्ञान जोडून बॅरियर-लेस टोलिंग लागू करत आहे, जेणेकरून गाड्यांना टोलसाठी थांबावे लागणार नाही. कॅमेरे गाडीची नंबर प्लेट ओळखतात आणि रीडर टॅग वाचून टोलची रक्कम वसूल करतात, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया काही सेकंदात आपोआप पूर्ण होते.

या प्रणालीअंतर्गत टोल प्लाझावरील मोठे बॅरियर, लांबच लांब रांगा आणि रोख पैसे देण्याची सक्ती बऱ्याच अंशी संपुष्टात येईल. ज्या वाहनांजवळ वैध नसेल किंवा जे नियम मोडतील, त्यांना ई-नोटीस आणि दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते, जसे की निलंबित करणे किंवा डेटावर दंड आकारणे.

# मोदी दबावाखाली येणारे नेते नाहीत-पुतिन

■ नवी दिल्ली,ता.४-

**रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी भारत दौऱ्यावर येण्यापूर्वी अमेरिकेने भारतावर लादलेल्या टॅरिफबाबत मोठे विधान केले आहे.अमेरिका टॅरिफच्या माध्यमातून भारतावर दबाव टाकत आहे का? या प्रश्नाचे उत्तर देताना पुतिन म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दबावाखाली येणारे नेते नाहीत.**



एका मुलाखतीत पुतिन यांना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, दिल्लीत पंतप्रधान मोदींसोबत होणारी द्विपक्षीय चर्चा आणि भारत-रशिया संबंधांचे भवितव्य याबद्दलही विचारण्यात आले.यावर उत्तर देताना पुतिन यांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाची प्रशंसा करत म्हटले की,जगाने भारताचे अटल धोरण पाहिले आहे आणि देशाने आपल्या नेतृत्वाचा अभिमान बाळगायला हवा.

पुतिन यांनी हे ही सांगितले की,भारत आणि रशिया यांच्यातील ९० टक्क्यांहून अधिक द्विपक्षीय व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहेत. पुढे ते म्हणाले की,आपले मित्र पंतप्रधान मोदींना भेटण्यासाठी भारतात प्रवास करताना त्यांना खूप आनंद होत आहे. दोन्ही नेत्यांनी पुढील बैठक भारतात आयोजित करण्यावर सहमती दर्शविल्याचेही त्यांनी सांगितले. पुतिन म्हणाले की, चर्चेसाठी बऱ्याच गोष्टी आहेत,कारण भारत आणि रशियामधील सहकार्याचा व्याप अत्यंत व्यापक आहे. त्यांनी दोन देशांमधील विशिष्ट ऐतिहासिक नातेसंबंधांवरही प्रकाश टाकला.भारताने स्वातंत्र्यानंतर केलेल्या प्रगतीचे कौतुक करत पुतिन म्हणाले की,अवघ्या ७७ वर्षांच्या कालावधीत देशाने विलक्षण विकास साधला आहे.

पुतिन आतापर्यंत भारताच्या नऊवेळा दौऱ्यावर आले आहेत, ज्यापैकी तीन भेटी मोदी यांच्या कार्यकाळात (२०१६, २०१८ आणि २०२१) झाल्या. डिसेंबरमध्ये त्यांचा दहावा दौरा होणार आहे तर पंतप्रधान मोदी सात वेळा रशियाला भेट देऊन आले आहेत.

# अमेरिकेचे लढाऊ विमान एफ-१६ सरावावेळी कोसळले

■ वॉशिंग्टन,ता.४-

**अमेरिकेच्या वायुसेनेच्या एलिट थंडरबर्ड्स डेमोन्स्ट्रेशन स्क्वॉड्रन मधील सर्वात घातक लढाऊ विमानांपैकी एक असलेले एफ-१६ दक्षिण कॅलिफोर्नियाच्या वाळवंटात कोसळले.या दुर्घटनेबाबत माहिती देताना लष्कराने सांगितले की, विमान खाली येण्यापूर्वीच एअरफोर्सचा पायलट सुरक्षितरीत्या बाहेर पडला.**

या दुर्घटनेत पायलटला किरकोळ दुखापत झाली असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अमेरिकन एअरफोर्सने एका निवेदनात सांगितले की, एफ-१६ सी फायटिंग फाल्कन हे विमान गुरुवारी सकाळी सुमारे १०.४५ वाजता कॅलिफोर्नियाच्या नियंत्रित हवाई क्षेत्रात प्रशिक्षण मोहिमेदरम्यान कोसळले. कॅलिफोर्नियाच्या वाळवंटात झालेल्या या विमान अपघाताची चौकशी सुरू करण्यात आली आहे. अमेरिकन एअरफोर्सची डझनभराहून अधिक फायटर जेट-ब्लू एंजेल्स आणि थंडरबर्ड्स-गेल्या दशकात कोसळली आहेत.

# श्री दत्त जयंती सोहळा उत्साहात साजरा

(पान १ वरून)

सोयीसाठी हायस्कूलजवळ असलेल्या कमानी जवळ विविध सेवाभावी संस्था मार्फत चहा,नाष्ट्याची सोय केली होती. भक्तांची गर्दी लक्षात घेता दत्त देवस्थाने पहाटे चार वाजता काकड आरती केली.अनेक भक्त कृष्णा नदीमध्ये स्नान करून येथे नव्यानेच बांधलेल्या उड्डाण पूलावरून दर्शनासाठी रांगेत मध्ये उभे होते.

भक्तांना सुलभ दर्शन होण्यासाठी मंदिर कमिटीने मुख्य दर्शन रांग,मुखदर्शन रांग तसेच परिसरामध्ये सीसी कॅमेऱ्याची सोय केली होती.अनेक भाविक दत्त दर्शन घेऊन येथील मोफत असलेल्या भैरंभट प्रसादालयात प्रसादाचा अस्वाद घेत होते.पहाटे काकड आरती नंतर आठ ते बारा वाजेपर्यंत अभिषेक,पंचामृत पार पडले.बारा वाजता 'श्रीं'चरणी षोडशोपचार महापूजा करण्यात आली.दुपारी तीन वाजता पवमान पठण करण्यात आले.चार वाजता 'श्रीं'ची सालंकृत उत्सवमूर्ती नारायण स्वामी मंदिरातून मुख्य मंदिरात आणण्यात आली.यावेळी उपस्थित भाविकांनी पुष्पवृष्टी केली.

मुख्य मंदिरात धुपारतीनंतर ठीक पाच वाजता ह.भ.प.संकेत बुवा काणे यांच्या किर्तनानंतर दत्त जन्मोत्सव सोहळा पार पडला.

यावेळी उपस्थित भक्तांनी मुक्तहस्ते अबीर,गुलालाची उधळण केली.मंदिर परीसराला दत्त देवस्थान मार्फत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती व सेवाभावी भक्तांमार्फत फुलाची सजावट केली होती.मंदिर परीसरात देवस्थान कमिटी मार्फत भाविकांना शुध्द पाण्याची सोय करण्यात आली होती.

तसेच रेस्क्यू फोर्स जीवनमुक्ती संघटनेचे जवान नदीकाठी तैनात करण्यात आले होते. दुपारी चार नंतर भक्तांना मोबाईल नेटवर्क जाम झालेला अनुभव आला. मंदिर परिसर व गावात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.अनेक भाविक पेढ्यांबरोबर वांगी,काकडी,बासुंदी,कवठबर्फी खरेदी करताना दिसत होते.या सोहळ्यास महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश या राज्यातील भाविक उपस्थित होते. कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी, कागल एसटी डेपोमार्फत जादा गाड्या सोडण्यात आल्या होत्या.परिसरातील साखर कारखान्यांनी उत्सव काळात ऊस वाहतूक बंद ठेवावी अशा सुचना देऊन सुध्दाही वाहातूक सुरु होती. यामुळे वाहतूक कोंडीचा त्रास भाविकांना सहन करावा लागत होता. अनेक भक्त वाहने कुरुंदवाड तसेच शिरोळ रस्ताकडेला लावून चालत दर्शनासाठी येत होते.रात्री उशिरा पालखी सोहळा संपन्न झाला व शेजारतीने कार्यक्रम समाप्त झाला.रात्री उशिरापर्यंतही भाविक येथे दाखल होत होते.हा सोहळा सुनियोजित पार पडण्यासाठी दत्त देवस्थान कर्मचारी सदस्य अध्यक्ष वैभव पुजारी, सचिव गजानन गेंडे पुजारी, सरपंच चेतन गवळी, उपसरपंच सौ.अनघा पुजारी व ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी यानी विशेष प्रयत्न केले.

# चीनमध्ये ६.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप

■ बीजिंग,ता.४ -

**चीनमध्ये भूकंपाचा जबरदस्त धक्का बसला आहे. चीनच्या भूकंप नेटवर्क केंद्राने माहिती दिली की ४ डिसेंबर रोजी देशाच्या उत्तर-पश्चिम भागातील शिनजियांग प्रदेशात ६.२ तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचा जोर इतका होता की लोक घाबरून घराबाहेर पळाले. शिनजियांग हा किर्गिझस्तानच्या सीमेजवळील प्रदेश आहे.**

भूकंप किर्गिझस्तानशिनजियांग सीमेजवळील अक्की काउंटीच्या परिसरात स्थानिक वेळेनुसार दुपारी ३:४४ वाजता झाला आणि त्याचे केंद्र जमिनीपासून १० किलोमीटर खोल होते. ज्यामुळे आफ्टरशॉकचा धोका कायम राहतो. सरकारी माध्यमांच्या मते, स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ४:३४ वाजेपर्यंत कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूची किंवा इमारती कोसळल्याची माहिती मिळालेली नव्हती.

*** संकेश्वर.ता.४(प्रतिनिधी)-** हुक्केरी येथील करेम्मा मंदिरा जवळ अनोळखी वृध्दाचा मृतदेह आढळून आला आहे.अनोळखी वृध्दाचा रंग काळा सावळा असून त्याच्या अंगावर पांढऱ्या रंगाचा शर्ट धोतर आहे.

वरील वर्णनाची वृध्द व्यक्ती हरवली असल्यास नातेवाईकांनी हुक्केरी शासकीय रुग्णालय संपर्क साधायचा आहे.

# सांस्कृतिक कार्यक्रम घ्या; मोदींचा खासदारांना सल्ला

■ नवी दिल्ली,ता.४(प्रतिनिधी)-

**संसदेच्या कामात जास्तीत जास्त प्रमाणात भाग घ्या आणि आपले सरकार जे जनहिताची काम करत आहे. ती प्रगती लोकापर्यंत पोचवा. सांस्कृतिक कार्यक्रम घ्या असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील भाजप खासदाराच्या भेटी प्रसंगी म्हटल्याचे समजले.**

तुम्ही थेट जनतेच्या संपर्कात राहा. लोकांच्या समस्या सोडवण्यावर भर द्या. आपल्या मतदार संघात सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घ्या. राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या योजना जनतेच्या दारी पोचवण्यासाठी सक्रिय राहा. राज्यसभा आणि लोकसभेतील तुमची हजेरी वाढवा. जेवढी तुमची सभागृहात उपस्थिती असेल . त्या प्रमाणात आपल्या ज्ञानात भर पडेल अशा सूचना मोदी यांनी महाराष्ट्रातील खासदारांना केल्याचे समजले.

# १८ कोटी रुपयांचे ड्रग्ज बंगळूरू पोलिसांकडून जप्त

(पान १ वरून)

याप्रकरणी १० आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि पाच वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

बँकॉकमधून हायड्रो गांजा वाहतूक: महालक्ष्मी लेआउट पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांकडून एकूण १८ किलो ५९० ग्रॅम हायड्रो गांजा जप्त करण्यात आला आहे, ज्याची किंमत अंदाजे १८.६० कोटी रुपये आहे. बँकॉकहून विमानाने बेंगळुरूला नेण्यात आलेला हा हायड्रो गांजा विमानतळावरून बाहेर पडत असताना जप्त करण्यात आला. या प्रकरणात, एक महिला आणि एका पुरूषासह दोन कुरिअरना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान, ते ड्रग्ज तस्कर असल्याचे आढळून आले. उर्वरित आरोपींना शोधण्यासाठी पोलिस त्यांचा शोध सुरू ठेवत आहेत.

**त्रिपुरा येथून आणलेला गांजा आणि बेंगळुरूमध्ये विक्री**

आरएमसी यार्ड पोलिसांनी विशिष्ट माहितीच्या आधारे कारवाई केली आणि एका बॅगेत गांजा विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका आरोपीला अटक केली. त्याच्याकडून ८ किलो ३५० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला, त्याची किंमत अंदाजे ८.३५ लाख रुपये आहे. आरटी नगर पोलिसांनी शेतात गांजा विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच आरोपींना अटक केली. छापेमारीदरम्यान, अटक केलेल्यांकडून ५ किलो ४३७ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला, त्याची किंमत अंदाजे ५.४३ लाख रुपये आहे. हे आरोपी त्रिपुरा राज्यातून गांजा आणून बेंगळुरूमध्ये विकण्याचा प्रयत्न करत होते, अशी माहिती मिळाली आहे. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे.जे.सी. नगर पोलिसांनी केलेल्या कारवाईत, एका परदेशी नागरिकाला अटक करण्यात आली आणि त्याच्याकडून २१ ग्रॅम एमडीएमए जप्त करण्यात आले. त्याची किंमत अंदाजे १.३५ लाख रुपये आहे. आरोपींकडून एक मोबाईल फोन आणि १,५०० रुपये रोख रक्कम देखील जप्त करण्यात आली. त्याचप्रमाणे, मल्लेश्वरम पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली आणि त्याच्याकडून ७७२ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला.

# शेतीपंपांना दिवसा वीज पुरवठ्याबाबत खा.चव्हाण यांनी केंद्राचे लक्ष वेधले

■ नांदेड,ता.४-

**शेतकऱ्यांवरील वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांची वाढती संख्या लक्षात घेता केंद्र सरकारने देशातील सर्व राज्यांशी समन्वय साधून शेतीपंपांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्याबाबत माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांनी आज संसदेचे लक्ष वेधले.**

राज्यसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात मानववन्यप्राणी संघर्षाबाबत खा. सी. षण्मुगम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर चर्चेत सहभाग घेताना खा. चव्हाण बोलत होते. शेतकऱ्यांवर होणाऱ्या वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांविषयी चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की, साधारणपणे कृषीपंपांना रात्री वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी अंधारात शेतात जावे लागते आणि या वेळेत वन्यप्राण्यांच्या हल्ल्याची शक्यता अधिक असते.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्यांशी समन्वय साधून शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा निर्णय घेतल्यास अशा हल्ल्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते, अशी सूचना त्यांनी मांडली. याशिवाय वन्यप्राणी शेतात घुसून पिकांची मोठ्या प्रमाणात हानी करतात, त्यामुळे वनक्षेत्रालगतच्या शेतीभागांत कुंपण उभारण्यासारख्या उपाययोजनांची गरज असल्याचेही खा.चव्हाण यांनी नमूद केले.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी खा.अशोकराव चव्हाण यांच्या सूचनेचे स्वागत केले. वनक्षेत्रांच्या सीमेजवळ मानवी वस्तीमध्ये हल्ल्याच्या घटना वाढत असतील, तर आवश्यकतेनुसार असे भाग निश्चित करून तिथे वन्यजीव व्यवस्थापन योजनेंतर्गत सीमांकन केले जाते, असे ते म्हणाले.

# मामा-भाच्यावर कोयत्याने हल्ला

(पान १ वरून)

फिर्याद दिली असून ते व त्यांचा भाचा संतोष सदाशिव सनदे हे दोघे जखमी झाले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी पृथ्वीराज उर्फ पिट्या राहुल भोरे, रुद्र शक्ती भोरे, ऋषभ भोरे, रुद्र भोरे, शक्ती राजू भोरे, प्रेम उदय लोंढे, अक्षरा शक्ती भोरे (सर्व रा.मिरज) या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, पिट्या भोरे याने सत्यनावर यांचा भाचा संतोष यास घरासमोर अडवले. गाडी हळू चालव असे म्हणून अर्वाच्या शिवीगाळ केली. संतोष याच्या दुचाकीची चावी काढून घेतली. दुचाकीची चावी परत मागत असताना पिट्या भोरे हा हातात कोयता घेऊन आला. तुम्हाला मस्ती आली आहे असे म्हणून शिवीगाळ करू लागला. सत्यनावर हे त्यास समजून सांगत असताना त्याने त्यांच्या पाठीत कोयत्याने वार केला. यावेळी संबंधित सर्वांनी संतोष यास खाली पाडून मारहाण केली. यापैकी रुद्र शक्ती भोरे याने हातातील चाकूने संतोष याच्या डाव्या पायाच्या मांडीत व खुब्यात भोकसून जखमी केले. तसेच फिर्यादी सत्यनावर यांच्या पत्नी, बहीण व मुलगी यांना अक्षरा शक्ती भोरे हिने लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. पोलिसात देण्यात आलेल्या या फिर्यादीनुसार मिरज शहर पोलिसांनी सात जणांना विरुद्ध गुन्हा दाखल करून त्यापैकी काही जणांना ताब्यात घेतले आहे.

# साखर कारखान्यांवर बडगा

(पान १ वरून)

बोलताना सहकारमंत्री म्हणाले, कर्जमाफी संदर्भात विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी कोणीही भाष्य करू नये, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे त्यावर टिप्पणी करणे उचित नाही. मात्र कर्जमाफीसाठी ३० जूनची अंतिम मुदत देण्यात आली असून, सरकार त्या कालावधीत निर्णय घेईल. कर्जमाफीचा सहकार खात्यावर होणारा परिणाम, तसेच किती कर्जदार थकबाकीत आहेत, याचे अचूक आकडे गोळा करण्याचे काम सुरू आहे. यासाठी परदेशी तज्ज्ञ समिती नेमण्यात आली असून, ती समिती सर्व माहिती संकलित करत असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

# रस्ते दर्जेदार करा

(पान १ वरून)

उद्ध्वस्त झालेल्या शहरासारखे भासू लागलेले आहे. सामान्य माणसांना स्पॉन्डिलायसिस, सर्दी, डोळेदुखी असे आजार होत आहेत. उपनगरातील रस्त्यांबाबत तर यापेक्षा गंभीर परिस्थिती आहे. रस्त्यांच्या या अत्यंत दर्जाहीन परिस्थितीमुळे, मणक्याचे दुखणे, कमरेचे दुखणे, गाड्यांच्या देखभाल खर्चामध्ये प्रचंड वाढ आणि धुळीच्या लोटांमुळे हवेच्या प्रदूषणामध्ये कमालीची वाढ झालेली आहे. याशिवाय, खराब रस्त्यांमुळे होणाऱ्या अपघातांच्या प्रमाणात वाढ झालेली असून, वाहतूक कोंडी, त्यामुळे खर्च होणारे अधिकचे इंधन हे सर्व देखील आता नागरिकांच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेलेले आहे, असे कोल्हापूरकरांचे दुःख याचिकेतून मांडण्यात आल्याचे ॲड. असीम सरोदे यांचे सहकारी वकील ॲड. श्रीया आवले, ॲड. योगेश सावंत आणि ॲड. सिद्धी दिवाण म्हणाले.

या जनहित याचिकेतील आरोपांवर उत्तर देण्यासाठी आज महानगरपालिका कोल्हापूर, जिल्हा परिषद कोल्हापूर, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कोल्हापूर, नगर विकास मंत्रालय यांच्या तर्फे पुन्हा अवधी मागून घेतला, त्यामुळे पुढील सुनावणी १८ डिसेंबरला ठेवण्यात आली.

# प्रदूषित हवा, रुपयाचे अवमूल्यन विरोधकांची संसद परिसरात संतप्त निदर्शने

■ नवी दिल्ली,ता.४-

**दिल्लीतील प्रदूषित हवा आणि रुपयाची डॉलरच्या तुलनेत घसरण या मुद्यांवरून विरोधकांनी केंद्र सरकार विरोधात गुरुवारी संसद परिसरात निदर्शने केली. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसच्या सरचिटणीस व खासदार प्रियांका गांधी आदिंनी प्रामुख्याने निदर्शने केली. त्यांच्यासोबत द्रमुक, तृणमूल काँग्रेस यांसह डाव्या पक्षांचे खासदार सहभागी झाले होते.**

या संदर्भात खरगे यांनी ट्विटमध्ये म्हटले की, विषारी हवेबद्दल भाजपाच्या उदासीनतेविरुद्ध संसदेत आमचा निषेध आहे. सरकार फारच निष्काळजीपणे वागत आहे. त्यांनी सर्वसामान्यांच्या आरोग्याशी काहीही देणे-घेणे नाही. मंत्र्यांकडून दिल्या जाणाऱ्या प्रतिक्रियांमधून कोणतेही गांभीर्य दिसून येत नाही. त्यामुळे हे सरकार जनता विरोधी असल्याचेही ते म्हणाले.

दुसरीकडे माध्यमांशी बोलताना खरगे म्हणाले की, आज रुपया ९० च्या पुढे गेला आहे. सरकारने कितीही घोषणा दिल्या तरी रुपयाची घसरण देशाची खरी आर्थिक परिस्थिती उघड करते. जर मोदी सरकारची धोरणे योग्य असती तर रुपया घसरला नसता! २०१४ च्या आधी मोदी म्हणाले होते, भारतीय रुपया का घसरत आहे याचे उत्तर तुम्हाला द्यावे लागेल. देश तुमच्याकडून उत्तरे मागत आहे. आम्ही आज मोदींना हाच प्रश्न विचारत आहोत. त्यांना उत्तर द्यावे लागेल.



पुण्यस्मरण
एक व्यक्तिमत्व
न विसरणारं...
नुसत्या आठवणीनं
हृदय भरून येणारं..
भावपूर्ण श्रध्दांजली !
स्व.श्री.सचिन सुरेश अग्रवाल
(स्व.दि. ५.१२.२०१०)
सौ. प्रेमलता सुरेश अग्रवाल
श्री. सुरेश जनार्धन अग्रवाल
सौ. प्रियांका सुमित अग्रवाल
श्री. सुमित सुरेश अग्रवाल

॥ ऋणनिर्देश ॥



कै. गणपती तुकाराम शेळके
महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचे माजी अध्यक्ष
श्री. हिंदुरावजी शेळके यांचे थोरले बंधू कै. गणपती तुकाराम शेळके (बापू) यांचे दि. २४/११/२०२५ रोजी दुःखद निधन झाले. याप्रसंगी आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र परिवार, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर व हितचिंतकांनी प्रत्यक्ष भेटून, फोनद्वारे आमचे सांत्वन केले व आम्हाला धीर दिला याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत.
डॉ. विनोद गणपती शेळके * श्री. अमोल गणपती शेळके
शेळके परिवार, इचलकरंजी
उत्तरकार्य विधी - आज शुक्रवार दि. ०५/१२/२०२५ रोजी दुपारी १२ वाजता, १३/३६४, दातार मळा, इचलकरंजी येथे आहे.

# मतदार केंद्राच्या प्रारूप यादीसंदर्भात सोमवारी महापालिकेकडे बैठक

इचलकरंजी,ता.४ –

**इचलकरंजी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदान केंद्र ठिकाणांची प्रारुप यादी महानगरपालिकेच्या https://ichalkaranjimnp.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आली आहे.यावर सूचना व दुरुस्तीसाठी सोमवार ता. ८ डिसेंबर २०२५ रोजी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व राज्य व राष्ट्रीय पातळी वरील मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची बैठक इचलकरंजी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने आयोजित केली आहे.**

तरी शहरातील सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधी यांनी महानगरपालिका सभागृहात सोमवार दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता उपस्थित रहावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक पल्लवी पाटील यांचेकडून करणेत येत आहे.



# पाच लाखाचे वैद्यकीय साहित्य चोरणाऱ्या तीन महिलांना अटक

सांगली, ता. ४(प्रतिनिधी) –

**सांगलीत टेम्पोतून आलेले सुमारे ५ लाख रूपयांचे वैद्यकीय शस्त्रक्रियेचे साहित्य चोरणाऱ्या तीन महिलांना शहर पोलिसांनी अटक केली. कल्पना सुखलाल गोसावी (वय ४०), सुनिता अनिल घाडगे (वय ३८, रा. गोसावी गल्ली, सम्राट व्यायाम मंडळजवळ, सांगली), राणी विलास ऊर्फ पेदान्ना गोसावी ऊर्फ मद्रासी (वय ४०, गोसावी गल्ली, माधवनगर) अशी त्या चोरट्या महिलांची नावे आहेत. त्यांच्याकडून चोरीचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.**

पुणे येथील कल्पक मार्केटिंग प्रा. लि. कंपनीचे विक्री प्रतिनिधी हर्षल हिराचंद देशपांडे हे वैद्यकीय शस्त्रक्रियेचे साहित्य असलेला टेम्पो (एमएच १२ युएम ६३६२) घेऊन सांगलीत आले होते. चोरट्या महिलांनी टेम्पोतील पाच लाख रूपयांचे साहित्य लंपास केले. याबाबत देशपांडे यांनी सांगली शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

दरम्यान गुन्हे प्रकटीकरण पथकाला वैद्यकीय साहित्य साहित्य चोरणाऱ्या महिला सम्राट व्यायाम मंडळाजवळ येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिस निरीक्षक अरूण सुगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला. तीन महिलांना ताब्यात घेतले. त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीचे पाच लाखांचे साहित्य जप्त केले.

# महिला प्रवाशाचे ३३ हजाराचे दागिने लंपास

सांगली, ता. ४(प्रतिनिधी) –

**सांगली बसस्थानक परिसरातून बसमध्ये चढणाऱ्या एका महिला प्रवाशाची दागिन्यांची पर्स चोरट्याने लंपास केली. त्यामध्ये ३३ हजार ५०० रुपयांचे सोने – चांदीचे दागिने होते. याप्रकरणी शिलवंती नाग्गाप्पा म्हेत्रे (रा. त्रिमुर्ती कॉलनी, शंभर फुटी रस्ता, स्वामी समर्थ मंदिरानजीक सांगली) यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना मंगळवारी सकाळी १०.३० च्या सुमारास घडली.**

घटनेची माहिती अशी, फिर्यादी शिलवंती म्हेत्रे या मंगळवारी सकाळच्या सुमारास सांगली ते लातूर या बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दी असल्याने चोरट्याने म्हेत्रे यांच्या खांद्याला अडकवलेली पर्स चोरट्याने शिताफीने लांबवली. यामध्ये २८ हजार ५०० रुपयांचे सोने – चांदीचे दागिने तसेत रोख ५ हजार असा ऐवज होता. काही वेळाने पर्स चोरीस गेल्याची बाब म्हेत्रे यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने चोरट्याचा शोध घेतला मात्र, तोपर्यत चोरटा पसार झाला होता. फिर्याद दाखल होताच पोलिसांनी चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# बनावट नोटा भरणा केल्या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

सांगली, ता ४(प्रतिनिधी)–

**शहरातील एका बॅंकेत खातेदाराने पाचशे रुपयांच्या एकोणीस बनावट नोटांचा भरणा केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी राशद जावेद मुल्ला (वय ४९, रा. ४८० अभिनव शाळेनजीक, शंभर फुटी रस्ता, शामरावनगर, सांगली) याच्याविरोधात विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत सांगली अर्बन बॅंकेच्या टिंबर एरिया शाखेतील रोखपाल (कॅशिअर) विश्वास आत्माराम पाटील (रा. हरुगडे प्लॉट, सोसायटी रस्ता, सांगलीवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११.३० च्या सुमारास बॅंकेच्या टिंबर एरिया शाखेत खातेदार राशद मुल्ला यांनी पाचशे रुपयांच्या एकोणीस नोटांचा भरणा केला होता. मात्र, सदर नोटा बनावट असल्याचे तपासणीत बॅंक अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

# बेकायदा गॅस भरणाऱ्या सेंटरवर कारवाई

कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी)–

**गॅस हा ज्वलनशील वायू आहे, हे माहीत असतानाही उघड्यावर त्याचा भरणा करून स्वत:सह आसपासच्या लोकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या युवकास लक्ष्मीपुरी पोलिसांनी अटक केली. लक्ष्मीपुरी, सुभाड रोडवर ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी रोहित किशोर कांबळे (वय ३०, रा. मूळ सिद्धार्थनगर, सध्या बटुकेश्वर कॉलनी, कोल्हापूर) यास अटक केली आहे. त्याच्यावर जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.**

संशयित रोहित कांबळे हा युवक सुभाष रोडवर एका दवाखान्याच्या पाठीमागे स्वयंपाकासाठी वापरला जाणारा गॅस इतर लहान टाक्यांमध्ये भरून देतो, तसेच रिक्षातही भरतो, अशी माहिती लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्याचे कॉ. मंगेश माने यांना खबऱ्याकडून समजली होती. त्यानुसार पोलिसांनी गुरुवार, दुपारी येथे छापा टाकून कारवाई केली.यावेळी पोलिसांनी दोन गॅस सिलिंडर, गॅस भरण्यासाठी लागणारे पाईप, वजनकाटा असा १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# इच्छुकांच्या भेटी–गाठीला जोर



## विविध पक्ष, आघाडीच्या बैठका : इच्छुकांची संख्या जास्त

इचलकरंजी,ता.४ –

**सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जानेवारी महिन्यामध्येच महानगरपालिकेची निवडणूक होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे इच्छूक मंडळींनी आपआपल्या प्रभागात मतदारांची भेटी–गाठी घेण्यास जोर लावला आहे.तर कोणाला कोणत्या प्रभागात तिकीट द्यायचे याची चाचपणी विविध पक्षासह आघाडीमध्ये खलबते सुरू आहेत. इच्छूकांची संख्या जादा असल्यामुळे नेतेमंडळी पुढे पेच निर्माण झाला असून बंडखोरी टाळण्यासाठी अखेरच्या क्षणी उमेदवारी निश्‍चित होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

गेल्या ४–५ वर्षापासून निवडणुकीच्या प्रतिक्षेत असलेली आणि पहिल्यांदाच होत असलेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. पहिल्यांदाच होत असलेल्या निवडणुकीमध्ये आपल्या पक्षाची सत्ता व महापौर व्हावा यासाठी महायुती व महाविकास आघाडीने आपआपल्या परीने राजकीय डावपेच टाकण्यास सुरूवात केली आहे. महायुतीतील प्रमुख घटक पक्ष भाजपकडे इच्छूकांची संख्या मोठी आहे.नेतेमंडळी प्रत्येकाला शब्द देत आहेत. यामुळे इच्छूकांची आपल्यालाच तिकीट मिळेल अशी धारणा झाली आहे.महायुतीतील घटक पक्ष शिवसेना(शिंदे गट) व राष्ट्रवादी(अजित पवार गट) यामध्ये इच्छूकांची मांदियाळी आहे.त्यामुळे महायुतीतर्फे कोण प्रबळ दावेदार आहे. त्याला तिकीट देण्याबाबत महायुतीमध्ये खलबते सुरू आहे.

तर महायुतीला टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडीने देखील आपले पत्ते खुले करण्यास सुरूवात केली आहे. महाविकास आघाडीकडेही इच्छूकांची संख्या जास्त असल्याने महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींना डोकेदुखी ठरणार आहे. आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचना व प्रभाग आरक्षण जाहीर झाले आहे.

एकेक प्रभागात १४ हजारापासून १८ हजारापर्यंत मतदान असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहचण्यासाठी इच्छूक मंडळींनी भेटी–गाठीला जोर दिला आहे.त्यामुळे शहराच्या विविध भागात मंडळी फिरताना दिसून येत आहे.तर प्रमाणात इच्छूक मंडळी कार्यकर्त्यांना खूश ठेवण्यासाठी जेवणावळी सुध्दा सुरू केल्या आहेत. त्यामुळे निवडणुकीचे वातावरण हळूहळू तापू लागले आहे. ऐन हिवाळ्यात राजकीय वातावरण तापणार हे मात्र निश्‍चित.

अनेक इच्छूक मंडळी सकाळपासून प्रभागात फिरती करून कोणते काम थांबले आहे काय? गटारीची वेळच्या वेळी स्वच्छता होते काय? रस्ते व इतर सुविधा आहेत काय? या चौकशीसह मतदारांच्या कोणत्याही कार्यक्रमाला आवर्जून हजर राहताना दिसून येत आहे. तर मतदार इच्छूकांना कसे घेरायचे याबाबत उलट–सुलट चर्चा करताना दिसून येत आहे.

# हातकणंगलेत युवकावर कोयत्याने हल्ला

हातकणंगले, ता. ४ (प्रतिनिधी)–

**हातकणंगले येथे कृष्णात नामदेव खोत (वय ३६ ) रा. खोतवाडी ( ता. हातकणंगले )या युवकावर कोयत्याने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना गुरूवारी सायंकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास कोल्हापूर सांगली महामार्गावर एका हॉटेल शेजारी असलेल्या चहाच्या टपरीवर घडली .**



मिळालेल्या माहिती नुसार कृष्णात खोत हा एका हॉटेल मध्ये कर्मचारी आहे.गुरूवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास तो कोल्हापूर सांगली महामार्गालगत असलेल्या एका हॉटेल समोरील चहाच्या टपरीमध्ये आला असता अज्ञात इसमाने त्याच्यावर कोयत्याने तीने ते चार वार करून गंभीर जखमी केले.त्याला तात्काळ हातकणंगले येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याची प्रकृती गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी सांगली येथील रुग्णालयात पाठवले.सदर घटना ही अनैतिक संबंधातून झाल्याची चर्चा होती.रात्री उशिरापर्यंत याची नोंद हातकणंगले पोलिसात झाली नव्हती .

# छ. संभाजी महाराज पुतळा उभारणीसाठी महत्वपूर्ण विधी पूर्ण

इचलकरंजी,ता.४ –

**येथील कॉ. के. एल. मलाबादे चौक या मध्यवर्ती ठिकाणी उभारण्यात येत असलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यासंबंधी गुरुवारी महत्त्वपूर्ण विधी पार पडले. साजणीतील श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान परिवार आणि श्री हिंदवी स्वराज्य ध्वजस्तंभ समिती यांच्या २५ धारकऱ्यांनी सलग एका महिन्याच्या यात्रेनंतर महाराष्ट्रातील ५७ गडकिल्ल्यावरून गोळा केलेली पवित्र माती स्मारकस्थळी आणून ती शंभू महाराजांच्या पुतळ्याच्या चरणी अर्पण केली. या प्रक्रियेमुळे या स्मारकाला ऐतिहासिक आणि आध्यात्मिक असा दुहेरी स्पर्श लाभला.**



**शुक्रवार ५ रोजी सकाळी ९.३० ते ११ या वेळेत विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. याचदिवशी संध्याकाळी ६ वाजता दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर ,सुप्रसिध्द गायक अवधूत गांधी,अभिनेत्री स्मिता शेवाळे यांच्या सादरीकरणाने साकारलेले ‘श्वासात राजं, ध्यासात राजं’हा छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील संगीतमय कार्यक्रम सादर होणार आहे. तसेच रविवार ७ रोजी सायंकाळी ५ वाजता एक हजार ढोल–ताशांच्या गजरात महाराजांना आगळी वेगळी मानवंदना दिली जाणार आहे.**

रायरेश्वर, राजगड, शिवनेरी, सिंहगड, विजयदुर्ग ते सिंधुदुर्ग अशा महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार असलेल्या गडकोटांवरून आणलेली ही माती श्रद्धेचे प्रतीक मानली जात आहे. हा उपक्रम साजणीच्या धारकऱ्यांसाठी अभिमानाचा ठरला असून इचलकरंजीसाठी हा एक ऐतिहासिक टप्पा असल्याचे मानले जात आहे. यात्रेदरम्यान प्रयागराज येथून आणलेले गंगाजल आणि श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या धारकऱ्यांकडून अर्पण केलेली चांदीची पट्टी हे या संपूर्ण विधीचे विशेष आकर्षण ठरले. दरम्यान, छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा गुरुवारी क्रेनच्या सहाय्याने चबुतऱ्यावर प्रतिष्ठापित करण्यात आला. मूर्ती स्थापित झाल्यानंतर परिसरात घोषणांनी दणाणून गेला आणि आतषबाजी करण्यात आली. यापूर्वी चबुतऱ्याच्या ठिकाणाचा श्री गोखले गुरूजी यांनी पौराहित्य केले. स्मारक समितीचे अध्यक्ष गजानन महाजन गुरुजी यांच्या हस्ते शांती विधी पार पडला. यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे कार्यवाह प्रसाद जाधव, शेखर नाईक, मंगेश मस्कर आणि ॲड. समीर मुदगल यांची उपस्थिती होती.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात दत्त जयंती उत्साहात



**इचलकरंजी ता ५–**

दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवाकेंद्र नदिवेस नाका,इचलकरंजी येथे श्रीगुरू दत्त जयंती उत्सव उत्साहात संपन्न झाला. श्री दत्त जयंती सोहळ्या वेळी हजारो भाविक सेवेकरी यांनी सेवा केंद्रात उपस्थिती लावली होती.मान्यवरांच्या उपस्थितीत विविध विकास कामांचा शुभारंभ देखील करण्यात आला.

दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (नदिवेस नाका) यांचेवतीने श्री दत्त जयंती निमित्त २८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत श्री गुरुचरित्र पारायण, अखंड नाम जप, यज्ञयाग सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सोमवार पासून श्री गुरुचरित्र पारायण तसेच दररोज एक याप्रमाणे श्री गणेश याग, मनोबोध याग, श्री चंडी याग, श्री गीताई याग, श्री स्वामी याग, श्री रुद्रयाग,श्री मल्हारी याग संपन्न झाले. तसेच सप्ताह कालावधीत संपूर्ण दिवसभर महिलांचे तर रात्रभर पुरुष सेवेकरी यांचे वतीनेअखंड प्रहरे ची सेवा करण्यात आल्या. गुरुवारी ४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजून ३९ वाजता श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रविंद्र माने यांच्या सुविद्य पत्नी सौ. रुपाली रविंद्र माने यांचे हस्ते महाआरती करण्यात आली.

दरम्यान सेवा केंद्र परिसरातील विविध विकास कामांचा शुभारंभ देखील यावेळी करण्यात आला यावेळी आमदार डॉ. राहूल आवाडे,शिवसेना जिल्हाप्रमुख रविंद्र माने,केंद्र प्रमुख रमेश शिरगुरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



इचलकरंजी–येथील सुंदरबाग परिसरातील शतकोत्तर श्री गद्रे दत्त मंदिरात दत्त जयंती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.सायंकाळी पार पडलेल्या श्रींचा जन्मकाळ प्रसंगी महिला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. (छाया–छोटूसिंग)

# शेगावजवळ कंटेनर– दुचाकीची जोरदार धडक, दोघे ठार

जत,ता.४( प्रतिनिधी)–

**जत तालुक्यातील पंढरपूर–अथणी राष्ट्रीय महामार्गावरील शेगाव गावच्या हद्दीत प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर कंटेनर व दुचाकीचा ओव्हरटेक करण्याच्या नादात समोरासमोर धडक होऊन दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. कामन्ना संगाप्पा हत्तळी (वय २५, मूळ रा. चिकलगी, ता. मंगळवेढा, ) व सचिन गणेश व्हनमाने (वय २१, रा. शेगाव, ता. जत) असे मृत युवकांची नावे असून गुरुवारी ४ रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.**





याबाबत जत पोलिस ठाण्यात रात्री उशीरापर्यंत घटनेची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. घटनेनंतर जत पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा पंचनामा करून मृतदेह जत ग्रामीण रुग्णालय येथे शवविच्छेदन करण्यासाठी पाठविण्यात आले.

कामन्ना हत्तळी व सचिन व्हनमाने हे दोघेही कंटेनर चालक आहेत. , रात्री उशिरा घटनेची नोंद करण्याचे काम सुरू होते.

# गारगोटी, कोल्हापूर राज्य मार्गांवर दोघांचा अपघाती मृत्यू

गारगोटी ता. ४(प्रतिनिधी)–

**गारगोटी ते कोल्हापूर राज्य महामार्गांवर दोन दिवसात दोन अपघात झाले, आणि त्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. उसाच्या हंगामामुळे हा रस्ताच आता अपघातप्रवण बनला आहे.**

गारगोटी–कोल्हापूर मार्गांवर मडिलगे खुर्द ता.भुदरगड येथील बस स्थानकाजवळ मंगळवारी रात्री साडे सातच्या सुमारास भरधाव वेगाने चुकीच्या दिशेने येऊन टेम्पोने ट्रॅक्टरला दिलेल्या धडकेत टेंपो चालकाचा जागीच मृत्यू झाला.संभाजी अप्पया नाईक (वय ३५,रा.जरळी,ता.गडहिंग्लज) असे त्या चालकाचे नाव आहे.या प्रकरणी ट्रॅक्टर चालक प्रकाश आश्राप्पा करवळ (रा.मडुर पैकी घावरेवाडी, ता.भुदरगड ) यांनी भुदरगड पोलिसांत फिर्याद दिली आहे.

मंगळवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास गारगोटीकडून कोल्हापूरच्या दिशेने येणाऱ्या भरधाव टेंपोने (क्र.एमएच ०९ ईएल.१४५०)बिद्रीकडून गारगोटीकडे निघालेल्या ट्रॅक्टरला(क्र.एमएच ०९ जीएम ८२५४) समोरून जोराची धडक दिली.या धडकेत टेंपो ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये घुसला. अपघात इतका जोरात होता की टेंपोचे स्टेरींग चालक संभाजी अप्पया नाईक यांच्या पोटात घुसली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.

प्राथमिक धडकेनंतर अनियंत्रित झालेला टेंपो विरुद्ध दिशेला जाऊन गारगोटीच्या दिशेने येणाऱ्या ट्रॅक्टर–ट्रॉलीवर जाऊन पुन्हा आदळला.यामध्ये एक ऊसतोड मजूर किरकोळ जखमी झाला.

तर त्याच दिवशी दुपारी रस्ता ओलांडणाऱ्या महिलेला एस टी बसने धडक दिली.त्यात एका महिलेचा मृत्यू झाला.या दोन्हीही अपघाताची नोंद भुदरगड पोलिसात ठाण्यात झाली आहे.

# ‘त्या’दुचाकीस्वाराचा शोध सुरू

कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी)

**राजारामपुरी येथे खरे मंगल कार्यालयासमोर रस्ता ओलांडणाऱ्या लक्ष्मी तानाजी कलकुटकी (वय ५७ रा. दौलतनगर,कोल्हापूर) यांना दुचाकीस्वाराने जोराची धडक दिली. यात लक्ष्मी गंभीर जखमी झाल्या उपचार सुरू असताना त्यांना मृत्यू झाला.**

त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अज्ञात दुचाकीस्वारावर राजारामपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अनिल तानाजी कलकुटकी (वय ३५ रा. दौलतनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यामुळे पोलीस संशयीत दुचाकीस्वाराचा शोध घेत आहेत. उपनिरीक्षक बागल तपास करीत आहेत.

# नशिले इंजेक्शन विक्री: एकास अटक ; ६६ हजारांचा साठा जप्त

कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी) –

**मेफेन्टरमाइन सल्फेट या नशिल्या इंजेक्शनची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या युवकाला शाहूपुरी पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून ६६ हजार रुपये किंमतीच्या ५० बाटल्या जप्त करण्यात आल्या. आयर्विन हायस्कूलसमोर गुरूवारी दुपारी ही कारवाई करण्यात आली. ऋषभ रवींद्र आडके (वय २५, रा. नरसिंह कॉलनी, नाना पाटील नगर, कोल्हापूर) असे त्याचे नाव आहे.**

जिल्ह्यात नशिल्या इंजेक्शन विक्री करणाऱ्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. कॉन्स्टेबल राहुल पाटील, महेश पाटील यांना गोपनीय खबऱ्याकडून माहिती मिळाली की, एक युवक नशिली इंजेक्शन विक्रीसाठी आयर्विन हायस्कूल समोरील रोडवर येणार आहे.गुरुवारी दुपारी पोलीस निरीक्षक संतोष डोके यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय चेतन मसुटगे, आकाश जाधव, अंमलदार भैरू माने, मिलिंद बांगर, यांच्या पथकाने सापळा रचून संशयित ऋषभ आडके यास अटक केली. त्याच्या मोपेडच्या डिकीची झाडाझडती घेतल्यानंतर नशिल्या इंजेक्शनचा बॉक्स सापडला.त्याला अटक करून कसून चौकशी केल्यानंतर त्याने आपण ही इंजेक्शन युवकांना विक्री करण्यासाठी घेऊन आल्याचे सांगितले.



त्यानुसार त्याला अटक करून त्याच्याकडून ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही इंजेक्शन त्याने कोठून आणली?, कोणाला विक्री करणार होता?, याची माहिती पोलीस घेत आहेत.

**▮ संपादकीय ▮**

# समुद्रतळाशी 'मिशन इंडिया'

भारताने अलीकडील काळात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घेतलेली भरारी जगासाठी आश्चर्यकारक ठरली आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पहिल्यांदा प्रकाश टाकणाऱ्या भारताने समुद्र संशोधनातही लक्षणीय प्रगती केली आहे. अलीकडेच भारताने ६,००० मीटर खोलीवर जगातील सर्वांत खोल मानवी-निवासक्षम पाणबुडी संशोधन प्रयोगशाळा उभारण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा केली आहे. ही अंडरवॉटर लॅब समुद्रातील इंटरनॅशनल स्पेस स्टेशन मानली जाते. सुरुवातीला ५०० मीटर खोलीवर एक डेमो मॉड्यूल तैनात केले जाईल, ज्यात तीन वैज्ञानिक सलग २४ तासांहून अधिक काळ समुद्राखाली वास्तव्य करू शकतील. यामधून जीवन-समर्थन प्रणाली, दाब सहनक्षमता, ऊर्जा पुरवठा आणि इतर तांत्रिक बाबींची चाचणी केली जाईल. हा टप्पा यशस्वी झाला की ६,००० मीटर खोलीवरील पूर्ण प्रमाणातील स्थायी संशोधन केंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा होईल. महासागराच्या इतिहासात इतक्या खोलीवर मानवी-निवासक्षम रचना आजवर कधीच उभारली गेली नाही.या प्रयोगामुळे मानवजातीचे भवितव्य मंगळावर वस्ती बांधण्यात आहे की आपल्या पृथ्वीवरील महासागरांच्या गर्भात हा प्रश्न नव्याने चर्चेत आला आहे. अमेरिका आणि इतर अनेक देश मंगळावर मानवी वसाहत वसवण्याच्या तयारीत व्यस्त असताना भारत खोल समुद्रात वास्तव्य करता येईल का याची चाचपणी करत आहे. यासाठी हिंद महासागरात जगातील सर्वाधिक खोलवर असलेली वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारण्याचे मिशन भारताने हाती घेतले आहे. या माध्यमातून समुद्री जीवसृष्टीच्या निरीक्षणाबरोबर भविष्यात समुद्राच्या गर्भातही मानवी वस्ती उभारण्याची शक्यता तपासली जाणार आहे.चेन्नईस्थित नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ ओशन टेक्नॉलॉजी या भव्य प्रकल्पाला आकार देण्याच्या प्रक्रियेत आहे. या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० मीटर खोल समुद्रात एक अंडरवॉटर स्टेशन उभारले जाणार आहे. येथे तीन वैज्ञानिक सलग एक दिवस किंवा त्याहून अधिक काळ राहू शकतील. या स्टेशनमध्ये लाईफ सपोर्ट सिस्टम, ऑक्सिजन पुरवठा, तापमान नियंत्रण आणि डॉकिंग यंत्रणा असेल. पारदर्शक भिंतींमुळे वैज्ञानिकांना समुद्री प्राणिजगताचे निरीक्षण प्रत्यक्ष करता येईल. त्यामुळे या संपूर्ण व्यवस्थेची तुलना अवकाशातील इंटरनॅशनल स्पेस स्टेशनसोबत केली जात आहे. गेल्या काही महिन्यांत भारतीय वैज्ञानिकांनी फ्रान्समधील रॉसकॉफ मरीन बायोलॉजिकल स्टेशनला भेट देऊन त्यांची तांत्रिक रचना, प्रणाली आणि पद्धतींचा अभ्यास केला आहे. भारतीय स्टेशन जगातील सर्वात खोल समुद्री संशोधन केंद्र ठरू शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील २५ ते ३० वर्षांत हा संपूर्ण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल, अशी अपेक्षा आहे. अर्थातच ही मोहीम प्रचंड जोखमीची असेल. तज्ज्ञांचे मत आहे की समुद्राकडे जाणे हे अवकाशापेक्षा अनेक पटींनी धोकादायक आहे. चंद्रावर एक डझनहून अधिक अंतराळवीरांनी जवळपास ३०० तास घालवले आहेत. दुसरीकडे पृथ्वीवरच असलेल्या महासागराच्या अतिगर्भात मोजक्याच मानव मोहिमा गेल्या आहेत आणि त्या काही तासांहून पुढे गेलेल्या नाहीत. २०२२ पर्यंत जगात केवळ २० टक्के समुद्री तळाचा प्रत्यक्ष अभ्यास झालेला होता. २०२३ मध्ये टायटॅनिकचे अवशेष पाहण्यासाठी गेलेले टायटन सबमर्सिबल अटलांटिक महासागरात दुर्घटनाग्रस्त झाले आणि त्यातील सर्व पाच प्रवाशांचा मृत्यू झाला. अवकाशातही अपघात झाले आहेत, परंतु त्यांची तीव्रता एवढी भीषण नाही. सध्याचा स्टील स्फिअर सागरातील प्रचंड दाब सहन करण्यासाठी पुरेसा नसल्याने, ६,००० मीटरच्या मोहिमेसाठी इस्रोच्या बेंगळुरू येथील लिक्विड प्रपल्शन सिस्टिम्स सेंटरमध्ये ८० मिमी जाडीच्या टायटॅनियम प्लेट्सपासून एक नवा टायटॅनियम स्फिअर तयार केला जात आहे. या प्लेट्सना जोडण्यासाठी उच्च-तंत्रज्ञानाचे 'इलेक्ट्रॉन-बीम वेल्डिंग' विकसित केले गेले असून ते ६ किमी खोलीवरील ६००-बार दाब सहन करण्यास समर्थ आहे. अनंत अडचणी असूनही भारताचा नियोजित अंडरवॉटर प्रयोगशाळा प्रकल्प हे महासागर संशोधनातील सर्वाधिक महत्वाचे पाऊल मानले जात आहे. मानव महासागराच्या जड, दाबयुक्त, प्रकाशरहित आणि अत्यंत अवघड वातावरणात तग धरू शकला, तर भविष्यातील मानवी वसाहतींसाठी समुद्र हे एक मोठे, जवळचे आणि स्वस्त आश्रयस्थान ठरू शकते. पृथ्वीबाहेरच्या ग्रहांवर वस्ती करण्याच्या प्रयत्नांइतकेच महत्वाचे, पण अधिक वास्तववादी असे हे समुद्री जगतातील मानवाचे पहिले भव्य पाऊल ठरू शकते. या मिशनसाठी सरकारने सुमारे ४०७७ कोटी रुपयांचा एकत्रित खर्च मंजूर केला असून हा खर्च २०२१ ते २०२६ या कालावधीत विविध टप्प्यांत वापरला जात आहे. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार अशा प्रयोगशाळांची किंमत साधारणपणे काही शेकडो कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकते. भारतीय प्रकल्पाचा खर्च यापेक्षा कमी किंवा अधिक असू शकतो, कारण भारत स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर करत आहे आणि या संशोधन सुविधा भारतीय महासागरातील तुलनेने स्थिर पर्यावरणीय झोनमध्ये उभारल्या जाणार आहेत.

# दौऱ्यातून काय साधणार?

**रशियाचे सर्वोच्च नेते आणि अध्यक्ष व्लादिमीर पुतीन ४ डिसेंबरपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. सध्याच्या संघर्षमय वातावरणात ही भेट निश्चितच महत्त्वाची ठरणार आहे. एकीकडे रशिया आणि युक्रेन यांच्या दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक राजकारणात रशिया एकटा पडलेला असतानाच दुसरीकडे अमेरिकेच्या जाचक टेरिफ धोरणामुळे भारतावरही अनेक आर्थिक संकटे ओढवली असताना या दोन देशांचे प्रमुख नेते चर्चा करणार आहेत हे निश्चितच महत्त्वाचे आहे. यापूर्वी रशियाच्या अनेक नेत्यांनी जरी भारताचे दौरे केले असले तरी पुतीन हे आजपर्यंतचे सर्वात बलाढ्य नेते समजले जातात.**



यापूर्वी काही तासासाठीच भारताच्या दौऱ्यावर आलेल्या पुतीन यांनी यावेळी दोन दिवस भारतात राहून विविध बाबींवर चर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे. खरेतर फार पूर्वीपासून म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यापासूनच रशिया आणि भारत हे नैसर्गिक मित्र होते. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि त्यानंतरच्या अनेक राजवटींनीसुद्धा रशियालाच आपला प्रधान मित्र मानला होता. भारतात स्वातंत्र्यानंतर नियोजनाच्या माध्यमातून जे पंचवार्षिक योजनांचे पर्व सुरू झाले त्यामागील प्रेरणासुद्धा रशियातील पंचवार्षिक योजना हेच होते. रशिया आणि अमेरिका यांच्यात शीतयुद्ध सुरू असतानासुद्धा भारताला रशियाबाबत सॉफ्ट कॉर्नर होता. अर्थात, गेल्या शतकाच्या शेवटी जगातील चित्र बदलल्यानंतर आणि शीतयुद्धाची समाप्ती झाल्यानंतर जगातील नेत्यांचे आणि देशांचे हितसंबंधही बदलले. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय नेते अमेरिकेच्या बाजूने झुकले असले तरी रशियाची मैत्री कमी झाली नव्हती. रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्ष सुरू झाल्यानंतर जगातील सर्वच देशांनी रशियावर बहिष्कार टाकायची भाषा केली असतानासुद्धा भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात करण्याची प्रक्रिया सुरूच ठेवली होती. रशिया आणि अमेरिका यांच्यातील जागतिक वैर जुनेच असल्यामुळे अमेरिकेचे न ऐकता भारताने रशियाबरोबर युद्धकाळातही आर्थिक संबंध सुरू ठेवण्याचा राग अमेरिकेच्या विशेषत: डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनात होताच. त्यातूनच त्यांनी भारतावर जाचक टेरिफ लादले. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध सध्या ताणलेल्या अवस्थेत असतानाच पुतीन भारताच्या दौऱ्यावर येत असल्याने त्यांचे स्वागत करावे लागणार आहे.

**दैनंदिनी**

आयात आणि निर्यात दोन्हीचा विचार करता भारतासाठी रशियाची भागीदारी सर्वात महत्वाची मानली जाते. संरक्षणाच्या दृष्टिकोनाने महत्त्वाची असलेली अनेक उपकरणे ५०% रशियाकडूनच खरेदी केली जातात. ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्त्वाची ठरलेली 'एस ४००' ही संरक्षण प्रणालीसुद्धा रशियाकडूनच घेण्यात आली होती. उभय देशांमध्ये होणारा व्यापार, संरक्षण संबंध या सर्व गोष्टींचा विचार करता पुतीन यांची ही भेट महत्त्वाची ठरणार आहे. अमेरिकेच्या दबावामुळे म्हणा किंवा रशियाला विरोध करण्याच्या हेतूने म्हणा पाश्चिमात्य देश एकवटले आहेत आणि त्याचा काही प्रमाणात फटका भारतालाही बसला आहे.

भारत सोडता बहुतेक सर्व देशांनी रशियाबरोबर आपले व्यापारी संबंध काही प्रमाणात कमी केले आहेत. मात्र भारताने त्यामध्ये कोणतीही घट केली नाही. अमेरिकेसह पाश्चिमात्य देशांना हे रुचलेले नाही. पण रशियाला मात्र भारताने दाखवलेल्या या मैत्रीची जाणीव आहे. भारतासाठी पुतीन यांचा हा दौरा जरी जागतिक राजकारणामधील एक बॅलन्सिंग ॲक्ट असला तरी पुतीन यांना मात्र आता भारतासारखा मोठा देश आपला सख्खा मित्र आहे हे दाखवणेसुद्धा महत्त्वाचे आहे. या दौऱ्यामध्ये दोनही देशांना हितकारक ठरतील असे अनेक निर्णय आणि करार होतील अशी चिन्हे आहेत. अर्थात सर्व घडामोडी घडत असताना दोन्ही देशांना अमेरिकेचा रोष पत्करावा लागणार आहे हे उघड आहे. अमेरिकेने भारतावर जास्त टेरिफ लावल्यानंतर गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये अनेक वेळा पुतीन आणि मोदी यांची जागतिक पातळीवर कोठे ना कोठे भेट झाली आहे आणि आता तर ते भारताच्या दोन दिवसाच्या दौऱ्यावर येणार असल्याने भारत आणि रशिया यांच्यातील या मैत्रीची गाठ अधिकच पक्की होणार आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी तो नाराजीचा मुद्दा असू शकतो. साहजिकच डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखा नेता भारतावर अजून काही जाचक अटी लादू शकतो. अर्थात, नजीकच्या कालावधीमध्ये स्वत: डोनाल्ड ट्रम्पसुद्धा भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. ट्रम्प यांचा तो दौरावरसुद्धा भारताला पुतीन यांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर लक्षात ठेवावा लागणार आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेला भारत हा देश शेवटी जगातील अनेक देशांसाठी मोठी बाजारपेठ असल्याने अमेरिका आणि रशिया या देशांचे नेते भारताबरोबर संबंध ठेवायला उत्सुक असतील तर त्यात नवल नाही. पण दीर्घकाळ भारताचा जो नैसर्गिक मित्र आहे त्या रशियाचे प्रमुख नेते दीर्घकाळानंतर भारतात येत असल्याने भारताने आपल्याला हितकारक ठरतील अशा गोष्टी या दौऱ्याच्या निमित्ताने पदरात पाडून घेणे सर्वात महत्त्वाचे ठरेल.

**संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु झाले. सध्या या अधिवेशनात लोकशाही प्रणालीच्या नव्या नव्या विचारांना फार मोठी संधी दिली जात नाही. उलट ताकदीच्या जोरावर जेवढ्या लवकरात लवकर विषय आवरता येतील तेवढे आवरले जातात. वास्तविक संसद सुरु झाल्यानंतर लोकशाहीच्या निरनिराळ्या विषयांवर निरनिराळ्या विद्वानांची मते सविस्तरपणे ऐकावयास मिळतील अशा पद्धतीची अपेक्षा अभ्यासू नागरिकांची असते.**



# विचारांचा मान राखावा

सर्वच नागरिक संसदेत जावू शकत नाहीत, एखादाच माणूस खासदार होवू शकतो परंतु या निरनिराळ्या मंडळींचे विचार हे अत्यंत उच्च रितीने आपल्याला समजतील अशी अपेक्षा असणे हे अत्यंत जरुरीचे आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विरोधी पक्ष मांडत असलेल्या विचारांना ड्रामा अशी संज्ञा दिली, त्याने जनतेचे मन खिन्न झाले, विरोधक संसदेत मनापासून बोलत असताना त्यांच्या चेहऱ्यावर भावना असणारच. त्या भावनांना ड्रामा म्हणता येणार नाही याचे सामान्य विचारी जनतेला प्रचंड वाईट वाटते.

खरे तर मल्लिकार्जुन खर्गे यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास संसदीय शिष्टाचाराची ही पायदळी तुडवण्याची घटना म्हणावी लागेल. खर्गे हे फार जुने सदस्य आहेत, त्यांना ही घटना खटकली त्यामुळेच त्यांनी पंतप्रधानाना योग्य त्या शब्दात आपल्या मनातील भावना सांगितल्या. अत्यंत तरुण खासदार असलेल्या खा. प्रियंका गांधी यांनी तरी मुद्दे मांडणे म्हणजे नाटक नव्हे असे स्पष्टपणे सांगितले. दिल्लीतील प्रदूषण प्रश्नावर किंवा इतर प्रश्नावर भाषण करताना जे जे मुद्दे खटकले ते मुद्दे सांगणे म्हणजे नाटक असे म्हणता येणार नाही.

काही काही मुद्यांवर प्रियंकाजी बोलतात त्याचे लोकांना खऱ्या अर्थाने लोकशाहीतील खरे शब्द असेच वाटते. त्या म्हणतात, एसआयआर असो किंवा प्रदूषण असो या मुद्यांवर संसदेत चर्चा होणे गरजेचे आहे. त्यावर बोलणे, नाटक वाटणे म्हणजे सभासदांचा अपमान आहे. आणि त्यांनी हे उद्गार संसदेतील उपस्थित पत्रकारांच्या समोरही काढले. संसद ही सर्व विचारांची आहे.देशातील कानाकोपऱ्यातील प्रतिनिधी या ठिकाणी येतात. आणि म्हणूनच अत्यं४त वयोवृद्ध असलेल्या खर्गे यांच्या सारख्या नेत्यांनी कोणताही विषय मांडताना त्यासंबंधी सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. काही निर्णय हे विरोधी पक्षांचे सामुदायिक असतात त्याचा मान करणे गरजेचे आहे. त्यात फूट पाडणे बरोबर नाही. हे सगळे विषय राष्ट्र हिताचे असतात त्यामुळे काहिंना दालनात भेटणे आणि काहिंना ड्रामा म्हणणे या लोकशाहीतील व्यथा आहेत. अशीच प्रतिक्रिया ज्येष्ठ मंडळींनी या ठिकाणी केली. लोकसभा म्हटल्यानंतर घोषणाबाजी आलीच, विरोधी बोलणे आले आणि ते सांगताना सत्तारुढ पक्षावर टीकाही आली. ती पचवण्याची ताकद आणि ती पचवत असताना राजीव गांधी यांच्यासारखे मोठे मन हवे, अटलजी वाजपेयी काँग्रेसचे विरोधक होते पण ते आजारी पडल्यानंतर त्यांच्या प्रकृतीसाठी खास व्यवस्था करणारे पंतप्रधान राजीव गांधीच होते याचा विचार करणे गरजेचे आहे.

राजकारणातले वैरत्व हे विचाराचे आहे, ते आर्थिक नितीमत्तेचे आहे, ते सामाजिक परंपरेचे आहे, ते वैयक्तिक नाही. वैयक्तिक नाते अत्यंत जवळचे हवे तरच या प्रेमातून नवी लोकशाही निर्माण होईल. विरोधी पक्षांना कळतच नाही आणि सत्तारुढ पक्षालाच फक्त कळते असे समजावून वाटचाल करता येणार नाही. आजचे सरकारसुद्धा नरेंद्र मोदींना उभा करताना चंद्राबाबूंना बरोबर घ्यावे लागले आणि डावी विचारसरणी असूनसुद्धा सत्तेसाठी नितीशबाबूंना घ्यावे लागले. अशा परंपरेत विचारांचा मान राखणे हे गरजेचे आहे.

**■शामराव कुलकर्णी**

# साधुग्राम तात्पुरता, विनाश कायमचा

**एकीकडे वृक्ष लावा आणि पर्यावरणाचे संरक्षण करा, असा संदेश सेवाभावी संस्थांकडून ,वृक्ष प्रेमींकडून व सरकार कडून दिला जात असताना नाशिकमध्ये नागा साधूंसाठी हजारो वृक्ष तात्पुरत्या गृहासाठी तोडण्याचा प्रताप होत आहे जो की अतिशय चिंताजनक आहे. साधुग्राम तात्पुरता, विनाश कायमचा हा संदेश देत हजारो वृक्षप्रेमी या वृक्ष तोडीला विरोध करत आहे.**



नाशिकमध्ये या वृक्षतोडीच्या विरोधाचा स्वर इतका तीव्र झाला की नागरिकांनी झाडांना मिठी मारत चिपको आंदोलन पुन्हा जिवंत केले. महिला, विद्यार्थी, तरुणाई, सामाजिक संस्था सगळे एकत्र येऊन झाडांसमोर मानवी भिंत उभारली आहे.

पर्यावरणाचे रक्षण व्हावे म्हणून सरकारे वृक्षारोपणावर कोट्यवधी रुपये खर्च करत असताना, महाराष्ट्रातील नाशिकमध्ये १,८४५ झाडांचे बळी दिले जात आहेत. नाशिकमधील तपोवनमध्ये पर्यावरणाला स्वच्छ हवा देणारी हजारो झाडे तोडून कुंभमेळ्यादरम्यान साधु-मुनींसाठी साधुग्राम स्थापन करण्याचा विचार आहे. नाशिक महानगरपालिका तपोवन पाडून साधुग्रामसाठी कायमस्वरूपी वास्तू बांधू इच्छिते.सरकार आणि नाशिक महानगरपालिकेच्या या निर्णयाविरुद्ध लोकांनी निषेध सुरू केला आहे. ते झाडांवर पोस्टर चिकटवून निषेध करत आहेत. झाडे वाचवण्यासाठी जनता रस्त्यावर उतरली आहेच, पण आता अभिनेते सयाजी शिंदेही त्यांच्यात सामील झाले आहेत.हे तेच तपोवन आहे जिथे भगवान रामाने अनेक वर्षे वनवासात घालवली होती. लोक विचारत आहेत, कायमस्वरूपी वास्तू बांधून रामाचे तपोवन वाचवता येईल का? पर्यावरणवाद्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, ते कोणत्याही किंमतीत झाडे तोडू देणार नाहीत.विकासाच्या नावावर आधीच झाडांची,जंगलांची नासधूस होत आहे.विकास आणि पर्यावरण संरक्षण कसे एकत्र आणता येईल? काळजीपूर्वक लक्ष दिल्यास, विकास आणि पर्यावरण संरक्षण एकाच वेळी करता येते. तथापि, राज्यासह देशात, मोठ्या धरणांचे बांधकाम, रस्ते रुंदीकरण, भव्य इमारती आणि आता रेल्वे मार्ग यासारखे चालू बांधकाम प्रकल्प विकासाच्या नावाखाली विनाशाचे दरवाजे उघडत आहेत.

झाडांविना जग भयंकर असेल. झाडांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. आपण जर सगळी झाडं नष्ट केली तर आपल्याला कदाचित या ग्रहावर त्यानंतर जगणं शक्य होणार नाही,असे वेल्समधल्या बँगोर युनिव्हर्सिटीमधल्या पर्यावरणविषय डेटा आणि ॲनालिसिसच्या प्राध्यापक इसाबेल रोसा म्हणतात.

समजा जगातली सगळी झाडं एका रात्रीत नष्ट झाली तर त्यासोबतच ग्रहावरची सगळी जैवविविधताही नष्ट होईल. अधिवास नष्ट झाल्याने जगभरातल्या अनेक प्रजाती नामशेष होतील. म्हणूनच सध्या उरलेली जंगलं नष्ट होणं हे झाडं, प्राणी, बुरशी आणि इतरांसाठी आपत्ती ओढावणारं ठरेल असं ब्राझीलमधल्या रिओ दि जानेरो स्टेट युनिव्हर्सिटीमधले पर्यावरणशास्त्रज्ञ जेमी प्रेवेडेल्लो म्हणतात.हा विनाश फक्त जंगलांपर्यंतच थांबणार नाही. झाडा-झुडपांवर अवलंबून असणाऱ्या वन्य प्राण्यांचाही यामुळे विनाश होईल. खुल्या जागांपेक्षा जिथे तुरळक प्रमाणात झाडं आहेत तिथली जैवविविधता ५० ते १०० टक्के जास्त होती असं २०१८मध्ये प्रेवेडेल्लो आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आढळलं होतं.एखाद्या मोकळ्या भागात असलेलं एकटं झाडंही जैवविविधतेसाठी चुंबकासारखं काम करतं.यामुळे अनेक प्राण्यांना किंवा झुडपांना मदत मिळते. म्हणूनच तुरळक असणारी झाडं कापण्याचाही स्थानिक जैवविविधतेवर मोठा परिणाम होऊ शकतो.

**■प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार,ता.५.१२.२०२५,**विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे, दक्षिणायणे,हेमंत ऋतो,मार्गशीर्ष मासे, कृष्ण पक्षे, प्रतिपदा तिथी, २४.५७ नंतर द्वितीया तिथी,रोहिणी नक्षत्र, ११.४८ नंतर मृग नक्षत्र,वृषभ रास, २२.१७ नंतर मिथुन रास, सिध्द योग,८.०९ नंतर साध्य योग २७.५० पर्यंत,बालव करण १४.५० नंतर ,कौलव करण, २४.५७ पर्यंत, दिनमान ११.०३, सुर्योदय ६.५२, सुर्यास्त १७.५५(कोल्हापूरचे), राहू काळ सकाळी १०.३० ते १२,इष्टी,उत्तम दिवस,सर्व कामास शुभ, कुपनलिका, गुरू वक्रीच्या मिथुन राशीत प्रवेश १७.२४.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-दिवसाची सुरवात तुम्ही योग साधनेने करू शकता. आजच्या दिवशी तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. वैवाहिक आयुष्यातील आजचा सर्वोत्तम दिवस असेल.

**वृषभ**-तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. आज तुम्हाला समजू शकते की, धन विनाकारण आणि न विचार करता खर्च करणे किती नुकसान पोहचवते.

**मिथून**- व्यवसायातील आपल्या कौशल्याची कसोटी लागण्याची शक्यता आहे.अपेक्षित फळासाठी तुम्ही तुमचे सारे लक्ष प्रयत्नांवर केंद्रित करावे.तुम्हाला बराच रिकामा वेळ आहे.

**कर्क**-आज तुम्ही एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल. गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल.

**सिंह**-आर्थिक प्राप्ती चांगली राहिल.येणे वसूल होईल.उत्तरार्धात कामात यश मिळेल.शेतीची कामे होती.नवीन कल्पना सुचतील. गुणवत्ता वाढवा.सामाजिक कार्यात सहभाग राहिल.

**कन्या**- गुंतवणूक करण्यापासून सावध राहा. कौटुंबिक जबाबदाऱ्या बंधनांकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. निष्काळजीपणा महागात पडू शकतो.

**तुळ**-आज या राशीतील काही बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते ,ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. सहजीवनाची अनुभुतीदेखील जाणवेल.

**वृश्चिक**-आज तुमची प्रकृती चांगली राहील. त्यामुळे तुम्हाला यश मिळेल. परंतु, तुमचे सामर्थ्य संपुष्टात येईल असे काही करण्याचे कटाक्षाने टाळा. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा

**धनु**-तुमचा पैसा तेव्हाच कामाला येईल जेव्हा तुम्ही त्याला संचित कराल ही गोष्ट योग्य प्रकारे जाणून घ्या अथवा येणाऱ्या काळात पश्चाताप करावा लागेल.

**मकर**-आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगला दिवस. तुमचे उल्हासित मन तुम्हाला योग्य ती ऊर्जा पुरवेल आणि आपणास आत्मविश्वास मिळवून देईल.

**कुंभ**-आज तुम्ही रिकाम्या वेळेत कुणासोबत भेट घेणे ही पसंत करणार नाही आणि एकांतात आनंदी राहाल.तुमच्या जोडीदाराने दिलेल्या सरप्राइझमुळे तुमचा गेलेला मूड परत येईल.

**मीन**-सुयोग्य कर्मचाऱ्यांना नोकरीत बढती किंवा आर्थिक फायदा मिळेल. नव्या कल्पनांची परिक्षा घेण्यासाठी योग्य दिवस आहे. तुमचे वाचवलेले धन आज तुमच्या कमी येऊ शकते.

## वाचकांचा पत्रव्यवहार

# सर्पदंशावर महाराष्ट्र सरकारचा स्वागतार्ह निर्णय

राज्यात विशेषत: ग्रामीण भागात सर्पदंशाच्या घटना घडत असतात. साप चावल्यानंतर त्याचे विष किती घातक व सर्पदंशानंतर संबंधितावर वेळीच उपचार करणे शक्य व्हावे यासाठी स्नेक विनोम रॅपिड टेस्ट किट खरेदी करण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय स्वागतार्ह म्हणावा लागेल. राज्यांतील आरोग्य संस्थांना ३४ जिल्ह्यासाठी किट खरेदीची परवानगी देण्यात आली आहे यासाठी ६ कोटी १४ लाख ४३ हजार ७४८ रुपयांच्या खर्चास राज्य सरकारने मान्यता दिली असल्याचे वृत्त आहे. राज्यांतील सर्पदंशग्रस्त रूग्णांच्या उपचारात क्रांतिकारी बदल घडवणारा महत्वपूर्ण निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे.सर्पदंशानंतर रुग्णांवर केलेल्या उपचारापूर्वी दंश विषारी सर्पाचा आहे की नाही याची तत्काळ माहिती स्नेक विनोम रॅपिड टेस्ट किट यामुळे मिळणार आहे त्यामुळे या निर्णयाला राज्यभरातील सर्व आरोग्य संस्थांना खरेदी प्रक्रियेस प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे या किटमुळे सर्पदंशच्या प्राथमिक उपचारात अचूक निदान शक्य होणारं असून अँटी स्नेक विनोमचा अनावश्यक वापर टळून रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी मदत होणार आहे. ग्रामीण भागांसह दुर्गम भागात साप चावण्याचे प्रमाण अधिक आहे. वेळेत उपचार न झाल्याने अनेकांना आपल्या प्राणास मुकावे लागले आहे.शेतकरी रात्रंदिवस शेतामध्ये काबाड कष्ट करत असताना साप चावल्याच्या ताज्या घटना आहेत. राज्य सरकारने अशा रुग्णांवर तातडीने उपचार व्हावेत यासाठी घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल. स्नेक विनोम रॅपिड टेस्ट किटमुळे लवकर निदान झाल्याने ग्रामीण व आदिवासी भागातील रुग्णांना सर्वाधिक दिलासा मिळणार आहे.

**■राजू जाधव,मांगूर**

# अंमली पदार्थ मुक्त भारत व्हावा



मणिपूरमध्ये आसाम रायफलनी टेन्गनौपाल जिल्ह्यातील १५ एकर बेकायदेशीर अफूची शेती नष्ट केली, त्यासाठी केलेली तात्पुरती सिंचन व्यवस्था हटवली,तसेच रासायनिक फवारे पंप, शेतीचे साधने, तणनाशकेही नष्ट केली गेली. आत्तापर्यंतच्या या मोहिमेत हजारो एकराहून अधिक असलेल्या अफूच्या शेतीचा नाश करण्यात आला आहे. अफू आंतरराष्ट्रीय बाजारात एक ते दीड लाख रुपये किलो या दराने विकली जाते त्यामुळे अशा शेतीला अधिकाधिक मागणी आहे. मणिपुर सारख्या डोंगराळ भागांमध्ये अफूची शेती करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. अफूच्या शेतीतून मिळणाऱ्या कोट्यावधी रुपयांच्या माध्यमातून गुन्हेगारी पोसली जाते. मणिपूरला अशांत, हिंसक आणि अस्थिर करायचे आणि त्याला त्याच स्थितीत ठेवायचे मूळ अफू सारख्या अंमली पदार्थाच्या शेतीत आहे. अशा शेतीतून निर्माण झालेला माल म्यानमार, चीन, अफगाणिस्तान, पाकिस्तान या देशात मोठ्या प्रमाणात पाठवला जातो. अंमली पदार्थांच्या व्यापारातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते तसेच त्यामधून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असतो. अंमली पदार्थ सेवनाचे लोण आता शाळा महाविद्यालयांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे लहान, तरुण मुले, मुली ह्याच्या आहारी गेले आहेत. संपूर्ण देशाला पर्यायाने सरकारी यंत्रणेला पोखरण्याचे सामर्थ्य या अंमली पदार्थाच्या तस्करीत दडलेले आहे. केंद्र आणि राज्य सरकारने अंमली पदार्थमुक्त भारत हे स्वप्न साध्य करण्यासाठी तत्परतेने पावले उचलणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक नागरिकांनी अशा पदार्थाच्या सेवनाने होणाऱ्या गंभीर परिणामांची जाणीव आपल्या मुलांना देऊन त्यांना यापासून परावृत्त केले पाहिजे. सकस आहार, चांगले आचरण आणि सकारात्मक विचार देणारी आपली परंपरा,संस्कृती आहे आणि त्याबद्दल आपल्या मुलांना सांगणे, धर्म शिक्षण देणे गरजेचे आहे. स्वत:ला, समाजाला आणि देशाला सार्वभौम स्थितीत आणायचे असल्यास हे करणे गरजेचे आहे.

**■लीना गाडगीळ**

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# निपाणी शहरासह उपनगरात चोरट्यांचा धुमाकूळ

## ▪ सलग चोऱ्यांमुळे नागरिकात भितीचे वातावरण
## ▪ चोरट्यांचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर आव्हान

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**निपाणी शहरासह उपनगरात दिवसेंदिवस चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच आहे. १५ दिवसात चोरट्यांनी कुलूपबंद घरे लक्ष्य केली असून सोन्या चांदीसह लाखो रूपयांचा ऐवज लंपास केला असून पोलिसांसमोर चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.**

निपाणीत आठवडाभरात अष्टविनायकनगर पंतनगर, बिरोबा माळ व शिवाजीनगर या चार ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या त्या संदर्भात सीपीआय बी.एस.तळवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याची मागणी

सीसीटीव्हीच्या आधारे चोरट्यांचा तपास करण्यासह चोरीच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. याची दखल घेताना निपाणी शहर व उपनगरातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याची मागणी सुज्ञ नागरिकांतून होत आहे.

### मटका जुगाराचे प्रमाण वाढले

शहरी तसेच ग्रामीण भागातील अनेक युवक चैनीच्या आहारी गेल्याचे दिसून येत आहे.यातून कमी कालावधीत पैसे



मिळविण्यासाठी चुकीच्या मार्गाला जात आहेत. शहरात गांजा, मटका तसेच जुगाराचे प्रमाण देखील वाढले आहे.यातून अनेक युवक चोरीच्या घटनांमध्ये सहभागी होत असल्याचे दिसून येत आहे.

### पोलिसांबरोबरच...नागरिकांचीही जबाबदारी....

सध्या ऊस गळीत हंगाम सुरु आहे. त्यामुळे अशा काळातच घरफोडीचे प्रमाण वाढते. यामध्ये नागरिकांनी सहलीवर, विवाह समारंभ अथवा धार्मिक कार्यक्रम, देवदर्शन, परगावी जाण्यापूर्वी घरातील दागिने, रोकड शक्यतो बँकेत ठेवावी. सर्व लॉक व्यवस्थित बसविले का, याची खात्री करा. बाहेरगावी जाताना संबंधित पोलिस ठाण्याशी संपर्क साधून शिवाय शेजाऱ्यांना, मोजक्या नातेवाईकांना माहिती द्या. शिवाय आपल्या परिसरात संशयास्पद वस्तू अथवा व्यक्ती आढळून आल्यास (११२) या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करा.विशेष करून शाळा-कॉलेजला उन्हाळी सुटी मिळाल्यावर अधिक चोऱ्या होत असल्याचे आकडेवारी सांगते. या कालावधीत काळजी घ्यावी.तसेच शक्य असल्यास आपल्या घर, बंगला परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. निपाणी शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता व हे शहर सीमेवर असल्याने महाराष्ट्र-कर्नाटक सीमांचा फायदा आपुसकच चोरट्यांना होत आहे.

# मुरगूड ग्रामीण रुग्णालयात सुविधा पुरवा

## ...अन्यथा ९ डिसेंबरला ग्रामीण रुग्णालयाच्या दारात ठिय्या आंदोलन

मुरगूड,ता.४(प्रतिनिधी)-

**मुरगूड ग्रामीण रुग्णालयातील विविध अपुऱ्या सुविधा व समस्याबाबत विविध संघटना, पक्ष, कार्यकर्ते यांनी यापूर्वी प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा, निवेदन, आंदोलने इत्यादी मार्गाने लक्ष वेधले होते पण याबाबत आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही.**

याबाबत त्वरित कार्यवाही न झाल्यास मंगळवार ता.९ डिसेंबर रोजी काँग्रेस पक्षाकडून ग्रामीण रुग्णालयाच्या दारात ठिय्या आंदोलन करणार आहोत, असा इशारा कागल तालुका काँग्रेस तालुकाध्यक्ष अॅड.दयानंद पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, कागल तालुक्यातील मुरगूड शहर तसेच परिसरातील ३५ ते ४० डोंगराळ गाव, खेडी, वाड्यातील नागरिकांच्या आरोग्यासाठी मुरगूड येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले आहे. या ठिकाणी दररोज शेकडो बाह्यरुग्णांची तपासणी व औषध उपचार



निवासी जिल्हाधिकारी यांना मागणीचे निवेदन देताना कार्यकर्ते

होत असतात. या ठिकाणच्या आवश्यक कोणत्याही अत्याधुनिक सुविधा उपलब्ध नाहीत. एक्स-रे, इंडोस्कॉपी स्कॅनिंग इत्यादी सोयी नाहीत. साथरोग,ऑर्थोपेडिक विभाग, डायलिसिस विभाग, क्षयरोग विभाग इत्यादी विभाग नव्याने सुरू करणे आवश्यक आहे. तसेच डिलिव्हरी तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये या ठिकाणी वेळीच उपचार होत नाहीत.विविध लसी,औषधे, गोळ्या यांचा अपऱ्या पुरवठ्यामुळे रुग्णांची हेळसांड होते. दवाखान्यातील आवश्यक डॉक्टर्स व इतर अपुरा स्टाफ भरण्याबद्दल गेली अनेक वर्ष वृत्तपत्राच्या माध्यमातून लक्ष वेधले आहे.

### काँग्रेस पक्षातर्फे निवासी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष सुशांत पाटील, युवा काँग्रेस शहराध्यक्ष दीपक शेणवी, सुरज सातवेकर, सचिन कुंभार यांनी निवासी जिल्हाधिकारी गजानन गुरव यांना मागणीचे निवेदन दिले आहे. निवेदनाच्या प्रती आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खास.शाहू महाराज, आम.सतेज पाटील यांना दिले आहेत. या निवेदनावर लखन मेंडके, विजय पाटील, अमर चौगले, प्रकाश रामाने, सुनील लोहार, दत्तात्रय लोहारअतुल सुतार इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.



## आम.हुक्केरींकडून संकपाळ हायस्कूलला १० लाखाचा निधी

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**श्रीपेवाडी येथील श्री जी.एम.संकपाळ हायस्कूलमध्ये शॉर्टसर्किट होऊन ऑफिस संगणक लॅबचे ४० लाख रूपयांचे नुकसान झाले होते. यामध्ये ३० संगणक, बॅटऱ्या, फर्निचर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते.**

त्यामुळे या घटनेची दखल घेऊन शिक्षक मतदार आमदार प्रकाश हुक्केरी यांनी हायस्कूलला दहा लाखाचा निधी देण्याचे अश्वासन दिले होते.त्यानुसार १० लाखांच्या निधी मंजूरी पत्राचे वितरण आम.हुक्केरी यांच्या निवासस्थानी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले.त्यामुळे शिक्षणप्रेमीतून समाधान व्यक्त होत आहे.हा निधी मिळवून देण्यासाठी सुजय पाटील-वाळकी, दादासाहेब पाटील-हुन्नरगी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले आहे.त्यामुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आम.हुक्केरी यांचे आभार मानले. शाळेस माजी विद्यार्थ्यांकडूनही मदतीचा हातभार लागला आहे.यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ.अशोक पुजारी,व्हाईस चेअरमन अविनाश पाटील, ज्येष्ठ संचालक दगडू चेंडके, चंद्रशेखर बाडकर, राजू वडगावे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## आडी येथे भजन संध्या कार्यक्रम उत्साहात

कोगनोळी,ता.४(प्रतिनिधी)-

**श्री क्षेत्र आडी (ता.निपाणी) येथे दत्त जयंतीनिमित्त आयोजित परमाब्धिविचार महोत्सवात भजन संध्या कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी मान्यवर कलाकारांच्या गायनाने रसिक श्रोते भक्तीरसात न्हाऊन निघाले.**

रोहिणी पखाले व सहकारी (पुणे), श्रीकांत पोतदार (करजगा), पांडुरंग सुतार (हंचिनाळ के.एस), आश्रमस्थ साधक ज्ञानेश्वर महाराज आदींनी आपल्या अमृतवाणीतून अभंगमाला सादर करुन उपस्थित भाविक-भक्तांना मंत्रमुग्ध केले.

या सर्व कलाकारांना महादेव मोरे यांनी हार्मोनियम तर प्रविण मोरे (कागल) यांनी तबला साथ केली.यावेळी आडी पंचक्रोशीतील भाविक-भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परमाब्धिविचार महोत्सवामध्ये वृत्तपत्राचे योगदान महत्वपूर्ण-परमात्मराज महाराज

कोगनोळी,ता.४(प्रतिनिधी)-

**गेली अनेक वर्षे या ठिकाणी दत्त जयंतीनिमित्त परमाब्धिविचार महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. याशिवाय पौर्णिमा व अन्य धार्मिक कार्यक्रमही या ठिकाणी सातत्याने होत असतात.**

या सर्व कार्यक्रमांना दैनिक महासत्ता या दैनिकाने नेहमीच प्रसिद्धी देऊन सहकार्य केले आहे. यामध्ये पत्रकारांचे योगदान आणि कार्य महत्वपूर्ण व प्रशंसनीय असल्याचे गौरवउदगार प.पू.परमात्मराज महाराज यांनी काढले.श्री क्षेत्र आडी (ता.निपाणी) येथे दत्त जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर देवीदास महाराज, कोगनोळी श्री दत्तगुरु क्रेडिट सौहार्द सहकारी संस्थेचे कार्याध्यक्ष निलेश खोत, व्हा.चेअरमन डॉ.महादेव मिरजे, जनरल व्यवस्थापक जगदीश तोडकर, व्यवस्थापिका विद्‌ला हेगडे, सहाय्यक व्यवस्थापक विजय खोत व मान्यवर उपस्थित होते.



आडी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना प.पू.परमात्मराज महाराज शेजारी अन्य राज्यातील साधुसंत व मान्यवर.

प्रारंभी विठ्ठल खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.याप्रसंगी निलेश खोत, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गायकवाड यांच्यासह मान्यवर व पत्रकारांचा परमात्मराज महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी जगन्नाथ खोत, एम.पी.पाटील, शाहीर संभाजी माने, महादेव मोरे, बाळासो यादव, पांडुरंग सुतार, आनंदा कागले, प्रविण मोरे, योगेश माने यांच्यासह भाविक-भक्तगण उपस्थित होते.

## थोडक्यात



निपाणीः ऋतूराज दबडे याच्या सत्कारप्रसंगी उपस्थित मान्यवर.

### धनलक्ष्मी क्रेडीट संस्थेतर्फे ऋतुराज दबडे याचा सत्कार

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**येथील श्री धनलक्ष्मी क्रेडिट सौहार्द संस्थेचे ज्येष्ठ सभासद विनायक उर्फ झुंजार दबडे यांचे सुपुत्र ऋतुराज याने चार्ट अकाउंटंट परिक्षेत विशेष प्राविण्यासह यश मिळवले आहे.**

याबद्दल त्याचा धनलक्ष्मी संस्थेच्यावतीने संचालक सुनील काळगे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.सत्काराबद्दल दबडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी झुंजार दबडे,स्वाती दबडे,अनिल भोसले, सतीश येडुरे, नितीन साळुंखे, संतोष व्हडगे, भास्कर आजरेकर उपस्थित होते.

### निपाणीत २१ डिसेंबरला फुले-शाहू-आंबेडकर विचार संमेलन

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**येथील डॉ.आंबेडकर विचार मंचच्या वतीने रविवार ता.२१ डिसेंबर २०२५ रोजी मराठा मंडळ निपाणी येथे फुले-शाहू-आंबेडकर विचार संमेलनाचे आयोजन केले आहे.**

या संमेलनास महाराष्ट्रातील दिग्गज विचारवंत सर्वोच्च न्यायालयाचे वकील अॅड.असीम सरोदे, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चल दंगल समजून घेऊ या कवितेने आत्मभान प्राप्त झालेले कवी डॉ.स्वप्निल चौधरी,इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रा.डॉ.कपिल राजहंस यांच्या विचारांचा जागर होणार आहे.संविधानिक लोकशाही व लोक कल्याणाचा करार हा संमेलनाचा प्रमुख विषय आहे.निपाणी परिसरातील समतावादी व परिवर्तनवादी चळवळीमध्ये काम करणाऱ्यांनी या संमेलनास रविवार ता.२१ डिसेंबर २०२५ रोजी मराठा मंडळ निपाणी या ठिकाणी सकाळी ठीक साडेदहा वाजता उपस्थित राहावे, असे संघटनेच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

# कोणत्याही प्रकारच्या त्रुटींना थारा देऊ नका

## जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांच्या सुचना

बेळगाव,ता.४-

**८ डिसेंबरपासून होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्या व उपसमित्यांनी आपल्याला दिलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी. लोकप्रतिनिधी, अधिकारी, पत्रकार आदींसाठी निवास, जेवणखाण व वाहतूक व्यवस्थेची चोखपणे अंमलबजावणी करावी, कोणत्याही प्रकारच्या त्रुटींना थारा देऊ नये, अशी सूचना जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी केली.**

बुधवार ता.३ डिसेंबर रोजी सुवर्णविधानसौधमध्ये अधिवेशन पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. अधिवेशनासाठी नियोजित करण्यात आलेले अधिकारी,



सुवर्णविधानसौधमध्ये आयोजित आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन सोबत अधिकारी वर्ग.

कर्मचाऱ्यांना वाहतुकीची व्यवस्था करावी. अधिवेशन पाहण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णविधानसौधच्या मुख्य द्वारापासून विधानसौधपर्यंत ने-आण करण्यासाठी मिनी बसची व्यवस्था करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली.अधिवेशनासाठी येणारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, आमदार आदींच्या निवास, जेवणखाण आदींची व्यवस्था करावी.अधिवेशनकाळात सुवर्णविधानसौधमध्ये मंत्री, आमदार, अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी जेवणाच्या स्वतंत्र काऊंटरची व्यवस्था करावी. वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शकांची नियक्ती करण्यात आली आहे.

या अधिकाऱ्यांनी वरिष्ठांशी सतत संपर्कात रहावे. गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही कोणत्याही त्रुटींना थारा मिळू नये, यासाठी अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली. जिल्हा पंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शिंदे यांनी अधिवेशन पाहण्यासाठी येणाऱ्या शाळकरी मुलांविषयी आधीच माहिती मिळवावी. परजिल्ह्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती त्या-त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून मिळविण्याची सूचना केली. पोलीस आयुक्त भूषण गुलाबराव बोरसे यांनी सुरक्षा व्यवस्था व पास वितरणासंबंधीची माहिती दिली.



बेडकिहाळ परिसरातील रब्बी हंगामातील शाळु पीक.

## रब्बी हंगामातील पिकांना पोषक वातावरण

बेडकिहाळ,ता.४(वार्ताहर)-

**चालु वर्षी परिसरात ऊस तोडणी हंगाम लांबणीवर गेला असला तरी, सद्या परिसरात जिकडे तिकडे ऊस तोडणीस चांगलाच जोर आला असून, कर्नाटक व महाराष्ट्रातील सुमारे १० ते १२ साखर कारखान्यांच्या वतीने ऊस तोडणी होत असून, दररोज हजारो टन ऊस साखर कारखान्यांना गळीतासाठी जात आहे.**

पहिल्या टप्प्यात व नोव्हेंबर शेवटपर्यंत ऊस तोडणी झालेल्या शेतीतून, शेतकऱ्यांनी रानातील कामे उरकून,रब्बी हंगामातील गहू,हरभरा, शाळू पीक घेत आहेत. तर चालू वर्षी या रब्बी हंगामातील पिकांना चांगले पोषक व अनुकूल वातावरण असल्याने, सध्या ही पीक उत्तम प्रकारे साधल्याचे दिसून येत आहे.

विशेष म्हणजे चालू वर्षी परिसरात रब्बी हंगामातील गहू, हरभरा, शाळू पिकांचे क्षेत्र वाढले असल्याचे दिसून येत आहे.

## निधन वार्ता

### कुरूंदवाडात एकाच दिवशी सख्ख्या बहिणींचे निधन

कुरुंदवाड,ता.४(प्रतिनिधी)

**येथील शिकलगार वसाहतीतील दोघा सख्ख्या बहिणींचे अवघे तासाभराच्या अंतराने निधन झाले.चंदाबाई बाबालाल शिकलगार (वय ८८) तर नाजूक फरीद शिकलगार( वय ८४) या दोघी सख्या बहिणींच्या निधनाने समाजासह सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.**



चंदाबाई शिकलगार नाजुक शिकलगार

मोठी बहीण चंदाबाई यांचे दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान निधन झाल्याने मोठ्या बहिणीच्या निधनाचा धक्का लहान बहीण नाजुक यांना बसल्याने त्यांचे देखील निधन झाले.चंदाबाई यांच्यावर कुरुंदवाडच्या कृष्णा घाटावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार सुरू असतानाच नाजुक यांच्या निधनाचे वृत्त नातेवाईकांना समजताच त्यांनाही स्मशानभूमीत आणण्यात आले.अवघ्या काही तासातच दोघीं बहिणींच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. चंदाबाई आणि नाजुक या दोघी सख्ख्या बहिर्णीचे माहेर इचलकरंजी असून त्यांचे सासर कुरुंदवाड हे होते. त्यांच्या पश्चात मुले, मुलीं, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### गंगुबाई कुंभार

रुई,ता.४-

रुई येथील प्रतिष्ठीत महिला श्रीमती गंगुबाई मारूती कुंभार(वय ९९) यांचे निधन झाले.



त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, नातसुन, परतवंडे असा परिवार आहे.

### विठ्ठल खोत

शिवनाकवाडी,ता.४-

शिवनाकवाडी(ता.शिरोळ) येथील प्रतिष्ठीत नागरिक विठ्ठल दत्तू खोत (शिंगाडी) (वय ६१) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा, मुलगी, सुन असा परिवार आहे.



## महेश बुरुड यांना पीएचडी पदवी

अकोळ,ता.४(वार्ताहर)-

**येथील रहिवासी महेश बुरुड यांना शिवाजी विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे.**



**महेश बुरुड यांनी मेटल ऑर्गेनिक फ्रेमवर्कचे संश्लेषण आणि इलेक्ट्रोकॅटॅलिटिक ऍप्लिकेशन्ससाठी व्युत्पन्न सामग्री या विषयावर प्रबंध सादर केला होता.**

महेश बुरुड यांचा संशोधन प्रबंध पदार्थ रसायनशास्त्रावर केंद्रित होता.या प्रबंधासाठी महेश बुरुड यांना डॉ.अमित.आर.सुपले, डॉ.संदीप.आर.साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. शिवाय प्रा.डॉ. सूरत मांढरे, डॉ.एस.व्ही.पोरे यांचेही सहकार्य लाभले.या यशामुळे त्यांचे अकोळसह परिसरातून कौतुक होत आहे.

# आयको वासियांचा पाण्याचा प्रश्न मार्गी

## ४० वर्षाची प्रतिक्षा संपली; आयकोत पाणी योजनेचा शुभारंभ

बोरगाव,ता.४(प्रतिनिधी)-

**बोरगाव शहराचे उपनगर असलेले आयको येथील मल्लिकार्जुन नगरमधील नागरिकांना गेल्या ४० वर्षापासून नदीच्या पाण्याची व्यवस्था नव्हती.निवडणूक काळानंतर आपण लागलीच या ठिकाणी नदीचे पाईपलाईन करून देऊ, असे उत्तम पाटील यांनी आश्वासन दिले होते.या आश्वासनाची आज पूर्तता करण्यात आली.**

नगराध्यक्ष पिंटू कांबळे यांच्या हस्ते आयको येथे पाणी योजनेचा शुभारंभ करण्यात आला. उत्तम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमासाठी आयको व मल्लिकार्जुन नगर मधील शेकडो महिला व युवक उपस्थित होते.

यावेळी बोलताना उत्तम पाटील म्हणाले, बोरगाव नगरपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगातून बोरगाव शहरापासून ते आयकोपर्यंतच्या नदीच्या पाईपलाईन साठी ४० लाखांचा अनुदान मंजूर झाला आहे. तसेच नळ जोडणीसाठी ५ लाख अनुदान मिळाले आहे. या अनुदानातून या ठिकाणी



बोरगावः आयको येथे नदीच्या पाईपलाईन कामाच्या शुभारंभ प्रसंगी उत्तम पाटील शेजारी नगराध्यक्ष पिंटू कांबळे,उपनगराध्यक्षा भारती वसवाडे,प्रदीप माळी व इतर.

पाईपलाईनचे काम पूर्णत्वास झाले असून या कामाचा शुभारंभ झाला आहे. बोरगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी या ठिकाणी कोट्यावधी रुपयांचा निधी आणण्यात येत आहे.शहर व उपनगरमधील सर्वच मुलभूत सुविधा पुरवण्यासाठी नगरपंचायत बरोबरच शासनाच्या इतर योजनेतूनही आपण निधी आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

किसन पाटील म्हणाले, गेल्या ४० वर्षापासून आम्हाला या ठिकाणी पाण्याची समस्या तीव्र होती.उन्हाळा आला की पाण्याची एकच चिंता असायची.यासाठी आपण उत्तम पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी याबाबत आपण लवकरच तुम्हाला पाण्याची व्यवस्था करून देतो, असे आश्वासन दिले होते.उत्तम पाटील म्हणजे आमच्या भागातील भगीरथ आहेत. त्यांच्याकडून असेच विकास काम होऊ देत अशी आशा व्यक्त केली.

नगराध्यक्ष पिंटू कांबळे, उपनगराध्यक्षा भारती वसवाडे, सभापती प्रदीप माळी, नगरसेवक अभयकुमार मगदूम, शोभा हावले,माणिक कुंभार, तुळसीदास वसवाडे, दिगंबर कांबळे,सौ.अश्विनी पवार, वर्षा मनगुते,गिरिजा वठारे, सुवर्णा सोबाने, संगीता शिंगे,जावेद मकानदार, रुकसाना अफराज,माजी नगराध्यक्ष संगपा ऐदमाळे, ग्रा.पं. माजी अध्यक्ष राजू मगदूम, अशोक वठारे ,बाबासो वठारे, अमर उमराणे, किसन पाटील,अक्षय यादव, विनायक पाटील, सुभाष आरगे, राजू आरगे, महेश कोटरे, सचिन कोळी, दादासो शिरदवाडे,सलीम दानवाडे, आलम मकानदार उपस्थित होते.

# चिक्कोडीत करगाव पाणी योजनेसाठी शेतकऱ्यांचे आंदोलन

■ चिक्कोडी,ता.४(प्रतिनिधी)–

**चिक्कोडी तालुक्यातील व रायबाग विधानसभा मतदारसंघातील करोशी व नागरमुन्नोळी जिल्हा पंचायत व्याप्तीतील करगाव जलउपसा सिंचन योजना व हनुमान पाणी योजनांच्या कामाला त्वरित प्रारंभ करावा व लवकरात लवकर योजना पूर्ण करावी या मागणीसाठी चिक्कोडी येथे गुरुवारी सकाळी दहा वाजल्यापासून आंदोलन करण्यात आले.**

करगाव उपसा सिंचन पाणी योजना लवकरात लवकर पूर्ण व्हावी या मागणीसाठी शेतकरी संघटनेचे राज्याध्यक्ष चुन्नाप्पा पुजारी तसेच उपाध्यक्ष शशिकांत गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली १४ गावांतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने बसव सर्कल येथे जय जवान जय किसान अशी घोषणा देत आंदोलनाला



चिक्कोडी : करगाव पाणी योजना आंदोलनात बोलताना चुन्नाप्पा पुजारी व समोर शेतकरी.

सुरुवात केली.

राजाध्यक्ष चुन्नाप्पा पुजारी म्हणाले, करगाव बसवेश्वर यात निरावरी हा पन्नास वर्षाचा प्रश्न असून येथील शेतकऱ्यांवर मोठा अन्याय झाला आहे. राज्यांमध्ये प्रत्येक वेळी सरकारे येतात-जातात पण करगाव यात निरावरीकडे दुर्लक्ष झाले असून प्रत्येक वेळी रायबागचे आमदार चिक्कोडीचे आमदार पूजा करतात पण कामाला प्रारंभ होत नाही. लवकरात लवकर काम कधी संपवणार आम्हाला लेखी स्वरूपात द्या आणि अनेक शेतकऱ्यांची समस्या असून मार्गी लागावी.

उपाध्यक्ष शशिकांत गुरुजी म्हणाले,देशाचा रक्षक म्हणजे शेतकरी असून शेतकऱ्यावर अन्याय होत आहे. राजकीय नेते आपल्या कामापुरते शेतकऱ्यांचा वापर करतात. निवडणुका आल्यानंतर घरापर्यंत येऊन मते मागतात. पण शेतकऱ्यांची समस्या सोडवत नाहीत. शेतकऱ्यांना तीन-चार तास वीज मिळत असून ती सात तास मिळावी व टीसी मीटर बसवण्यासाठी काही अधिकारी पैसे घेत असून ते थांबावे. करगाव यात निरावरी कधी संपविणार लेखी स्वरूपात द्यावे अशी मागणी अधिकाऱ्यांकडे केली.

यावेळी करोशी, करगाव, बेळकुड, नागरमुन्नोळी, उमराणी, डोनवाड, केरुर, खडकलाट, एकसंबा येथील अनेक शेतकरी व संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनात चिक्कोडी चरमूर्ती मठाचे संपादना महास्वामी यांनी मनोगत व्यक्त केले.

## मोबाईल हिसकावणाऱ्या दोघांना अटक

■ कोल्हापूर,ता.४ (प्रतिनिधी)–

**शेंडा पार्क,आर.के.नगर रोडवर रस्त्यात उभे राहून मोबाईलवर पत्नीशी बोलत थांबलेल्या युवकाच्या हातातील मोबाईल दोघांनी हिसकावून नेला. या प्रकरणी पोलिसांनी दोघा भामट्यांना अटक करून मोबाईल ताब्यात घेतला. २७ नोव्हेंबर रोजी हा प्रकार घडला होता. ३ डिसेंबरला त्यांना अटक केली.**

या प्रकरणी सिध्दारुढ शंकराप्पा शिंगन्नवर (वय २९ रा. मुळ गोरागुड्डी,पोस्ट कडबी, ता. सौदती, जि. बेळगाव, कर्नाटक, सध्या खडीचा गणपतीजवळ, आर. के. नगर, कोल्हापूर) याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी तपास करून संशयित अलताफ आयुब किल्लेदार (वय २२ रा. दत्त मंदिर शेजारी,राजेंद्रनगर,कोल्हापूर), पृथ्वीराज रवी वावरे (वय १९ रा. राजेंद्रनगर,कोल्हापूर) यांना अटक केली आहे.

# हालशुगरकडून पहिल्या पंधरवड्याचे ऊस बिल अदा–एम.पी.पाटील

■ निपाणी,ता.४(प्रतिनिधी)–

**येथील श्री हालसिद्धनाथ को-ऑप शुगर फॅक्टरीकडून पहिल्या पंधरवड्याचे ऊस बिल अदा केल्याची माहिती चेअरमन एम.पी.पाटील यांनी पत्रकाद्वारें दिली.**



पत्रकात म्हटले आहे की, चिकोडी लोकसभा क्षेत्राचे माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले, आमदार शशिकला जोल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली हालसिध्दनाथ कारखान्याचा सन २०२५ -२६ या सालचा ऊस गाळप हंगाम १० नोव्हेंबर २०२५ पासून प्रारंभ झाला आहे.

सदर ऊस गाळप हंगामामध्ये गाळप होणाऱ्या ऊसास प्रति टन ३३६० रूपये प्रमाणे दर जाहीर केला आहे. त्यानुसार १०/११/२०२५ पासून ३०/११/२०२५ या कालावधीमध्ये गाळप केलेल्या ८२९१० मे टन ऊसाची पहिली उचल ३२६० रूपये प्रमाणे होणारी रक्कम २७.०३ कोटी ५/१२/२०२५ रोजी ज्या त्या ऊस पुरवठादार/शेतकरी यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे. तसेच इथून पुढे ही ऊस गाळप होणाऱ्या ऊसाच्या बिलाची रक्कम ऊस पुरवठादार शेतकरी यांच्या खात्यावर वेळेत जमा करण्यात येईल.

जोल्ले दांपत्याच्या मार्गदर्शनाखाली कारखाना शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवत आहे.

याचाच एक भाग म्हणून ऊस उत्पादन स्पर्धा एक आहे. एकरी जास्तीत जास्त ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर कारखान्याच्या विस्तारीकरणानुसार प्रति दिन ११,००० टीसीडीने ऊस गाळप सुरू आहे.शेतकऱ्यांना जलद गतीने सेवा देत असून ऊस बिल ही जलद गतीने अदा करीत आहे.

तसेच कारखान्याच्या सर्व वर्गाच्या सभासद यांना कळविणेत येते की, सन २०२४ या सालची सभासद साखर वितरण अवधी ३१-१२-२०२५ अखेर आहे. ज्या सभासदानी अजून पर्यंत आपली साखर उचल केलेली नाही. त्यांनी ३१-१२-२०२५ अखेर कार्यालयीन वेळेत व दिलेल्या अवधीत आपल्या कार्डची साखर न चुकता घेऊन जावे,असे आवाहन एम.पी. पाटील यांनी केले आहे.

# निपाणी शहरात श्री दत्त जयंती उत्साहात साजरी

■ निपाणी,ता.४(प्रतिनिधी)–

**निपाणी शहरात गुरूवारी दिगंबरा... दिगंबरा.. च्या निनादात श्री दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातील विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

येथील भाविकांचे श्रध्दास्थान श्री दत्त मंदिरात विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले.सकाळी दत्त जयंती महोत्सवास सुरवात करण्यात आली. पहाटे पंचसूक्त पवमान, अभिषेक, रूद्राभिषेक, पहिली पूजा झाली.

दुपारी विधीवतपणे १२ वा. महापूजा झाली. सायंकाळी ५:३५ वा. जन्मकाळ सोहळा झाला. यावेळी महिला भाविकांनी पाळणा आरती गायिले. त्यानंतर सुंठवडा प्रसाद वाटप करण्यात आला. रात्री ८ वा. पालखी सोहळा व मंत्रपुष्प आदी कार्यक्रम भक्तिमय वातावरणात झाले. यरनाळकर बंधुंनी दत्त सेवा बजावली. दिगंबरा..दिगंबरा.... श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या गजरात हजारो भाविकांनी दिवसभर येथे दर्शनाकरीता रिघ लावली होती. अनेक ठिकाणी महाप्रसादाचे वाटप झाले.

येथील ढेरे गल्ली दत्त मंदिरात विश्वस्त मंडळाच्या वतीने दत्त जयंती साजरी करण्यात आली.येथे दुपारी १२ वा. अभिषेक, पूजा, आरती झाली. सायंकाळी ५:५१ वा. श्री दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ढेरे गल्ली महिला मंडळातर्फे पाळणा गीत गायिले.

# ट्रक घेण्यासाठी माहेरहून पैसे आणण्याकरिता विवाहितेचा छळ

■ सांगली,ता.४(प्रतिनिधी)–

**ट्रक घेण्यासाठी माहेरहून पैसे आणावे यासाठी विवाहितेचा छळ करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी पीडित विवाहितेचा पती संशयित नवनाथ भिकू आगलावे (वय ३६ ), दीर पंढरी भिकू आगलावे (वय ३८) आणि बापू भिकू आगलावे (वय ४०, रा. सोनंद, ता. सांगोला) या तिघांचविरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

पीडित विवाहिता दीपाली नवनाथ आगलावे ही सध्या गव्हर्मेंट कॉलनीतील स्मृती चौक परिसरात राहत आहे. ती धुणीभांडी आणि मजुरी करून आपले आणि मुलाचे पोट भरत आहे. तिने पती आणि दोन दिरांच्या विरोधात फिर्याद दिली आहे.

२०२१ पासून आतापर्यंत ट्रक खरेदी करण्यासाठी माहेरहून पैसे आणावेत म्हणून आपल्याला शिवीगाळ करून मारहाण केली जात होती. शहरातील गणेशनगर मधील तिसऱ्या गल्लीत आणि इतर ठिकाणी भाड्याने रहात असताना सतत आपला छळ केला गेला आहे. माझे दागिने गहाण ठेवले होते. ते त्यांनी परस्पर सोडवून घेतले आहेत. मला आणि माझ्या मुलाला मारण्याची धमकी दिली गेली असल्याचेही पीडितेने पोलिसांत दिलेल्या फिर्यादित म्हटले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसीने कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन - जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी तहसिल हातकणंगले पैकी मौजे माणगांव येथील गट नं.८२१ क्षेत्र हे. ०.५७ आर, आकार रु.४ = ९४ पै. ची पुरे गट नंबरची शेतजमिनीपैकी क्षेत्र हे.०.२८.५० आर, आकार रु.२=४७ पैसेची पिकाऊ शेतजमिन मिळकत यासी चतु:सिमा-पुर्वेस-डिसोझा यांची मिळकत,पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - अभय पाटील (बेले) यांची मिळकत, उत्तरेस - रस्ता२) वर नमूद मिळकतीचे मालक श्री. संकेत निळकंठ मुगुळखोड, रा. माणगाव यांनी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून तोंडी करारपत्र करुन दिले आहे.३)सबब वर नमूद मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, करार मदार, तारणगहाण, दान, हिस्सा, इजमेंट, अॅटॅचमेंट, कोर्ट हुकूम, वाटणी वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची मिळकत प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत सर्व अस्सल कागदपत्रासह खालील पत्त्यावर लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही तक्रार अगर हरकत न आलेस सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे आमचे अशिल खरेदीपत्राचा व्यवहार पूरा करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारींचा व हरकतींचा विचार केला समजून जाणार नाही म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. ३/१२/२०२५.

**ॲड.रोहित राजेश पाटील**
ऑ. विलासमती कॉम्प्लेक्स, महासत्ता चौक, इचलकरंजी.
मो. ९०२८८८८८९

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन:- **मौजे कोरोची** येथील गट नं ६१० मधील बिगर शेती झालेला प्लॉट नंबर ०१ मधील पश्चिम बाजूचे **क्षेत्र १६० - ०० चौ.मी. खुली जागा** यासी चतु:सिमा **पूर्व- राजाराम शिवराम चौगुले यांची मिळकत, पश्चिम-ओपन स्पेस, दक्षिण- २० फुटाचा रस्ता, उत्तर- प्लॉट नं. २. ची मिळकत, सदरची मिळकत ही श्रीकांत संभाजी साळी** यांच्या मालकीची असून त्यांनी सदरची मिळकत ही आमच्या पार्टीस संचकार चिठ्ठीने लिहून दिलेली असून त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा कांहीही हक्क, हित संबंध, दावा तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी तक्रारी नोंदवावी. म्हणून दिली नोटीस दि. ०३/१२/२०२५

**विश्वनाथ कृष्णा घाटगे**
(स्टॅम्प रायटर)
१०/५६३,विक्रमनगर इचलकरंजी
फोन नंबर ९८२३४५८५८५

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन :- शहर इचलकरंजी येथील सि.स.नं. १७५५७/१५ याचे क्षेत्र २८० चौ.मी.ची खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस- प्लॉट नं.२० ची मिळकत, पश्चिमेस ६ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस-६ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस- प्लॉट नं. १४ ची श्री. शहा यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत श्री. आण्णासाहेब पिरगोंडा पाटील, रा. इचलकरंजी यांचे मालकी वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना दिलेला आहे व सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकार रक्कम स्विकारुन संचकारपत्र करुन दिलेले आहे. सबब वर नमूद मिळकतीबाबत वित्तीय संस्थेचा अगर कोणाचा काही कायदेशीर हक्क,खरेदीपूर्व करारपत्र, तारण, खाजगी कर्ज, हद्दीवरुन वाद, कुळ हक्क वगैरे असलेस ते त्यांनी ७ (सात) दिवसात नोटीस प्रसिध्द करणार यांना लेखी/कागदोपत्री कळवावेत. मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस मिळकत निर्वेध समजून खरेदीचा व्यवहार पूरा केला जाईल. म्हणून प्रसिध्द केली नोटीस. ता.

**ॲड.अभिजीत के. माने**
४/३०३, पोवार गल्ली, इचलकरंजी जि. कोल्हापूर
मो.नं. ९३२५६१६१७४

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन:- मौजे हातकणंगले येथील गट नं ७९५ मधील शेती जमीन त्याचे क्षेत्र हे आर.१-०८ ची शेत जमीन मिळकत यासी चतु:सिमा पूर्व- नामदेव खोत व इतर यांची मिळकत, पश्चिम- गुंडा, भाऊसो इरकर यांची मिळकत,दक्षिण- गोपाल गुरव यांची मिळकत, उत्तर- रस्ता,सदरची मिळकत ही निवास श्रीपती चौगुले व दिलीप रामचंद्र मोहिते यांच्या मालकीची असून त्यांनी सदरची मिळकत ही आमच्या पार्टीस संचकार चिठ्ठीने लिहून दिलेली असून त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे.सदर मिळकतीवर पार्श्वनाथ को ऑप बँक लिमिटेड शाखा कोल्हापूर बोजा असून व सोनाली ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांचा जप्ती आदेश नोंद असून याशिवाय सदर मिळकती बाबत कोणाचा काहीही हक्क, हित संबंध, दावा तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी तक्रारी नोंदवावी. म्हणून दिली नोटीस.
दि.०४/१२/२०२५.

**विश्वनाथ कृष्णा घाटगे**
(स्टॅम्प रायटर)
१०/५६३, विक्रम नगर इचलकरंजी
मो. ९८२३४५८५८५

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांना कळविणेत येते की, मौजे खोतवाडी येथील क.गट नंबर ८८ क्षेत्र हे.आर.८-८० पोट खराब हे. आर . ० - ५२ आकार रूपये १४-०५ पैसे ची खुली जागा यापैकी गुंठेवारी बिगरशेती झालेली भूखंड क्र. ९३ याची मोज मापे - पुर्व बाजू २०-० फुट, पश्चिम बाजू २०-० फुट, दक्षिण बाजू ४०-० फुट, उत्तर बाजु ४०-० फुट याचे एकुण क्षेत्र चौ. फुट ८००-० याचे चौरस मिटर ७४-३४ याचे ऑनलाईन ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र हे.आर.पॉ.०-००-७४ आ.रू. ० - ०१ पैसे ची गुंठेवारी बिगरशेती खुली प्लॉट जागा सर्व यासी चतु: सिमा- पुर्वेस - १५ फुट रूंदीचा रस्ता, पश्चिमेस - भूखंड क्रं.८० ची श्री. निवृत्ती शिंदे यांची मिळकत, दक्षिणेस-३० फुट रूंदीचा रस्ता, उत्तरेस - भुखंड क्रं. ९२ ची श्री. दत्तात्रय मलाबादे यांनी विक्री केलेला भूखंड येणेप्रमाणे चतु:सिमेतील वर्णनाची मिळकत त्यातील तदंगभुत व झाडझुडपासह सर्व मिळकत ही सौ. गायत्री गणेश हांजी रा. इचलकरंजी यांचे मालकीची असुन ती त्यांनी आमचे स्नेही यांना लेखी संचकारपत्र करून कायम व खुष खरेदी देणेची ठरलेली असुन त्यापोटी संचकार दाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे स्नेहींना दिला आहे. तरी लवकरच आमचे स्नेही सदर मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण करून घेणार आहेत तथापी सदर मिळकतीवर अन्य कोणाचा कसलाही कोणत्याही प्रकारचा वाद, दावा, गहाण, करार, बक्षिस, हक्क व अधिकार असलेस संदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व मुळ कागदोपत्रानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीअंती कोणाची कसलीही तक्रार आमचे स्नेहींवर बंधनकारक नसेल. म्हणून दिली जाहीर नोटीस.
दिनांक- ०४/१२/२०२५ इसवी.

**श्री.अजय राजाराम कुडाळकर**
बॉण्ड रायटर
राजाराम स्टेडीयम, पार्कींग जवळ गाळा नं.९ इचलकरंजी
मो.९३२६००६८४०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन :- क।। इचलकरंजी महानगरपालिका** हद्दीतील **रि.स.नं.५०७/२** यापैकी क्षेत्र ० हे. २० आरची मिळकत गुंठेवारी नियमाधीन झालेली असुन याचे **भुखंड क्र.२५ ते ३६** असे सलग सर्व भुखंडाचे **क्षेत्र १४९५-५४ चौ.मी.** ची खुली जागा यासी चतु:सिमा पुर्वेस- रस्ता, पश्चिमेस- ओपन स्पेस, दक्षिणेस- रस्ता व उत्तरेस- रि.स.नं.५०७/१ ची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत **सौ.मालती अर्जुन घट्टे, रा.इचलकरंजी** यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारुन तसे लेखी करारपत्र करुन दिले आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार करणेत येणार आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असलेचा निर्वाळा व कायदेशीर पणन योग्य हक्क असलेचा भरवसा मिळकत मालकांनी दिला आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, कर्ज, करार, खरेदी,बक्षीस, इजमेंट वगैरे कसलाही बोजा अगर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत त्याबद्दल लेखी माहिती कागदपत्रासह पटवून द्यावी. येणेप्रमाणे न केलेस असा कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध वा तक्रार नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून तक्रार चालणार नाही. म्हणून प्रसिध्द केली नोटीस. ता.०३/१२/२०२५

**ॲड. गिरीश एन. मुदगल**
१२/१७८, काँग्रेस कमिटी मागे, इचलकरंजी मो.नं.९३२५४९३९४६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांना कळणे करीता

**मिळकतीचे वर्णन** :-जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी तालुका हातकणंगले पैकी कबनूर येथील क.म.नं. ९०८ याचे एकूण क्षेत्र हे. ८.२३ आर. आकार रु.३२-३७ पै. पैकी खाते १४०८५ प्रमाणे मालकीने नोंद असलेले क्षेत्र हे.१.००.६० आर. आकार रु. ३-९६ पै. पैकी शेतजमिन याची अंदाजे मोजमापे दक्षिणोत्तर पूर्व बाजू ३८.२६ मीटर, पश्चिम बाजू ३८.२६ मीटर व पूर्व पश्चिम दक्षिण बाजू ११८.२ मीटर व उत्तर बाजू ११८.३० मीटर याचे जमिनीचे क्षेत्र हे. ०.४८ आर. याचे चौ. फूट ४८७०० याचे चौ.मी. ४५२६ यासी चतु:सिमा-पूर्वेस - सुभाष केसरवाणी यांची जमिन, दक्षिणेस-६० फुटी रस्ता व त्यापलिकडे गट नं. ९०६ व ९०७ ची जमिन, पश्चिमेस-याच नंबर मजकूर पैकी पार्टी नं. २ यांनी विक्री केलेली मिळकत व उत्तरेस- बाळासाहेब धुळगोंडा पाटील यांची जमिन. येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेतजमीन तदंगभुत वस्तुसह व सर्व प्रकारचे हक्कासह जमीन ही अमोल अशोक काडाप्पा, श्रीमती किर्ती प्रेमचंद काडाप्पा, तन्वी प्रेमचंद काडाप्पा,आर्या प्रेमचंद काडाप्पा सर्व रा. कबनूर, ता. हातकणंगले यांच्या मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिल यांना कायम खुषखरेदी देणेचे ठरवून ता. ३०-०६-२०२५ इ. रोजी नोटरी करार अ.नं. ९२/२०२५ चा लिहून दिला आहे. करारातील शर्ती, अटी प्रमाणे आमचे अशिल वरील मिळकत खरेदी घेणार आहेत. तरी कोणाही इसमाचा वरील मिळकतीच्या मालकी कब्जा वहिवाटीशी तसेच करार, खरेदी, बँक बोजा, जप्ती, शासनाची येणे बाकी अगर अन्य कोणत्याही स्वरुपी हक्क संबंध असलेस त्या हक्काच्या झेरॉक्स प्रतीसह लेखी हरकत आमचे ऑफीस मध्ये सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसात द्यावी व लेखी पोच घ्यावी . मुदतीत कोणाचीही तक्रार अगर हरकत न आलेस वरील मिळकत निर्वेध, निष्कर्जी आहे असे समजून आमचे अशिल रजिस्टर खरेदीपत्र पुरे करुन घेत आहेत व कायद्यातील तरतुदी नुसार बोनाफाईड परचेसर फॉर व्हॅल्यु विदाऊट नोटीस या तत्वाने कायदेशीर मालक होतील याची नोंद घ्यावी नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही म्हणून दिली जाहीर नोटीस सही.
ता.०३-१२-२०२५.

**ॲड. विश्वास पां. चुडमुंगे**
४/२००, व्यंकटेश अपार्टमेंट कोर्ट बिल्डींग मागे, इचलकरंजी, मो.९४२२०४३६५७

## जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर

आमचे अशिल सौ. अफसाना अस्लम सनदी, रा.२१/११०९, जवाहर नगर, रोशन मज्जिद जवळ, इचलकरंजी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर यांनी दिले माहितीवरुन, दाखविले कागदपत्राआधारे, त्यांचेकरीता विशेषतः अस्लम दस्तगीर सनदी रा. जवाहर नगर, रोशन मज्जिद जवळ, इचलकरंजी ता.हातकणंगले जि. कोल्हापूर यांचेकरीता ॲड.रियाज रफिक बाणदार यांनी दै. महासत्ता ता.२९/११/२०२५ इ.रोजीचे दै. महासत्ता पान नं.७ वर प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीस व ता. ३०/११/२०२५ इ. रोजी प्रसिध्द केलेल्या चुक दुरूस्ती जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर देणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन –**

जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी व तालुका हातकणंगले, मा. सह दुय्यम निबंधकसो, वर्ग - २, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट झालेली मौजे कबनुर येथील क.ग.नं.७८ पै पैकी मा.मामलेदारसो, हातकणंगले यांचे कडील आदेश क्रं.एल.एन.ए.एस.आर १४३ व १९२/१९६५ इ रोजीचे आदेशाने निवासी कारणाकरीता बिगरशेती झालेली असून त्यापैकी क्षेत्र हे.०.०१.०२ आर, याची मोजमापे २२ फुट बाय ५० फुट याचे क्षेत्र १०२.२३ चौ.मी. याचे ११००.०० चौ.फुटाची खुली प्लॉट मिळकत यांसी चतुःसिमा - पुर्वेस-२० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस-श्री. सिकंदर फकीर यांची मिळकत, दक्षिणेस - श्री. गोंधळी यांची मिळकत, उत्तरेस - श्री.कलंदर फकीर यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसिमेतील बिगरशेती खुली प्लॉट मिळकत व त्यातील तद्ंगभुत वस्तुसह व इजमेंटरी हक्कासह सर्व.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांचे पती श्री.अस्लम दस्तगीर सनदी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची मिळकत होती. आमचे अशिलांचे पती श्री. अस्लम दस्तगीर सनदी यांनी सदरची मिळकत त्यांची धर्मपत्नी म्हणजेच आमचे अशिल सौ. अफसाना अस्लम सनदी यांचेवर असणाऱ्या प्रेमापोटी दोन पंच साक्षीदारांचे समक्ष रक्कम रु.१००/- चे जनरल स्टॅम्पवर नोटरी सिरीअल नं.७७८६ ता.२०/१२/२०२२ इ. रोजीचे हिब्बानामा द्वारे कायम मालकी हक्काने दिलेली मिळकत असून त्यानुसार आमचे अशिलांनी सदरची मिळकत हिब्बानामा द्वारे अस्लम दस्तगीर सनदी यांचेकडून स्विकारलेली आहे. त्यानुसार आमचे अशिल सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार झाले आहेत. श्री. अस्लम दस्तगीर सनदी यांनी आमचे अशिलांचे लाभात करून दिलेल्या हिब्बानामे आधारे सदर मिळकतीचे ७/१२ पत्रकी आमचे अशिलांचे नावाची नोंद मालक कोष्टकी झालेली होती. तद्नंतर आमचे अशिलांनी त्यांच्या कौटूंबिक कायदेशीर गरजेकरीता सदरची मिळकत श्री. नासीर दस्तगीर सय्यद यांना नोंद दस्त नं.३४१३ ता. २६/०६/२०२५ इ. रोजीचे नोंद खरेदी दस्तान्वये कायमखुष खरेदी दिलेली आहे. अशा स्थितीत आमचे अशिलांचे पती श्री. अस्लम दस्तगीर सनदी यांना वर नमुद खाना कोणत्याही प्रकारची तक्रार उपस्थित करणेचा कायद्यानेच हक्क व अधिकार येत नव्हता व नाही.

३) आमचे अशिलांनी अथवा महंमदशरीफ गौस सय्यद, माजिद मेहबुब शेख, नासिर दस्तगीर सय्यद, प्रशांत माणिकराव कांबळे, विपुल अशोक हुंडेकरी, रोहन शिवाजी पाटील, व सृजन शंभु पुजारी यांनी कधीही संगनमताने अस्लम दस्तगीर सनदी यांची फसवणूक करणेचे हेतूने खोट्या सह्या व अंगठे करून बनावट, बोगस व पोकळ नोटरी हिब्बानामा करून घेतलेला नव्हता व नाही. त्याबाबत उपरोक्त नमुद जाहीर नोटीसीचे कामी केलेली कथने साफ खोटी व लबाडीची आहेत. आमचे अशिलांचे पती श्री. अस्लम दस्तगीर सनदी यांनी हिब्बानामेचा दस्त ता.२०/१२/२०२२ इ. रोजी स्वेच्छेने पुर्ण करून दिला असून तद्नंतर सुमारे तीन वर्षाचे कालावधीनंतर अस्लम दस्तगीर सनदी यांनी त्याबाबत हरकत उपस्थित करून आमचे अशिलांशी असणाऱ्या वैवाहिक वादातून खोट्या नाट्या मजकुराची नोटीस प्रसिध्द केली आहे.

४)वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांचेकडे ता.२०/१२/२०२२ इ. रोजीपासुन प्रत्यक्ष मालकी हक्कास व कब्जे वहिवाटीस होती. तद्नंतर आमचे अशिलांनी सदरची मिळकत ता. २६/ ०६/२०२५ इ.रोजीचे नोंद खरेदी दस्तान्वये अलाहिदा विक्री केली असलेने अस्लम दस्तगीर सनदी यांनी प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीवर व चुक दुरूस्ती नोटीसीवर कोणीही विश्वास ठेवू नये. आमचे अशिलांचे पती श्री.अस्लम दस्तगीर सनदी यांचेविरुध्द आमचे अशिलांनी विवाह विच्छेदनाचा अर्ज अलाहिदा मे.सिव्हील जज्ज, ज्युनिअर डिव्हीजन, इचलकरंजी यांचे कोर्टात दाखल केला असलेचे कारणावरून चिडून जावून तसेच शिवाजी नगर पोलीस स्टेशन, इचलकरंजी यांचेकडे फौजदारी कारवाई केलेचे कारणावरुन अस्लम दस्तगीर सनदी यांनी उपरोक्त संदर्भीय खोट्या मजकुराची जाहीर नोटीस प्रसिध्द करून जनमाणसात व समाजामध्ये आमचे अशिलांची बदनामी करणेचा प्रयत्न चालविलेला आहे. त्यासंदर्भात देखील आमचे अशिल अस्लम दस्तगीर सनदी यांचेविरुद्ध योग्य ती फौजदारी स्वरुपाची कारवाई करीत आहेत. याची अस्लम दस्तगीर सनदी यांनी प्रकर्षाने नोंद घ्यावी. म्हणून प्रसिध्द केले जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर सही.
ता.०४/१२/२०२५.

**ॲड.पवनकुमार अ. उपाध्ये,**
९/६३/११, दिपश्रेय, महालक्ष्मी व्हिलेज, साळुंखे मळा, आमराई रोड, इचलकरंजी. मो. ९८२२४४३११७



नारायणराव घोरपडे विद्यामंदिरमध्ये विविध विकास कामांच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आयुक्त पल्लवी पाटील व इतर मान्यवर.

## नारायणराव घोरपडे विद्यामंदिरमध्ये विकास कामांचे उद्घाटन

इचलकरंजी, ता.४–

**येथील साईट नंबर १०२ मध्ये असणाऱ्या श्रीमंत नारायणराव घोरपडे विद्यामंदिर क्रमांक ३९ मध्ये लोकसहभागातून करण्यातआलेल्या विविध विकास कामांचे उद्घाटन इचलकरंजी मनपा आयुक्त तथा प्रशासक पल्लवी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

या शाळेचा भौतिक व शैक्षणिक विकास होण्याकरीता शाळेचे मुख्याध्यापक गणेश साळुंके व त्यांचे शिक्षक स्टाफ प्रयत्न करत आहेत. शाळेत देणगीदारांकडून प्रोजेक्टर भेट मिळाला आहे. त्याची वेगळी प्रोजक्ट रुम तयार करण्यात आली आहे. शाळेतील सर्व वर्गाचे देणगीदारांकडून रंगकाम करुन घेण्यात आले आहे. तसेच शाळेत असणाऱ्या रिकाम्या खोल्यात भागात भरणाऱ्या अंगणवाड्या या खोल्यांचे रंगकाम व दुरुस्ती करण्यात आले आहे. सर्व विकास कामांची पाहणी करुन आयुक्तांनी समाधान व्यक्त केले. या सर्व विकास कामांचे उद्घाटन आयुक्त पल्लवी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांचे सोबत उपायुक्त सुजाता कदम, सहाय्यक उपायुक्त बेबी नदाफ, संजय केंगार, मारुती पाथरवट, मनपा शिक्षण अधिकारी बी.एम.कासार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तम दास हे उपस्थित होते. यावेळी सर्व देणगी दारांचा सत्कार करण्यात आला.



साई इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित स्नेहसंमेलन कार्यक्रमात सरस्वती प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलनप्रसंगी प्रमुख पाहुणे व शिक्षक वृंद.

## साई इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

इचलकरंजी, ता.४–

**येथील श्री साई शिक्षण संस्थेच्या साई इंग्लिश स्कूलचे २५ वे वार्षिक स्नेहसंमेलन घोरपडे नाट्यगृहात उत्साहात संपन्न झाले.**

प्रथम प्रमुख पाहुणे कल्लाप्पाण्णा आवाडे जनता सहकारी बँकेचे संचालक श्रीशैल कित्तुरे व उद्योगपती अनिल कांबळे यांच्या हस्ते व मुख्याध्यापक आर.एन.आळतेकर, मिलिंद कांबळे, सौ. खोत, सौ. मांगले, सौ.कांबळे यांच्या उपस्थितीत सरस्वती देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, महाराष्ट्र संस्कृती दाखविणारे सण, छावा नाटीका इ. सादर करुन उपस्थितांची वाहवा मिळविली. श्रीशैल कित्तुरे यांनी शाळेच्या प्रगतीविषयी कौतुक केले. तर श्री. आळतेकर यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन नाजनीन नदाफ, सौ.परीट, सौ.खोत यांनी केले. तर पाहुण्यांची ओळख सौ.पुजा फडतारे, सौ.संयोगिता पोवार यांनी करुन दिली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

## पासपोर्ट अर्जदारांसाठी बुधवारी संवाद सत्राचे आयोजन

कोल्हापूर, ता.४(प्रतिनिधी)–

**प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, पुणे येथे पासपोर्ट संबंधित समस्यांचे निराकरण करण्याचे संवाद सत्र बुधवार ता.१० डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, पासपोर्ट बिल्डींग, सर्व्हे नंबर ५/२/२ बाणेर–पाषाण लिंक रोड, बाणेर, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे.**

या संवाद सत्रादरम्यान, पासपोर्ट अर्जदार त्यांच्या पासपोर्ट अर्ज/तक्रारीशी संबंधित प्रश्नांसाठी प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना भेटू शकतात. फाईल क्रमांक, नवीनतम पासपोर्ट क्रमांक (जर असेल तर), नाव, थोडक्यात प्रश्न या तपशीलांचा आगाऊ उल्लेख करुन rpo.pune@mea.gov.in पाठवावा. पुणे येथील प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाकडून एक पुष्टीकरण ईमेल पाठवला जाईल. हा पुष्टीकरण ईमेल सादर केल्यानंतरच संवाद सत्रामध्ये प्रवेश दिला जाईल. ओपन हाऊससाठी नोंदणी दुपारी २ वाजता सुरु होईल, असे पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# क्षयरोग निर्मुलनासाठी समुदाय सहभागावर भर द्या

### जिल्हाधिकारी अमोल येडगे; टीबी फोरमच्या बैठकीत आरोग्य विभागाला सूचना

कोल्हापूर, ता.४(प्रतिनिधी)–

**क्षयरोग निर्मूलनासाठी समुदाय सहभागावर भर देत त्यांना आवश्यक ती मदत करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिल्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय टीबी फोरमची बैठक पार पडली. जिल्हा क्षयरोग केंद्र आणि सी.पी.आर.रुग्णालय यांच्यावतीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित टीबी फोरमच्या बैठकीप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी अमोल येडगे, समोर अधिकारी वर्ग.

या फोरमचा उद्देश क्षयरोग निर्मूलनासाठी समुदायाचा सहभाग वाढवणे आणि रुग्णांना केंद्रस्थानी ठेवून नवीन धोरणे ठरवणे हा आहे. जिल्ह्यात क्षयमुक्त ग्रामपंचायतींची संख्या वाढत असून ऑक्टोबर अखेर १,०२५ पैकी ४८२ ग्रामपंचायती पात्र ठरत आहेत. डिसेंबर अखेर अंतिम निवड निश्चित होणार आहे. २०२४ च्या तुलनेत यावर्षी क्षयमुक्त ग्रामपंचायत वाढण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री क्षयमुक्त भारत अभियानांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील ३७ ग्रामपंचायतींना सुवर्ण, १७५ ग्रामपंचायतींना रौप्य आणि २७० ग्रामपंचायतींना कांस्यपदक मिळाले आहेत, अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.हर्षला वेदक यांनी दिली.

बैठकीत जिल्हाधिकारी येडगे यांनी आरोग्य विभागाला औषधाला प्रतिसाद न देणाऱ्या (एमडीआर) क्षयरुग्णांसाठी सीपीआर रुग्णालयात स्वतंत्र वॉर्ड उभारण्याच्या सूचना दिल्या. पुढील १५ दिवसात याबाबत निर्णय घेण्यात यावा तसेच जिल्ह्यातील रुग्ण उपचारासाठी अन्यत्र जाऊ नयेत यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यात याव्यात, असे त्यांनी सांगितले. या बैठकीत टीबीशी संबंधित इतर आजारांच्या प्रतिबंधक कामकाजाचाही आढावा घेण्यात आला. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. भिसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अनिरुद्ध पिंपळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. उत्तम मदने, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.फारूक देसाई, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.हर्षला वेदक, टीबी पीएलएचआयव्ही नेटवर्कच्या दीपा शिपूरकर तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत पोहाळे शाळेचे यश

बाजारभोगाव, ता.४(प्रतिनिधी)–

**पोहाळे तर्फ बोरगाव केंद्राच्या क्रीडा स्पर्धा विद्या मंदीर वाळोली शाळेच्या क्रीडांगणावर संपन्न झाल्या. या स्पर्धेतील सर्वच खेळात पोहाळे शाळेच्या स्पर्धकांनी घवघवीत यश संपादन केले.**

पोहाळे शाळेच्या खेळाडूंना मुख्याध्यापक मारुती खोत, बळीरा काकडे, पांडुरंग कामत, आनंद जाधव, मोहन कांबळे, जयसिंगराव माळवी, भाऊ कांबळे, शाकिरा नाईकवडे, सौ. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. पन्हाळ्याचे गटशिक्षणाधिकारी संदीप यादव, शिक्षण विस्तार अधिकारी एस, के.पाटील, शिवाजीराव मानकर, कैलास वसावे, मुख्या. मारुती खोत, किरण सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक आनंदा म्हाळुंगेकर, तुषार कुंभार, निलेश कुंभार आदीनी स्पर्धेचे संयोजन केले.

## दिव्यांग बांधवांना सर्वोतोपरी मदत करणार–सरपंच पाटील

साजणी, ता.४(वार्ताहर)–

**दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन सरपंच शिवाजी पाटील यांनी दिले.**

साजणी ग्रामपंचायतीच्यावतीने जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, दिव्यांग बांधवांच्या मदतीसाठी ग्रामपंचायत साजणी व शासनस्तरावर वेगवेगळ्या योजना कार्यरत आहेत. त्याचा लाभ दिव्यांग बांधवांनी घ्यावा, असे आवाहन केले. दिव्यांगबांधवाना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्या दूर करण्यासाठी साजणी ग्रामपंचायत कटीबद्ध असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे दिव्यांग बांधवांचा ५ टक्के राखीव निधीची रक्कम १००० यापूर्वी त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली आहे व उर्वरित राहिलेली रक्कम रूपये ५०० देखील त्यांच्या खात्यावर वर्ग करत असल्याचे त्यांनी जाहीर केले. स्वागत अभिजीत कांबळे यांनी केले. प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी शशिकांत कांबळे यांनी केले. याप्रसंगी मनीषा मोघे, सदस्य अजिंक्य कोळी, माजी सरपंच दिनकर कांबळे व दिव्यांग बंधू–भगिनीं व ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## टाकवडेत छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा पायाभरणी समारंभ

टाकवडे, ता.४(प्रतिनिधी)–

**टाकवडे (ता.शिरोळ) येथील श्री कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे शासकीय परवाना आणल्यानंतर नुकताच भूमिपूजन समारंभ संपन्न झाला होता. त्यानंतर बुधवार ता.३ डिसेंबर रोजी ग्रामपंचायतीच्या प्रांगणामध्ये अश्वारुढ पुतळ्याचा पायाभरणी समारंभ संपन्न झाला.**

यावेळी जयसिंगपूर नगरपरिषदेचे नगर अभियंता जावेद मुल्ला, मोहन जनवाडे, राहुल चव्हाण यांच्या हस्ते विधिवत पायाभरणी शुभारंभ करण्यात आला.



छ.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची पायाभरणी करताना मोहन जनवाडे व इतर.

यावेळी गावातील महिलांनी आंबील घागरी, भाजी भाकरी व पोळ्यांची शिदोरी आणली होती. यावेळी श्री कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष अमोल चौगुले, शिरोळ पं.स.च्या माजी सभापती सौ.अर्चना चौगुले, सरपंच सौ.सविता चौगुले, उपसरपंच अमोल पाटील, तंटामुक्त अध्यक्ष प्रभाकर निर्मळ, दिलीप सुतार, सर्जेराव घोरपडे, सुखदेव जनवाडे, अविनाश पाटील, पिरागोंडा पाटील, राजगोंडा पाटील, पराप्पा सचिन पाटील, दिनकर गुरव, मोहन चव्हाण, आकाराम हुपरीकर, शंकर कोळी, मारुती काटकर, मारुती काटकर, आकाश कांबळे, गणेश कांबळे, गोविंद कांबळे, प्रभाकर कांबळे, संजय निर्मळ, महादेव वळिवडे, संभाजी माने, अमोल फसाले, सुनील साबळे, विनायक कदम, सचिन सुभेदार यांसह सर्व ग्रामपंचायत सदस्य, पुतळा समितीचे सदस्य, सहकार क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य अभिजीत पाटील यांनी आभार मानले.

## सांगले विद्यामंदिरमध्ये पारितोषिक वितरण संपन्न

इचलकरंजी, ता.४–

**श्री चौंडेश्वरी शिक्षण प्रसारक संस्थेचे कै. बाळकृष्ण सांगले विद्या मंदिर व श्री ज्ञानदीप बालवाडी यांचा संयुक्तीक ३२ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.**



सांगले विद्यामंदिरमध्ये विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करताना श्री.पी.जी.गडगे, शिक्षणाधिकारी बी.एम.कासार व इतर मान्यवर.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पी.जी.गडगे होते. तसेच अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी बी.एम. कासार हे होते. मुलांना अभ्यास, खेळ याबरोबर वाचनाची आवड निर्माण करावी, असे पालकांना उद्देशून शिक्षणाधिकारी यांनी मार्गदर्शनातू सांगितले. आजच्या या मोबाईलच्या युगात मुलांमध्ये संस्कार रुजविण्याची गरज पी.जी.गडगे व्यक्त केले. यानंतर पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ.रेखा भोसले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय बी.एस.पाटील यांनी करुन दिला.

यावेळी शाळेतील बौद्धिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, आंतरशालेय स्पर्धा, लाठीकाठी इ. स्पर्धेतील यशस्वी मुलांना बक्षीस देण्यात आले. यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी आकाश फारणे आणि आदित्य डाके यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डी.एम.कस्तुरे, आनंदराव साखरे, संजय सातपुते, महेंद्र सातपुते, मिलिंद कांबळे, अमित खानाज उपस्थित होते. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सुत्रसंचालन सौ. ज्योती घोडके, सौ. रुपाली माने यांनी केले. आभार सौ. सारिका हळदकर यांनी मानले.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात विधी सेवा सहाय्य विधीज्ञांची नियुक्ती

कोल्हापूर, ता.४(प्रतिनिधी)–


**जिल्ह्यातील आजी माजी सैनिक, युध्द विधवा, वीर माता–पिता, माजी सैनिक, सैनिक विधवा व अवलंबितांना मोफत विधी सेवा सहाय्य देण्याकरीता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे विधी सेवा चिकित्सा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.**

या कक्षात शासकीय सुट्ट्या वगळून मोफत विधी सेवा सहाय्य देण्याकरीता पुढील विधीज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सोमवार व मंगळवार– अँड. विद्या संजय निकम, बुधवार व गुरुवार– ॲड.धनश्री वि. कोळेकर व शुक्रवार– अँड. प्रशांत सुरेश मिसाळ याप्रमाणे आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त आजी माजी सैनिक/युध्द विधवा/ वीर माता–पिता/माजी सैनिक, सैनिक विधवा व अवलंबितांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

श्रीहरी
शुक्रवार, ता.५/१२/२०२५ पासून दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
रूममेट
प्रौढांसाठी सायं. ४ व ७ वा.
साली का प्यार
A A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ५ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
सेक्सुअल ऑकनीज
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार ता.५ पासून
अँडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज 3 खेळ 12 • 3.30 व रात्री 9.



५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
शुक्रवार ता. ५ पासून
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
रोज ४ खेळ *१२-३-६-९ वा.



कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.५ पा
दु.१२, दु.३.३०, रात्री ९ वा



गुरु शुक्रवार ता. ५ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ३ खेळ १२ * ३.४५ * ९ वा.
रणवीर सिंगचा जबरदस्त ॲक्शन धमाका


धुरंधर (हिंदी चित्रपट)
चित्रपट मोठा असलेने वेळेकडे लक्ष द्या.

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow


" धुरंधर " - हिंदी ( A ) Action, Thriller
10:15 AM, 11:15 AM, 01:00 PM, 02:00 PM
03:00 PM, 05:45 PM, 06:45 PM, 09:00 PM
09:45 PM, 10:30 PM
" तेरे इश्क में " - हिंदी ( U/A 16+ ) Drama & Romantic
10:00 AM, 05:00 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि वरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11


धुरंधर (HIN) (A)
09.45, 11.15am, 01.30, 03.00, 05.15, 06.45, 09.15, 10.30pm
तेरे इश्क में (HIN) (U/A)
12.00, 06.30, 10.00pm
अखंडा २ (HIN) (U/A)
03. 30pm
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# मतमोजणी गोडाऊनला उमेदवारांच्या सह्यांचे सील लावा

## सातार्‍यात निवडणूक निर्णय अधिकार्‍यांकडे अपक्षांची मागणी

सातारा,ता.४(प्रतिनिधी)-

**मतमोजणी गोडाऊनला पक्ष उमेदवारांच्या सह्यांचे सील लागणार का? हा प्रश्न अपक्ष उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकार्‍यांच्या समोर उपस्थित करत स्ट्राँग रुमध्ये खडा पहारा असताना आमच्या सह्यांचे सील लावा, अशी मागणी करुन अन्य सूचना केल्या पण याचे पालन होईल का असा प्रश्न आहे.**

मतमोजणी लांबल्याने राजकीय दबावापोटी घोटाळा होऊ शकतो म्हणत अपक्ष उमेदवारांची आधीच धाकधूक वाढली असताना मतमोजणी गोडाऊनला उमेदवारांच्या सह्यांचे सील लावण्याची मागणी सातार्‍यात अपक्ष उमेदवारांनी केली. याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी आशिष बारकुल यांच्याकडे दिलेल्या निवेदनावर नगराध्यक्ष पदाचे अपक्ष उमेदवार शरद काटकर, नगरसेवक पदाचे उमेदवार नाना इंदलकर,संजय पाटील,प्रतीक भद्रे, राम हादगे, प्रशांत अहेरराव यासोबत अन्य अपक्ष उमेदवारांच्या सह्या आहेत.सातारा नगरपरिषद पंचवार्षिक निवडणुकीच्या रणधुमाळीत यंदा मनोमिलन फॅक्टर गाजला. अखेरपर्यंत दोन्ही राजेंनी इच्छुकांच्या भाऊगर्दीत कोणाची वर्णी लागणार हे



सातारा: प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी आशिष बारकुल यांच्याकडे निवेदन देताना पालिका निवडणुकीतील अपक्ष उमेदवार.

सांगितले नसल्याने अखेरच्या क्षणी मोठ्या स्वरुपात दोन्ही राजेंच्या निष्ठावंतांनी बंडखोरी केली. त्यामुळे निवडणुकीच्या रणांगणात बंडखोर अपक्षांचे सत्ताधारी भाजपा, महाविकास आघाडी व महायुतीतील घटकपक्षांसमोर मोठे आव्हान उभे राहिले. तणावाच्या वातावरणात सातारा शहरासह जिल्ह्यात किरकोळ राडा, वादावादी, पोलीस ठाणे बाहेर आंदोलने दोन्ही गट समोरा समोर येऊन निवडणुकीच्या माहोलाचा परिणाम घसरलेल्या मतदानाच्या टक्केवारीवर दिसून आला. जिल्ह्यात ६६ टक्के मतदान झाले. सातारा शहरात देखील मतदानाचा टक्का घसरला. ९ वर्षांनी झालेल्या निवडणुकीकडे डोळे लावून बसलेल्या अर्ध्या निम्या मतदारांनी पाठ का फिरवली? हा संशोधनाचा विषय बनला आहे.

पालिका निवडणुकीच्या मतदानानंतर मतमोजणी लांबलेली आहे. या परिस्थितीत राजकीय दबावापोटी घोटाळा होऊ शकतो असा आरोप करून सातारा नगरपरिषद पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीतले अपक्ष उमेदवारांनी मतमोजणी केंद्रांच्या गोडाऊनला असलेल्या दरवाजांना उमेदवारांच्या सह्यांचे सील लावण्यात यावे, अशी मागणी सातारा नगरपालिकेसाठी उभ्या राहिलेल्या अपक्ष उमेदवारांनी प्रांताधिकारी आशिष बारकूल यांच्याकडे केली.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, औद्योगिक वसाहतीमधील मतपेट्या ज्या शासकीय गोदाममध्ये ठेवल्या आहेत. तेथे अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहता आले नाही. आमचे प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ पत्रकार, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शरद काटकर यांना पाठवले होते. त्यांनी आम्हाला दिलेल्या माहितीवरुन गोडाऊन सील करताना सह्या घेण्यात आल्या नाहीत. केलेले सील हे कधीही काढून परत सील करता येऊ शकते. राज्यात काहीही घडू शकते असा आमचा समज आहे. फक्त कुलूप सीलबंद करण्यात आले आहे. वास्तविक मागच्या आणि पाठीमागील मुख्य दरवाजावर मध्यभागी मतमोजणी पर्यंत टिकेल अशा पध्दतीने सील करुन त्यावर आमच्या सह्या घेण्यात याव्यात.

यासंदर्भात प्रांताधिकारी बारकूल यांनी माहिती देताना, आम्ही तुम्हाला सीसीटीव्ही फुटेज देतो. या ठिकाणी उमेदवारांनी देखरेखीसाठी माणसे ठेवावीत, असे सांगितले. मात्र,१५ दिवस या ठिकाणी लोक ठेवणे उमेदवारांना शक्य होणार नाही, त्यामुळे दोन्ही दरवाजांना उमेदवारांच्या सह्यांचे सील लावण्याचा निर्णय प्रशासनाने घ्यावा, अशी मागणी अपक्ष उमेदवारांनी केली.

आमच्या सह्यांचे सील गोडावूनला करण्यात यावे, अशी विनंती अपक्ष उमेदवारांनी केली.यासंदर्भात बोलताना नगराध्यक्ष पदाचे अपक्ष उमेदवार शरद काटकर म्हणाले, मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर ईव्हीएम मशिन मतमोजणी केंद्रावर ठेवण्यात आली आहेत. उमेदवारांच्या समक्ष प्रशासनाने या गोडाऊनच्या दरवाजांना कुलूप लावलेले आहे. परंतु हे कुलूप कुठल्याही क्षणी उघडले जाऊ शकते.

# जिल्ह्यातील शाळा आज बंद राहणार

कराड,ता.४(प्रतिनिधी)-

**नवीन संचमान्यतेमुळे हजारो शाळांवरील शिक्षकांची पदे कमी करणे, दोन वर्षात टीईटी न झाल्यास सक्तीने सेवानिवृत्ती, ऑनलाईन अशैक्षणिक कामांचा भडीमार या बाबींमुळे संतापलेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे.**

यातून आज (दि.५) रोजी राज्यभरातील शाळा बंद राहणार आहे. या दिवशी राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे व शिक्षक समितीचे राज्य कोषाध्यक्ष नंदकुमार होळकर यांनी दिली. दोन वर्षांपासून संचमान्यतेमुळे राज्यभरातील २० हजारहून अधिक पदे कमी होणार आहेत. त्यातच १ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना टीईटी परीक्षा सक्तीची करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच शिक्षकांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांबाबत राज्य शासनाकडून हेळसांड होत आहे. पुणे येथे नवीन जिल्हा परिषद कार्यालयापासून आज (दि.५) रोजी सकाळी ११ वाजता मोर्चास प्रारंभ होणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालय, शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त कार्यालय या मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय येथे आक्रोश महामोर्चाचा समारोप होईल. याठिकाणी मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

प्राथमिक शिक्षक संघ, प्राथमिक शिक्षक समिती, जुनी पेन्शन हक्क संघटना, शिक्षक भरती व केंद्रप्रमुख संघटना, महानगरपालिका, नगरपालिका शिक्षक संघ, माध्यमिक व उच्च माध्यमिकमुख्याध्यापक संघ महामंडळ,शिक्षकेतर कर्मचारी संघटना,मागासवर्गीय शिक्षक संघटना, शिक्षक सेना यांच्यासह राज्यभरातील प्रमुख मोठ्या संघटना या आंदोलनात सहभागी होणार आहेत. सर्व संघटना यामध्ये सहभागी होणार असल्याने जिल्ह्यातीलही शाळा आज (दि.५) रोजी बंद राहणार आहेत.

# राजारामबापू बँकेच्या इंटरनेट बँकिंग सुविधेस मंजुरी

ईश्वरपूर,ता.४(प्रतिनिधी)-



**येथील राजारामबापू सहकारी बँकेस इंटरनेट बँकींग सुविधा सुरू करण्याची परवानगी रिझर्व्ह बँकेने दिली असल्याची माहिती चेअरमन विजयराव यादव यांनी दिली. यावेळी बँकेचे व्हा. चेअरमन माणिकराव पाटील, संचालक प्रा. शामराव पाटील व व्यवस्थापकीय संचालक सीए. प्रदिप बाबर उपस्थित होते.**

इंटरनेट बँकिंगची सुविधा देण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून बँकेच्या सी.बी.एस.सॉफ्टवेअर, नेटवर्क, डाटा सेक्युरिटी इत्यादी बाबतचे ऑडिट करून ग्राहकांच्या पैशाची आणि व्यवहारांची सुरक्षितता कोटेकोरपणे तपासली गेली. याबाबत केंद्र शासनाच्या अधिकृत पॅनेलवरील ऑडिटरकडून सखोल तपासणी करून त्याचा अहवाल घेतला गेला. सायबर सिक्युरिटी बाबत प्रचलित प्रमाणांचे पालन होत असल्याने अशी सुविधा देण्याची परवानगी मिळाली असल्याचे चेअरमन विजयराव यादव यांनी सांगितले.

# कर्जमुक्तीसाठी असहकार आंदोलन सुरु करा

## 'स्वाभिमानी'चे जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांचे शेतकर्‍यांना आवाहन

सातारा,ता.४(प्रतिनिधी)-



**ऊस दराच्या लढ्यानंतर शेतकरी कर्जमुक्त झाला पाहिजे यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना संपूर्ण ताकतीने मैदानात उतरली आहे. पण ज्या शेतकर्‍यांना त्याचा लाभ मिळवायचा आहे त्यांनी घरी बसून चालणार नाही, असे स्पष्ट मत स्वाभिमानी संघटनेचे सातारा जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.**

सातारा जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रात सहकाराचे मोठे जाळे आहे परंतु त्याचा वापर शेतकर्‍यांचा फायदा कमी व शोषण जास्त असाच अनुभव आजपर्यंत आहे. हमीभावाची फक्त घोषणा होते. शेतमालांचे भाव जाणीवपूर्वक पाडून शेतकर्‍यांना लुटले जात आहे. सरकार शेतकर्‍यांना कोणतीही मदत करत नाही तरीही शेतकर्‍यांनी योग्य संधीचा लाभ घेण्यासाठी लढण्याची गरज आहे त्यासाठी असहकार आंदोलनाला शेतकर्‍यांनी सुरुवात करायची आहे यामध्ये सर्व शेतकर्‍यांनी सहभागी होत कोणतेही कर्ज भरायचेच नाही. जोपर्यंत सरकार सत्तेवर येण्यापूर्वी दिलेले आश्वासन पाळत नाही आणि शेतकर्‍यांची संपूर्ण कर्जमुक्तीची घोषणा करत नाही तोपर्यंत हे आंदोलन चालूच ठेवायचे आहे. एक वर्षे झाले तरी सरकार अजून आश्वासन पाळत नाही व पाळेल असे वाटत नाही त्यामुळे शेतकर्‍यांनी सुध्दा सावधान होऊन कोणतेही कर्ज भरायचेच नाही कारण सरकारने सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले आहे. ३१ जून ही तारीख कर्जमुक्तीसाठी निश्चित केली आहे परंतु आज ऊस बिलातून वसुली करायची, कर्जमुक्तीसाठी नियमित कर्जफेड केली म्हणून अपात्र करायचे, असे षडयंत्र सरकारचे चालू आहे हे स्पष्ट दिसत आहे.त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कर्जच भरायचे नाही व ऊस बिल किंवा अजून कोणत्याही मार्गाने वसूल करुन द्यायचे नाही त्यासाठी जो साखर कारखाना ऊस बिलातून कर्जाची कपात करणार नाही,अश्याच साखर कारखाना यांना ऊस घालावे तसेच विकास सेवा सोसायटी यांनी बेकायदेशीर वसूली ऊसबिलातून करु नये अन्यथा स्वाभिमानी संघटनेचा हिसका त्यांना दाखवला जाईल. शेतकर्‍यांच्या अज्ञान पणाचा गैरफायदा घेत आला आहे व शंभर टक्के वसुली दाखवून फक्त जिल्हा मध्यवर्ती बँकांची एजंटगीरी करुन वर्ष पूर्ण होण्या अगोदरच बेकायदेशीर वसूली करत आला आहात त्यासाठी जर असा प्रकार केला तर जशास तसे उत्तर त्यांना दिले जाईल तसेच शेतकर्‍यांचे ऊस बिल ज्या सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेत सेव्हिंग खात्यात जमा केले जाते त्याचा गोपनीयतेचा भंग आजपर्यंत बँकेने केला व जबरदस्तीने शेतकर्‍यांच्या खात्यातील येणारे पैसे कपात करुन सोसायटी यांना वर्ग केले आहेत. आता जर शेतकर्‍यांच्या खात्यातील पैसे कपात केले तर बँकेचा परवाना रद्द करण्यासाठी आंदोलन करायला भाग पाडू नये. शेतकरी गेली अनेक वर्षे सर्व कर्ज नवे जुने करुन कर्जबाजारी झाला आहे आणि बँकेच्या बेकायदेशीर वसुलीमुळेच या अगोदरही कर्जमुक्तीपासून वंचित राहिला आहे त्यामुळे ज्या शेतकर्‍यांना कोणतीही अडचण येईल कोणी बेकायदेशीर वसूली केली तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी संपर्क करावा परंतु कर्जमुक्त झाल्याशिवाय आता माघार घ्यायची नाही, असे या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

# घरकुलची कामे वेळेत, गुणवत्तापूर्ण करा-डॉ.दिघे

सांगली,ता.४(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यात सुरू असलेली घरकुलची कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण करा, अशा सूचना राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी दिल्या.**

सांगली जिल्हा परिषदेत आढावा बैठक झाली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक नंदिणी घाणेकर,ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, सहायक लेखाधिकारी उपस्थित होते. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत त्यांनी कवठेमहांकाळ तालुक्यातील जाखापूर आणि खानापूर तालुक्यातील हिवरे येथील सुरू असलेल्या घरकुलच्या कामाची पाहणी केली.

# सातारा तालुक्यातील शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

सातारा,ता.४(प्रतिनिधी)-

**सातारा तालुक्यातील पुणे विभाग पदवीधर मतदार संघाचे भाग क्र. ३०५ ते ३२९ तसेच शिक्षक मतदार संघाची यादी भाग क्र. २११ ते २१७ ची प्रारूप मतदार यादी तहसिलदार सातारा व उपविभागीय अधिकारी सातारा, मुख्याधिकारी सातारा नगरपरिषद व गटविकास अधिकारी पंचायत समिती सातारा यांच्या नोटीस बोर्डावर, व सर्व संबंधित मतदान केंद्रांवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे**

तरी प्रस्तुत प्रसिध्द केलेली प्रारूप मतदार यादीची पाहणी करून संबंधित मतदाराने आपल्या नावाची खात्री करावी व याउपरही नावामध्ये हरकत, दुरूस्ती अथवा नव्याने नोंदणी करावयाची असल्यास विहीत नमुन्यातील अनुक्रमे फॉर्म नं ७,८ व १८,१९ भरून संबंधित पदनिर्देशित अधिकारी अथवा निवडणूक शाखा तहसिल कार्यालय सातारा येथे ता.१८ डिसेंबर २०२५ पर्यंत हरकती व दावे स्विकारण्यात येतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी,असे आवाहन सहा.मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आशिष बारकुल व पदनिर्देशित अधिकारी तथा तहसिलदार समीर यादव यांनी केले आहे.

# सेवागिरी स्कूलमध्ये प्रदर्शनास चांगला प्रतिसाद

वडूज,ता.४(वार्ताहर)-

**येथील सेवागिरी इंग्लिश मिडियम स्कूलच्या प्रांगणात विज्ञान व गणित विषयाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनास चांगला प्रतिसाद मिळाला.**

हुतात्मा विद्यालयातील निवृत्त विज्ञान शिक्षक अंबादास भंडारे, परिस शिक्षण संस्था सचिव विकल्प शहा यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका नूतन राजमाने व दीपा गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रमुख अतिथी श्री. भंडारे व विकल्प शहा यांनी सर्व विद्यार्थ्यांनी बनवलेले उपकरणे, मॉडेल पाहून विद्यार्थ्यांकडून माहिती ऐकली व प्रश्न विचारले. विज्ञान व गणित प्रदर्शन भरवण्याचा मुख्य



वडूज: सेवागिरी इंग्लिश स्कूलमधील प्रदर्शनाचे उद्घाटन करताना अंबादास भंडारे, विकल्प शहा व इतर मान्यवर.

हेतू म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण, अनुमान,निष्कर्ष तसेच तर्कवितर्क इत्यादी क्षमतांचा विकास करणे व त्यांच्यामध्ये सकारात्मक व शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व गणित या विषयांविषयी गोडी निर्माण करणे हा आहे, असे मुख्याध्यापिका राजमाने यांनी यावेळी सांगितले.

या प्रदर्शनामध्ये इयत्ता पहिली ते इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या उपकरणांचे सादरीकरण केले. प्रदर्शन पाहण्यासाठी सर्व पालकवर्गांनी गर्दी केली होती.

# मालगाव येथे डिजिटल साक्षरता मेळावा उत्साहात

मिरज,ता.४(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक डिजिटल साक्षरता मेळाव्याचे आयोजन मालगाव येथे करण्यात आले होते. व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत शाखाधिकारी सतीश गुजर यांनी केले.**

आर्थिक साक्षरता केंद्र बँक ऑफ इंडिया सांगलीचे दीपक क्षीरसागर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले कि, महिलांनी आर्थिक व्यवहार करत असताना मोबाईलवर नवनवीन लिंक येत असतात. ती ओपन करून डाऊनलोड करू नका. खात्यावरील रक्कम नाहीशी होऊन आपली आर्थिक फसवणूक



मेळाव्यात उपस्थितांना मार्गदर्शन करताना बँक ऑफ इंडिया साक्षरता केंद्र सांगलीचे प्रमुख दीपक क्षीरसागर.

होऊ शकते. त्याचप्रमाणे शेतकर्‍यांनी शेती पुरते मर्यादित न राहता इतर शेतीपूरक जोड व्यवसाय करावेत. आरबीआय अंतर्गत आपला पैसा आपला अधिकार व ईकेवायसी बाबत त्यांनी माहिती दिली. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, सुकन्या समृद्धी योजना, जनधन योजना, पीएमएफएमई आर्थिक विकास महामंडळे, व आरसेटी मिरज याबाबत सविस्तर माहिती त्यांनी दिली.आभार फिल्ड ऑफिसर विष्णू जाधव यांनी मानले.

# शिराळा प्रभाग क्र.चारसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर

शिराळा,ता.४(प्रतिनिधी)-

**शिराळा नगरपंचायतीच्या प्रभाग क्र.४ च्या सदस्यपदाच्या निवडणुकीसाठी सार्वत्रिक निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात आला आहे.**

नवीन निवडणूक कार्यक्रमानुसार मतदान ता.२० डिसेंबर व मतमोजणी ता.२१ डिसेंबर रोजी होणार असल्याचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.शिराळा नगरपंचायतीच्या प्रभाग क्र.४ च्या सदस्यपदाच्या निवडणुकीसाठी सार्वत्रिक निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम पुढीलप्रमाणे असून नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक १० डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत, आवश्यकतेप्रमाणे निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे ता.११ डिसेंबर रोजी, आवश्यक असल्यास मतदान ता.२० डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत या वेळेत होणार आहे.

# कृष्णा कारखान्याचे ऊसबिल जमा

कराड,ता.४(प्रतिनिधी)-

**रेठरे बुद्रुक (ता.कराड) येथील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याने यंदा २०२५-२६ गाळप हंगामात जिल्ह्यात सर्वात पहिल्यांदा ऊसदराची कोंडी फोडत प्रतिटन ३५०० रूपयांचा दर जाहीर केला. त्यामुळे शेतकर्‍यांना दिलासा मिळाला होता.**

या निर्णयाचे समाधान व्यक्त होत असतानाच, आता कृष्णा कारखान्याचे जिल्ह्यात सर्व प्रथम शेतकर्‍यांच्या खात्यावर ऊस बिल जमा करून पुन्हा आघाडी घेतली आहे.कारखान्याला पहिल्या पंधरवड्यात पुरवठा झालेल्या उसाची प्रतिटन ३५०० रूपयांप्रमाणे होणारी बिलाची एकूण ७० कोटी ५४ लाखांची रक्कम शेतकरी सभासदांच्या बँक खात्यांमध्ये वर्ग केली. गेल्या अनेक वर्षांप्रमाणे यंदाही कारखान्याचे अध्यक्ष डॉ.सुरेश भोसले यांनी ऊस उत्पादकांना न्याय आणि स्पर्धात्मक दर देत, आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. यंदाच्या हंगामासाठी प्रतिटन ३५०० रूपयांचा दर जाहीर केल्याने, सभासद शेतकर्‍यांकडून समाधान व्यक्त होत आहे.

# जयवंत शुगर्सकडून ऊसबिल बँकेत जमा

कराड,ता.४(प्रतिनिधी)-

**धावरवाडी (ता.कराड) येथील जयवंत शुगर्सने २०२५-२६ च्या हंगामात पहिल्या पंधरवड्यात गाळपास आलेल्या उसाचे प्रतिटन ३५०० रूपयांप्रमाणे एकूण ३५ कोटी १६ लाखांचे बिल ऊसपुरवठादार शेतकर्‍यांच्या खात्यात जमा केले. त्यामुळे शेतकर्‍यांतून समाधान व्यक्त केले जात आहे.**

जयवंत शुगर्सचे संस्थापक डॉ.सुरेश भोसले यांनी जिल्ह्यात सर्वप्रथम ऊसदराची कोंडी फोडत प्रतिटन ३५०० रूपयांचा दर जाहीर करत ऊसदरात आघाडी घेतली. आता जयवंत शुगर्सने ऊसबिल वाटपातही आघाडी घेतली आहे. कारखान्याने पहिल्या पंधरवड्यात गाळपास आलेल्या उसापोटी प्रतिटन ३५०० प्रमाणे ऊस उत्पादक शेतकर्‍यांच्या बँक खात्यावर एकूण ३५ कोटी १६ लाख रूपये जमा करुन वेळेत ऊसबिल जमा करण्याची परंपरा जपली आहे.

# दिव्यांगांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत

## जिल्हाधिकारी काकडे; सांगलीत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त कार्यक्रम

सांगली,ता.४(प्रतिनिधी)-

**दिव्यांग मुलांमध्ये खूप कलात्मकता आहे, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. दिव्यांग व्यक्तींमधील कमतरता न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या क्षमता पाहून त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी केले.**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित दिव्यांगांच्या विशेष शाळा / कर्मशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक व विविध गुणदर्शन कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते



सांगली: दिव्यांग दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सत्कार करताना जिल्हाधिकारी अशोक काकडे, समवेत इतर विद्यार्थी व शिक्षक.

बोलत होते. डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन हॉल, माधवनगर रोड सांगली येथे आयोजित या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्रीमती सुनंदा ढवळे, सहाय्यक आयुक्त , समाज कल्याण बाळासाहेब कामत, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संदीप कोटकर, एसईडीबी, मुंबईचे संस्थापक जमीर ढाले, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी महेश धोत्रे यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, विविध उपक्रमांच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून कौशल्य प्रशिक्षणातून त्यांना स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे. यामधून त्यांच्या आई-वडिलांवरील ताण काही प्रमाणात कमी होईल. यामध्ये दिव्यांग शाळेतील शिक्षकांची महत्त्वाची भूमिका असून यासाठी शिक्षकांनी जबाबदारी उचलावी.

यावेळी जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी जिल्ह्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात आलेल्या रोबोटिक्स प्रशिक्षण, दिव्यांग मुलांनी बनवलेल्या वस्तुंचे विक्री व प्रदर्शन, तपासणी व वितरण शिबिरे आदी उपक्रमांची माहिती देवून यापुढेही दिव्यांग सर्वसमावेशक समाज घडविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. प्रास्ताविक दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी महेश धोत्रे यांनी केले. सहाय्यक सल्लागार मंजिरी जाधव यांनी आभार मानले.

यावेळी दिव्यांगत्वावर मात करून यश संपादन केलेल्या दिव्यांग व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सदर कार्यक्रमास जिल्ह्यातील दिव्यांगांसाठी एकूण ३७ विशेष शाळा/कर्मशाळा सहभागी झाल्या. या कार्यक्रमासाठी ८०० विद्यार्थी, दिव्यांग मुलांचे पालक, विविध संघटना, संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रारंभी प्रभात फेरी काढण्यात आली.

# कर्नाटक भाजपमध्येही अंतर्गत सत्तासंघर्ष

## नेत्यांमधील मतभेद मिटविण्यात प्रभारींना अपयश; कार्यकर्त्यांकडून नाराजी

बेंगळुरू,ता.४(प्रतिनिधी)-

**सत्ताधारी काँग्रेसमधील अंतर्गत सत्ता संघर्षाचा राजकीय लाभ घेण्याची संधी असतानाही, राज्य भाजप मात्र शांत बसल्याची टीका कार्यकर्त्यांकडून होत आहे. पक्षाला सक्रिय करण्याची जबाबदारी असलेले प्रभारी राधा मोहनदास अग्रवाल यांचे राज्यातील कामकाजापासून मोठे अंतर निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे.**



प्रदेशाध्यक्षपदाबाबत असलेल्या गोंधळात संघटनेतील वाद वाढत असताना, प्रभारींची निष्क्रियता विशेषतः धक्कादायक असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. गेल्या काही महिन्यात ते राज्यात क्वचितच दिसले,एवढेच नाही तर त्यांच्या येण्या-जाण्याची माहितीही कार्यकर्त्यांना नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे.

**सहप्रभारींचाही हस्तक्षेप मर्यादित**

सहप्रभारी सुधाकर रेड्डी यांनी काही बैठका घेतल्या असल्या, तरी अंतर्गत संघर्ष मिटवण्यासाठी ठोस फॉर्म्युला तयार करण्यात यश आलेले नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये केंद्राच्या नेतृत्वाबद्दलही नाराजी वाढताना दिसत आहे.राज्यात सत्तेत पुनरागमनासाठी संघटनात्मक बळकटी आवश्यक असताना, प्रभारींच्या निष्क्रियतेमुळे भाजपची अवस्था चिंताजनक झाल्याचे मत अनेक नेते आणि कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.सध्या मुख्यमंत्रीपदावरुन काँग्रेसमध्ये मोठे नाट्य सुरु असून अनेक काँग्रेस आमदारांच्या सतत दिल्लीवाऱ्या सुरु आहेत.याचे भाजपने राजकीय भांडवल करुन काँग्रेसविरोधात आरोपांची मालिका उठविण्याची गरज होती, असे मत भाजप कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे. परंतु तसे कोणतेच लक्षण सध्या राज्य भाजपमध्ये दिसून येत नसल्याने कार्यकर्त्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

**विरोधी पक्ष म्हणून अपेक्षित लढाई नाही**

**काँग्रेस सरकारविरोधात प्रभावी रणनीती आखण्याची जबाबदारी भाजपकडे असताना, राज्य सरकारच्या उणिवा अधोरेखित करण्याचे कामही गेल्या दोन महिन्यांत मंदावले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी, वाढता महागाई प्रश्न आणि प्रशासनातील गोंधळ यांसारख्या मुद्द्यांवर भाजपकडून ठोस भूमिका दिसत नसल्याचीही टीका होत आहे.**

**प्रभारींच्या अनुपस्थितीत संघटना ढासळली**

**जुलै २०२३ मध्ये राधा मोहनदास अग्रवाल यांची कर्नाटक भाजप प्रभारी म्हणून नियुक्ती झाली होती.लोकसभा निवडणुकीत त्यांनी कामकाज पाहिले असले तरी राज्यातील अंतर्गत मतभेद सोडवण्यात ते अपयशी ठरल्याचे मत व्यक्त केले जात आहे.राज्य भाजपमध्ये जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीवरून वाद, प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र यांच्या कार्यशैलीवर प्रश्न, काही असंतुष्ट आमदारांकडून नेतृत्व बदलाची मागणी,सातत्याने वाढत असलेली गटबाजी या सर्व मुद्द्यांवर प्रभारींच्या हस्तक्षेपाचा अभाव प्रकर्षाने दिसून येत असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.**

# कुरूंदवाडमध्ये ईव्हीएम मशिनला खडा पहारा

कुरुंदवाड,ता.४(प्रतिनिधी)-

**येथील नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल ३ डिसेंबर ऐवजी २१ डिसेंबरला लागणार असल्याने २८ मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीन येथील नगरपालिकेच्या तबक उद्यानातील स्ट्राँगरूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली असून नगरपरिषद कर्मचारी व पोलीस यांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.**

येथील नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक मंगळवारी दोन डिसेंबर रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत शांततेत पार पडली. या निवडणुकीचा निकाल दुसऱ्या दिवशी बुधवारी तीन तारखेला लागणार होता.मात्र उच्च न्यायालयाने हा निकाल ३ डिसेंबर ऐवजी २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्याचे निर्देश दिल्याने येथील २८ मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीन निवडणूक आयोगाकडून येथील तबक उद्यानातील नगरपालिकेच्या जिम्नॅशियम हॉलमधील स्ट्राँगरूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून या इमारतीवर २२ कॅमेरे बसवले असून १ एसआरपी सेक्शन,पोलीस गार्ड व नगरपालिकेचे कर्मचारी असा २४ तास खडा पहारा ठेवण्यात आला आहे.



कुरुंदवाड येथील नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची ईव्हीएम मशीन जिम्नॅशियम हॉलमध्ये ठेवल्यामुळे चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**२२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसहित कडक बंदोबस्त**

या इमारतीला एकच गेट ठेवण्यात आले आहे. तर इमारतीच्या सभोवती व मैदानातही पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी मनोजकुमार देसाई व सपोनी संतोष माने यांनी दिली.



मतदान यंत्रे स्ट्राँगरूममध्ये ठेवतेप्रसंगी उपस्थित अधिकारी.

## शिराळामध्ये मतदान यंत्रे स्ट्राँग रूममध्ये बंद

शिराळा,ता.४(प्रतिनिधी)-

**राज्य निवडणूक मतमोजणी पुढे ढकलण्याबाबतच्या आदेशानुसार देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार शिराळा यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी यांची नियुक्ती करणेत आली आहे.**

त्याच बरोबर निवडणूक आयोगाच्या प्राप्त निर्देशानुसार मतदान यंत्र साठवणूक ठिकाणालगत सुरक्षा उपकरणे(सीसीटिव्ही,सुरक्षा अलार्म सिस्टीम) इत्यादी कार्यान्वित करणेत आली असून सदर ठिकाणी आवश्यक तेथे बॅरेकेटींग करणेत आले आहे. तसेच मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोडाऊनसाठी २४ तास सुरक्षा व्यवस्था(नगरपंचायत अधिकारी,कर्मचारी, ४ पोलीस व ६ जवान) तैनात करणेत आले आहेत.

# मुरगूडमध्ये समर्थकांकडून लाखोंच्या पैजा

मुरगूड,ता.४(प्रतिनिधी)-

**मुरगूड नगरपालिकेची निवडणूक मोठ्या इर्षेने पार पडली.राज्यात सर्वाधिक ८८.४३ टक्के मतदान मुरगूड नगरपालिकेत झाले आहे.दुरंगी झालेल्या या लढतीत सर्वांनीच विजयासाठी निकराचे प्रयत्न केले आहेत. निकालासाठी अद्याप १६ दिवस शिल्लक असताना सर्वच उमेदवारांकडून विजयाचा दावा केला जात आहे. कोणता उमेदवार किती मतांनी विजयी होईल याच्या आकडेमोडीत सध्या उमेदवार आणि त्यांचे समर्थक गुंग दिसत आहेत.**

अगदीच ज्यांना विजयाची खात्री वाटत आहे असे समर्थकांकडून लाखाच्या पैजा लावल्या जात आहेत तर काहीजण माझाच उमेदवार विजयी होणार असल्याच्या आत्मविश्वासाने अमुक एका उमेदवराच्या विजयासाठी कोण पैज धरणार का? अशा आवाहन करणाऱ्या पोस्टक सध्या समाज माध्यमावर फिरताना दिसत आहेत. पण मतदार राजाने कोणाच्या पारड्यात विजय टाकला आहे. हे २१ तारखेलाच समजणार आहे.

**नगरपालिका निवडणूकीत राज्यात सर्वोच्च मतदानाची टक्केवारी**



दुरंगी झालेल्या मुरगूड नगरपालिका निवडणूकीसाठी अत्यंत चुरशीने विक्रमी मतदान झाले. या निवडणुकीचा निकाल लांबणीवर पडला असला तरी आता पैजा मात्र लाखाच्या जुंपल्या जात आहेत.

पालिका निवडणूकीसाठी ८८ .४३ टक्के मतदान झाले.आता आकडेमोड करण्यात व बेरीज-वजाबाकीची गणिते मांडली जात आहेत.काहींच्याकडून आत्मविश्वासपूर्वक अमकाच उमेदवार विजयी होणार असा दावा केला जात आहे. निकाल केंव्हाही लागू दे पण गुलाल आमचाच अशा समजूतीने काही उमेदवारांच्या समर्थकांनी मतदान संपताच फटाक्यांची आतषबाजी करून विजयाच्या घोषणा दिल्या.

**उमेदवार, समर्थक आकडेवारीत गुंग: प्रत्येकालाच विजयाची खात्री**

आता उमेदवार समर्थकांकडून पैजा लावल्या जात आहेत. येथील प्रभाग क्रमांक १ मधील शिवसेना भाजप युती उमेदवार व राष्ट्रवादी-शाहू आघाडीचे उमेदवार विजयी होण्याच्या खात्रीने भैय्या कुडवे व पंकज नेसरीकर यांनी एक लाख रुपयाची पैज लावल्याची चर्चा सुरु आहे. अशाच अनेक पैजा लागत आहेत.मतमोजणीस व निवडणूक निकाल लागण्यास अजून १६ दिवसांचा अवधी असल्याने तोपर्यंत लहानमोठ्या पैजांना ऊत येणार आहे.या पैजेतून आपलाच उमेदवार विजयी होणार याची ठाम खात्री दिली जात आहे.निकाल लागताच पैज कोण जिंकणार व कोण हरणार याचीही उत्सुकता निकालाबरोबर नागरिकांना असणार आहे.अशा पैजांची आता चर्चा रंगली आहे.आता पुढील १६ दिवस अशा चर्चा रंगणार असल्या तरी नेमका कोण किती मतांनी विजय होणार,नगराध्यक्ष कोण होणार, सर्वाधिक नगरसेवक कोणाचे होणार हे पाहण्यासाठी २१ डिसेंबरची वाट पाहावीच लागणार आहे.

## प्रलंबित मागण्यांसाठी पोलिस पाटील मोर्चा काढणार

कराड,ता.४(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलिस पाटील संघ तसेच विविध सहयोगी संघटनांच्यावतीने बुधवार ता.१० रोजी पोलिस पाटील यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशना दरम्यान भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.**

पोलिस पाटील यांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पोलिस पाटील संघाचे जिल्हाध्यक्ष अमित शिंदे-पाटील यांनी केले आहे.

संघटनेच्यावतीने सेवा निवृत्तीची वयोमर्यादा साठवरून ६५ करावी, सेवानिवृत्तीनंतर पोलिस पाटील यांना एकरकमी पैसे द्यावे, विमा कवच तसेच पोलीस पाटील अधिनियमात दुरूस्ती करावी आदी मागण्यांची अंमलबजावणी व्हावी यासाठी मोर्चा काढण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

## घरकुलची कामे वेळेत, गुणवत्तापूर्ण करा-डॉ.दिघे

सांगली,ता.४(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यात सुरू असलेली घरकुलची कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण करा, अशा सूचना राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी दिल्या. जिल्हा परिषदेत आढावा बैठक झाली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक नंदिनी घाणेकर, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी उपस्थित होते.**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत त्यांनी कवठेमहांकाळ तालुक्यातील जाखापूर आणि खानापूर तालुक्यातील हिवरे येथील सुरू असलेल्या घरकुलच्या कामाची पाहणी केली. यावेळी पूर्ण झालेल्या घरकुलांचा डॉ. दिघे यांच्याहस्ते गृहप्रवेश करण्यात आला. अपूर्ण घरकुले तातडीने पूर्ण करा, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून द्या, ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांकडून जिओ टॅगिंग केल्यानंतर विनाविलंब अनुदान वितरण करा, मनरेगा अंतर्गतचे देखील अनुदान वेळेत द्या, तसेच काही नावीन्यपूर्ण उपक्रम देखील राबवा, अशा सूचना डॉ. दिघे यांनी यावेळी दिल्या.

# राष्ट्रनिर्मितीसाठी व्हाईट आर्मीचे सेवा कार्य मोलाचे

## -मेजर जनरल एस.पी.विश्वेश्वर

कोल्हापूर ता.४(प्रतिनिधी)-

**सैन्य भरती प्रक्रियेमध्ये भारतात कुठेही भरतीच्या ठिकाणी अन्न वाटप केले जात नाही पण गेले सतरा वर्षापासून भरती प्रक्रियावेळी सहभागी लाखो तरुणांना मोफत अन्नछत्र व्हाईट आर्मीच्या वतीने केले जाते केले जाते ही एक देशप्रेमी व राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये मोठे योगदानाचे काम आहे असे प्रतिपादन आर्मी रिक्रुटमेंट ऑफिसचे प्रमुख मेजर जनरल एसपी विश्वेश्वर यांनी केले.त्यांनी सातारा सैन्य भरती येथे व्हाईट आर्मीच्या मोफत अन्नछत्र ठिकाणी भेट देऊन पाहणी केली.**



गेली २५ वर्षे मानवनिर्मित निसर्गनिर्मित आपत्तीमध्ये मदतीला धावून जाणाऱ्या या संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. यावेळी कर्नल प्रशांत सिंग डायरेक्टर कोल्हापूर व सैन्य दलातील अधिकारी उपस्थित होते.१५ नोव्हेंबर ते दोन डिसेंबर दरम्यान पोलीस ग्राउंड सातारा येथे कोल्हापूर आर्मी रिक्रुट ऑफिसच्या वतीने अग्निवीर भरती प्रक्रिया सुरू होती या प्रक्रियेमध्ये सांगली,सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूर व गोवा राज्य येथील तरुण मुले सहभागी झाले होते

तसेच कोल्हापूर वन झिरो नाईन टी ए बटालियन यांच्यावतीने देखील याच कालावधीत भरती प्रक्रिया शिवाजी विद्यापीठ येथे सुरू होती या दोन्ही भरती प्रक्रियेमध्ये एकाच वेळी कोल्हापूर व सातारा या दोन्ही ठिकाणी व्हाईट आर्मीच्यावतीने सलग १७ दिवस सुरू असलेल्या मोफत अन्नछत्राचा १८००० भावी जवानांना लाभ मिळाला. या सैन्य भरतीच्या मोफत अन्नछत्र प्रक्रियेसाठी येणारा खर्च संजय घोडावत फाउंडेशन यांनी वस्तुरूप व आर्थिक स्वरूपात उचलला. संस्थेच्या हितचिंतकांनी देखील मदत केली. विशेष सहकार्य एस.एम.लोहिया कॉलेज न्यू कॉलेज, राजाराम कॉलेज, देवचंद कॉलेज,निपाणीचे व्हाईट आर्मी कॅडेट कोर्सचे विद्यार्थी यांचा मोठा सहभाग होता.

## शहरातील भटक्या कुत्र्यांच्या शेल्टर उभारणीसाठी बैठकीचे आयोजन

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार शहरातील सर्व सार्वजनिकठिकाणांवरून भटकेकुत्रे शेल्टरमध्ये स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.**

या निर्देशांनुसार शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, दवाखाने, क्रीडासंकुले, बसस्थानक, रेल्वेस्टेशन, धार्मिक स्थळे, हेलीपॅड, विमानतळ आदी ठिकाणांवरील भटके कुत्रे सुरक्षित शेल्टरमध्ये नेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भारतीय प्राणी कल्याण मंडळाने शेल्टर व्यवस्थापनासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून त्यानुसार महानगरपालिका शेल्टर उभारण्याचे काम हाती घेणार आहे. हे शेल्टर प्रभावीपणे चालवण्यासाठी नागरिक व प्राणीप्रेमी यांच्या सहकार्याची गरज आहे.

यासंदर्भातील चर्चा व नियोजनासाठी सोमवार,ता.०८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वा. प्रतिभानगर येथील वि.स. खांडेकर शाळेत बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी शहरातील सर्व प्राणीप्रेमी, स्वयंसेवी संस्था व नागरिकांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# हणबरवाडी टप्पा क्रमांक दोनची निविदा जाहीर

कराड,ता.४(प्रतिनिधी)-

**कराड उत्तर मतदारसंघातील गेल्या चार दशकांपासून रखडलेली धनगरवाडी-हणबरवाडी उपसा सिंचन योजना आता मार्गी लागण्याच्या निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे.आ.मनोज घोरपडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हणबरवाडी टप्पा क्रमांक २ च्या कामाची निविदा नुकतीच जाहीर झाली असून, डिसेंबर २०२५ अखेर या टप्प्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरूवात होणार आहे. त्यामुळे पाण्यापासून वंचित असणाऱ्या उर्वरित गावांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

धनगरवाडी-हणबरवाडी योजनेतील पहिल्या टप्प्यातील कामे पूर्णत्वास गेल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी निविदा काढण्यात आली आहे. निविदेत पंपगृह, वितरण हौद,उर्ध्वगामी नलिका, बंदिस्त वितरण प्रणाली, संरक्षक भिंत, पोहोच रस्ता, स्लॅब ड्रेन, तसेच अंतवडी-किवळ-खोडजाईवाडी परिसरासाठी विद्युत वाहिनी व उपकेंद्रांची उभारणी यांचा समावेश आहे. हणबरवाडी उपसा सिंचन टप्पा २ अंतर्गत सबमर्सिबल पंप, त्यांचे यांत्रिकी व विद्युत घटक, निर्मिती, पुरवठा, उभारणी आणि चाचणीची पूर्तता केली जाणार आहे. विधानसभा निवडणुकीत दिलेले आश्वासन पाळत फक्त सहा महिन्यांत टप्पा क्रमांक १ कार्यान्वित करण्यात आले.त्याचसोबत टप्पा क्रमांक २ चे काम डिसेंबर २०२५ अखेर सुरू करू,अशी त्यांनी दिलेली ग्वाहीही आता प्रत्यक्षात उतरू लागली आहे. नोव्हेंबर महिन्यातच निविदा जाहीर झाल्याने या भागातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.धनगरवाडी-हणबरवाडी योजना जवळपास ४० वर्षे निवडणुकीपुरती गाजत राहिली. मात्र आ.घोरपडे यांनी योजनेचा सातत्याने पाठपुरावा करत दोन्ही टप्प्यांमधील कामांना गती दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या पाठबळामुळे ही योजना पूर्णत्वाकडे जात असल्याचे सांगण्यात आले.

योजनेंतर्गत उर्वरित गावांना लवकरच पाणी उपलब्ध होणार असल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी आ.मनोज घोरपडे यांचे विशेष आभार मानले आहेत. डिसेंबरअखेर हणबरवाडी टप्पा क्रमांक २ सुरू करू, अशी माहिती आ.घोरपडे यांनी दिली.

# जिल्ह्यात लसीकरण मोहीम गतीमान करा -जिल्हाधिकारी

## सुलभ लसीकरणासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदणीचे आवाहन

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

**लसीकरणात सहभागी न झालेल्या कुटुंबांचा शोध घेऊन त्यांचे समुपदेशन करावे, तसेच प्रत्येक नागरिकाला लसीकरणाचे फायदे सांगून लसीकरण मोहिम गतीमान करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिले. जिल्ह्यातील नियमित लसीकरण कार्यक्रम २०२५ -२६ अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत बोलत होते.**

यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. भिसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अनिरुद्ध पिंपळे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. फारूक देसाई तसेच विविध विभागातील वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.



आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी डॉ.अमोल येडगे.

जिल्ह्यात नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत ५७ टक्के पूर्ण लसीकरण झाले असून, आगामी मार्चपर्यंत शंभर टक्के उद्दिष्ट साध्य करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. वर्ष भरा मध्ये गरोदर माता, बालके व विद्यार्थी मिळून एकूण ४ लाख पेक्षा जास्त लाभार्थींना लसीकरणाचा लाभ दिला जातो. या अनुषंगाने आरोग्य विभागाने सुधारित राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रक तयार केले असून, सनियंत्रण यंत्रणा अधिक भक्कम करण्यासाठी सूचना देण्यात आल्या. जन्म शासकीय किंवा खासगी दवाखान्यात झाला तरी बाळाला जन्मता हेपेटाइटिस बी, झिरो पोलिओ व बीसीजी या तीन महत्वाच्या लसी देण्यासाठी पालकांनी आग्रह धरला पाहिजे. जेणेकरून जन्मापासून बाळाला गंभीर आजरापासून सुरक्षितता मिळेल. सर्व शासकीय दवाखान्यात नियमित लसीकरण अंतर्गत सर्व लसी मोफत मिळतात.

यावर्षी कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १३,२६२ लसीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.लसीकरणात सहभागी न झालेल्या कुटुंबांचा शोध घेऊन त्यांचे समुपदेशन करावे,तसेच प्रत्येक नागरिकाला लसीकरणाचे फायदे सांगावेत, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

गर्भवती महिला आणि बालकांचे लसीकरण सुलभ करण्यासाठी भारत सरकारचा - हा डिजिटल प्लॅटफॉर्म उपयुक्त ठरत आहे.या माध्यमातून गर्भवती महिलांची नोंदणी, जन्मापासून १६ वर्षांपर्यंतच्या मुलांचे १२ प्रतिबंधक आजारांवरील लसीकरणाचे रिअल-टाइम ट्रॅकिंग, डिजिटल प्रमाणपत्र आणि एसएमएस अलर्ट मिळतात. यातून देशभरातील कोणत्याही केंद्रावर लसीकरणाची सुविधा मिळते.ण-थखछ सिटिज़न ॲप गूगल प्ले स्टोअरवरून डाउनलोड करून किंवा ुिळप. ेहषु. सीं. ळप या संकेतस्थळावर लॉगिन करून नोंदणी करता येते. मोबाईल क्रमांक किंवा आधार क्रमांकाद्वारे ओटीपी व्हेरिफिकेशन करून आवश्यक माहिती भरल्यास नोंदणी पूर्ण होते.गावस्तरवर आशा कार्यकर्त्यांना ॲपचा वापर आणि नोंदणी प्रक्रियेसाठी योग्य प्रशिक्षण देण्यात यावे, असा सल्ला बैठकीत देण्यात आला.लसीकरणात सहभागी नागरिकांनी या डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले आहे. या पोर्टलवर लसीकरण संबंधित सर्व माहिती उपलब्ध आहे. तसेच यावरील नोंदणीमुळे शिक्षण, नोकरी निमित्त परदेशी जाताना अडचणी निर्माण होणार नाहीत.

# प्रा. प्रविण जाधव यांना पी.एच.डी. प्रदान

इचलकरंजी ता.४ –

**येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँन्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूटमधील प्रा. पी.एस. जाधव यांना संजय घोडावत विद्यापीठ यांच्याकडून पी.एच.डी. इन मॅनेजमेंट ही पदवी प्राप्त झाली आहे.**



प्रा.जाधव हे गेली १६ वर्षापासून प्राध्यापक म्हणून डीकेटीईमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी 'स्टडी ऑफ अॅपेरिएल प्रेफरेन्सेस अॅण्ड बायिंग बीहेव्हिएर ऑफ मिडल एजड वूमेन' या विषयावर पी.एच.डी. प्रबंध पूर्ण केला आहे. या संशोधनासाठी डॉ. वाय.एल.गिरी यांचे मार्गदर्शन लाभले.जाधव यांना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी आमदार प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व संचालक यांचे सहकार्य मिळाले. प्रा.डॉ.एल.एस. अडमुठे, डॉ.यु.जे.पाटील उपस्थित होते.

# श्री क्षेत्र जोतिबा डोंगरावर दत्त जयंती उत्साहात साजरी

जोतिबा,ता.४ (वार्ताहर)–

**क्षेत्र जोतिबा डोंगरावर दिगंबरा.. दिगंबरा.. श्रीप्पाद वल्लभ दिगंबरा च्या जयघोषात श्री.दत्त जन्म काळ सोहळा झाला .हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.**

जोतिबा मंदिरात श्री .दत्त जन्मकाळ सोहळ्या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम झाले.गुरुवारी पहाटे ४ वाजता घंटानाद करुन ४ ते ५ वाजता पाद्य पूजा करण्यात आली .५ ते ६ या वेळेत काकड आरती झाली. सकाळी ६ते९ लघु रुद्र अभिषेक करण्यात आला.९ ते१० या वेळेत पोषाख अर्पण करून श्री. दत्त मूर्तीची उत्सव अलंकारीत महापूजा बांधण्यात आली.१० ते १ या वेळेत पुण्य हवन, मातृकापूजन,नवग्रह पूजन,क्षेत्रपाल पूजन, होमहवन झाले . दुपारी २ ते ५ या वेळेत भजन,डवरी गीत झाले.श्रीचे मुख्य पुजारी यांच्या हस्ते सायंकाळी ६ वाजता श्री.दत्त जन्मकाळ सोहळा झाला.पाळणा गीत म्हणण्यात आले. पुष्पवृष्टी करुन हजारो भाविकांनी श्री.दत्त उत्सव मूर्तीचे दर्शन घेतले.या वेळी धैर्यशील तिवले,अजित झूगर, विष्णुपंत दादर्णे, शिवाजीराव सांगळे , जगनाथ दादर्णे, आनंदा लादे तसेच मानाचे गावकर, भाविक,पुजारी उपस्थित होते.

# वारणा विद्यापीठात आजपासून आंतरराष्ट्रीय शिखर परिषद

वारणानगर,ता.४(प्रतिनिधी)–

**वारणा विद्यापीठ, (वारणानगर ता.पन्हाळा) येथे ५ व ६ डिसेंबर २०२५ रोजी भव्य आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सिंथेसिस : शेपींग डायलॉग ॲट द क्रॉसरोडस ऑफ इंडस्ट्री ४.० X ५.० या व्यापक व भविष्यदर्शी विषयावर आधारित ही परिषद उद्योग, शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांना एकत्र आणणारा महत्त्वपूर्ण मंच ठरणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.**

डॉ. शिर्के म्हणाले, या परिषदेची संकल्पना ऑटोमेशन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, डेटा, तंत्रज्ञान, शाश्वतता आणि नैतिक मूल्ये यांच्या परस्पर संबंधावर प्रकाश टाकते. उद्योग व समाजाच्या गरजांमध्ये संतुलन साधत पुढील युगासाठी मार्गदर्शक उपाय तयार करण्याचा हा एक उपक्रम आहे. या दोन दिवसीय परिषदेत शैक्षणिक क्षेत्रातील व उद्योगक्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ, शिक्षक आणि विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

परिषदेसाठी खास जपानहून प्रा. कुनीओ हारा, प्रा. मयुमी ओगाटा, युटो ताकामोरी, सयाका मिऊरा, युको कॉन्डो, चिहिरो निनागावा, केइको आनागुची, अकिहिसा मुकाई आणि योइची अमितानी हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच विशेष सत्रांसाठी अशोक रामचंद्रन (सीईओ, आरईई कॉर्पोरेशन) आणि पुरुषोत्तम कौशिक (हेड,सिफॉरआयआर, इंडिया) यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

या परिषदेच्या आयोजनासाठी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या ग्लोबल शेपर्स कम्युनिटी, कोल्हापूर हबचे फाउंडिंग क्यूरेटर गौरव घेवडे यांनी विशेष योगदान दिल्याचे या परिषदेचे समन्वयक डॉ.किरण पाटील यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेस प्राचार्य डॉ. डी. एन. माने, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. डी. आर. धेडे आणि डॉ. सी. आर. जाधव उपस्थित होते. या शिखर परिषदेच्या आयोजनासाठी श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आम. डॉ. विनय कोरे, कुलाधिकारी एन. एच. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कारजिन्नी यांचे मार्गदर्शन लाभल्याचे विद्यापीठाकडून सांगण्यात आले.



# जल जीवन योजना आर्थिक वर्षात पूर्ण होणार

सैनिक टाकळी,ता.४(प्रतिनिधी)–

**सर्व ग्रामीण घरांना पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या जल जीवन योजनेच्या संदर्भात जवळपास ८०टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम वेळेवर पूर्ण होण्याबाबत कंत्राटदारास मुदत वाढवून देण्यात आली आहे. २०२१ मधील ऑगस्ट महिन्यात ग्राम सभेने या योजनेला मंजुरी दिली.या योजनेचे काम पुढील आर्थिक वर्षात पूर्ण होण्याची शक्यता आहे.**

ऑक्टोबर २२ ला प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर योजनेच्या एकूण खर्चाच्या ४,३४,४९,२०६ रूपयांच्या निधीपैकी पन्नास टक्के केंद्राचा हिस्सा २,१७,२४,२०३ रूपये तर पन्नास टक्के राज्याचा हिस्सा २.,१७,२४,२०३ रुपये इतका निधी मंजूर झाला आहे.ही योजना पूर्ण होण्याची तारीख २२/७/२०२४ ओलांडून गेली असली तरी काम लवकरच पूर्णत्वास येईल अशी अपेक्षा आहे. सध्या पाण्याची टाकी, इंजेक्शन वेल,मेन पाईप लाईन फिल्टर ची कामे पूर्ण झाली आहेत. गावातील पाईप लाईन टाकण्याचे काम पावसाळ्यात बंद ठेवण्यात आले होते. उर्वरित काम निर्धारित वेळेत पूर्ण करणे आव्हानात्मक वाटत आहे. याबाबत ग्रामस्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या योजनेचे यश पायाभूत सुविधा वेळेवर पूर्ण करण्यावर आणि सर्व नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा पुरवण्यावर अवलंबून आहे. या विलंबाबद्दल सरकारी प्रकल्पांसोबत आणि प्रशासकीय आव्हानांवर प्रश्न उपस्थित केला जात आहे.अशा योजनांच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी प्रशासकीय पातळीवर तत्परता अपेक्षित असल्याचा सूर नागरिकांतून उमटत आहे. विलंबामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. ज्यामुळे प्रकल्पाच्या प्रगतीवर परिणाम होण्याची शक्यता असते.

# पैशाला भुलला;सोळा तोळे दागिन्यावर मारला डल्ला

## अल्पवयीन मुलास वाम मार्गास लावले : शिक्षकासह दोघांना अटक

कराड,ता.४ (प्रतिनिधी) –

**विद्यानगर/सैदापूर (कराड) येथील एका शिक्षकाच्या सांगण्यावरून अल्पवयीन मुलाने चोरलेले सोळा तोळे सोन्याचे दागिने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी संबंधित शिक्षकाकडेच ठेवायला दिले. याप्रकरणी कराड शहर पोलिसांनी संबंधित अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतल्यानंतर सर्व प्रकार उघड झाला.**

संशयित आरोपी शिक्षक वैभव सुभाष वाघमारे (वय ३०, रा. विद्यानगर/सैदापूर) याच्यासह अभिजित सुभाष बोरडे (वय ३१, रा. निमसोड, ता. कडेगाव) या दोघांना अटक केली असून, चोरीचे सर्व दागिनेही पोलिसांनी हस्तगत केले आहेत. वैभव वाघमारे हा विद्यानगर/सैदापूर परिसरात खासगी क्लासेस चालवत होता. शिक्षकाने संबंधित मुलाला कमी कष्टात जास्त पैसे मिळू शकतात, असे आमिष दाखवले. त्याला भुलून मुलाने विद्यानगर येथील स्वतःच्या घरातून १६.३३ तोळे सोने चोरी केले. ते सोने त्या मुलाने शिक्षक वाघमारेकडे ठेवायला दिले. चोरीचा हा प्रकार संबंधित कुटूंबीयांच्या उशिरा लक्षात आला. चोरी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी याबाबत कराड शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी अल्पवयीन मुलास चौकशीसाठी ताब्यात घेतले. यावेळी त्याने घडलेली सर्व हकीकत पोलिसांना सांगितली. पोलिसांनी वैभव वाघमारे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता वाघमारे याने अल्पवयीन मुलाने दिलेले दागिने अभिजित बोरडे याच्या मदतीने बोरडे याच्या ढवळेश्वर, (ता. खानापूर) येथील घरी ठेवले असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी संबंधित ठिकाणी जाऊन घरातील लोखंडी कपाटातून आरोपीने ठेवलेल्या बॉक्समधून सोन्याचे गंठण, सोन्याची चेन, नेकलेस, राणी हार पंचासमक्ष जप्त केला.

## युवकास मारहाण

कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी)

मध्यवर्ती बस स्थानकाच्या पाठीमागे विक्रम हायस्कुल समोर सोहम विनोद नांदवडेकर (वय २०रा. मुळ नेसरी ता.गडहिंग्लज,सध्या पाटणकर पार्क,कोल्हापूर) याला बोलावून घेऊन संशयीत प्रणव आंबेकर याने काठीने बेदम मारहाण केली,यामध्ये त्याच्या हाताने बोट फ्रॅक्चर झाले आहे.

# निपाणीत भांडी दुकान फोडून अडीच लाखांचा ऐवज लंपास

## शहरात चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच : पोलिस प्रशासन हतबल

निपाणी.ता.४(प्रतिनिधी)–

**निपाणी शहरात चोरट्यांनी अक्षरक्षः धुमाकूळ घातला असून चोरीच्या घटना ताज्या असतानाच पुन्हा चोरीची घटना घडल्याने नागरीकांसह पोलिस प्रशासन हतबल झाले असल्याचे दिसून येत आहे.येथील बसस्थानकाजवळील हेरवाडे कॉम्प्लेक्स येथे गुरूवारी मध्यरात्री संजय शिवाजी लाखे यांचे ओम गणेश भांडी दुकान फोडून अडीच लाखांचा ऐवज लंपास केला.या घटनेची नोद बसवेश्वर पोलिसात झाली असून अधिकाऱ्यांनी रितसर पंचनामा करून पुढील तपास सुरू ठेवला आहे.**

संजय शिवाजी लाखे यांचे शिवाजीनगर सहावी गल्ली यांचे निपाणी बसस्थानकाशेजारी असलेल्या हेरवाडे कॉम्प्लेक्समध्ये भांडी व स्क्रॅप मालाचे दुकान आहे. नेहमीप्रमाणे बुधवारी रात्री८ वाजता लाखे हे दुकान बंद करून घरी गेले होते.चोरट्यानी दुसऱ्या मजल्यावरील ग्रील वाकवत मजल्यावर प्रवेश करत फ्रेम उचकटून शटर उघडले.त्यानंतर व सदरच्या



दुकानातील गंगावसाठी वापरले जाणारे २५ किलो केस व ८० किलो तांब्याच्या पितळेच्या वस्तू घेऊन परत पाठीमागील बाजूने जात असल्याचे सीसीटीव्हीत दिसत आहे.बाजारभावाप्रमाणे तब्बल तीन लाख रुपयाचा ऐवज घेऊन पोबारा केला.प्राथमिक अंदाजानुसार २५ ते ३० वयोगटातील युवक दिसून येत आहेत.

**चोरीचे सत्र सुरूच**

अष्टविनायक नगर, पंतनगर, बिरोबा माळ, शिवाजीनगर या ठिकाणी सलग ४ चोऱ्या झाल्या असून पुन्हा चोरीची घटना उघडकीस आल्याने नागरीकांसह पोलिस प्रशासन हतबल झाले आहे.

# माजी सैनिकाच्या बंगल्यात चोरी; दोन लाखांचा ऐवज लंपास

निपाणी,ता.४ (प्रतिनिधी) –

**शिवाजीनगर येथील रहिवासी माजी सैनिक मानाजी पाटील हे शनिवारी रात्री एकच्या सुमारास आपल्या कुटुंबासमवेत पंढरपूर येथे गेले होते. चोरट्यांनी हीच संधी साधून बंगल्याच्या पहिल्या गेटवरील कुलूप तोडले. बंगल्याच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.**

यानंतर दोन तिजोऱ्या फोडल्या. त्यातून चांदीच्या समई, वाटी, ब्रेसलेट, मुखवटा असा जवळपास एक किलो चांदीचा ऐवज व तिजोरीतील किंमती साड्या असा जवळपास दोन लाखाचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. चोरट्यांनी बंगल्याच्या मुख्य दरवाजाला स्वतः जवळचे कुलूप घालून निघून गेले. जेणेकरून चोरीची घटना लक्षात येऊ नये अशी त्यांनी खबरदारी घेतली होती.

घटनेची माहिती मिळताच निपाणी शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शिवानंद कार्जोळ, हवालदार मंजुनाथ कल्याणी इत्यादींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. माजी सैनिक मानाजी पाटील यांनी निपाणी शहरात वाढत्या चोरीच्या घटना लक्षात घेऊन त्यांनी जाताना त्यांच्या जवळचे २० तोळे सोन्याचे दागिने आपल्या जवळच्या नातेवाईकांकडे दिले होते. त्यामुळे ते सुरक्षित राहिले. अन्यथा ते देखील चोरट्यांच्या हाती लागला असता. यासंदर्भात निपाणी शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# साकेत दत्त दिंडी,पालखी सोहळा उत्साहात

साके,ता.४( वार्ताहर) –

**दिगंबरा.. दिगबंरा ...श्रीपाद वल्लभ दिगबंरा...च्या गजरामध्ये साके येथे दत्तजयंती उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा झाला. होमहवन अन् भजनामुळे वातावरण भक्तीमय झाले होते.**

श्री दत्त प्रासादिक सोंगी भजनी मंडळ यांच्यातर्फे दत्त जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम,गुरूचरित्र पारायण आयोजित करण्यात आले होते. गुरूवारी सकाळी श्री दत्त मुर्तीस अभिषेक धार्मिक विधीवत पूजन करून सकाळी गावातील मुख्य मार्गावरून दत्त दिंडी सोहळा झाला. यंदा दत्तजयंती गुरूवारी आल्याने भक्तानी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सायंकाळी ६.३० ते ६.४० या प्रदोषकाळात श्री दत्तजन्म सोहळा झाला. दत्त जन्मसोहळ्यात महिलांसह भाविकांनी पाळण्यावर पुष्पवृष्टी करून दत्तगुरुंच्या पादुकांचे दर्शन घेतले. कांही ठिकाणी दत्त जन्मोत्सवानिमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी बाळासो पाटील,अशोक सातुसे,संजय निऊंगरे,पांडूरंग पाटील,विनायक मांगले,निवृती पाटील,दगडू पाटील,नामदेव पाटील,मोहन तुरंबे,प्रकाश पाटील,संजय तुरंबे आदी भक्तगण महिला उपस्थित होत्या.

# डी.वाय.पी.साळोखेनगरमध्ये रविवारी सतेज मॅथ्स स्कॉलर परीक्षा

कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी) –

**येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंगमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी रविवारी ७ डिसेंबर रोजी ''सतेज मॅथ्स स्कॉलर'' परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. यातील गुणवंत विद्यार्थ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश माने यांनी दिली.**

कॅम्पस संचालक डॉ. अभिजित माने म्हणाले, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या संकल्पनेतून बारावी विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी या परीक्षेची सुरुवात केली होती. सध्याच्या संगणक युगात गणित या विषयाला असाधारण महत्त्व आहे. कोल्हापूरसह सांगली, सातारा मधील हजारो विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.या परीक्षेचा निकाल ३१ मे २०२६ रोजी जाहीर होणार आहे. पहिल्या तीन विद्यार्थ्यांना अनुक्रमे २५ हजार, १५ हजार, १० हजार अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात येऊन अथवा ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी संस्थेशी संपर्क साधावा असे आवाहन प्रशासकीय अधिकारी सुयोग पाटील यांनी केले आहे.



दत्त जयंती निमित्त प्रवचन करताना चैतन्यभारती भीमसेन महाराज समोर उपस्थित भाविक. (छाया. गजानन खोत)

# तारदाळमध्ये दत्त जयंती उत्साहात

तारदाळ,ता.४(वार्ताहर) –

**दिगंबरा.. दिगंबरा ..श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या गजरात श्री दत्त जयंतीचा सोहळा भक्तिभावात व उत्साहात झाला.काकड आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. हरिनाम व दत्तमंत्राच्या अखंड जपाने परिसर भक्तिमय झाला होता.**

सायंकाळी दत्त भजनी मंडळ व पांडुरंग भजनी मंडळाचा कार्यक्रम झाला. सहा वाजता श्रींच्या वर भीमसेन महाराज व असंख्य भाविक भक्तांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करण्यात आली. यानंतर सायंकाळी सात ते दहा वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ तारदाळ परिसरातील भाविकांनी घेतला. महिला मंडळ, युवक मंडळ व गावातील ज्येष्ठ नागरिकांनी स्वयंसेवक म्हणून उत्साहाने सहभाग घेतला.

# मसुचीवाडीत श्री दत्त जयंती उत्साहात

वाळवा,ता.४ –

**मसुचीवाडी (ता. वाळवा) येथे श्री दत्त जयंती उत्साहात व भक्तिभावाने झाली. पहाटे ५ ते ६ या वेळेत अभिषेक, महापूजा व सकाळची आरती झाली. दुपारी १२ ते १२.१५ वाजेपर्यंत नैवेद्य व आरती झाली. दुपारी ३.३० ते सायंकाळी ७ या वेळेत भजन व कीर्तन सेवेने वातावरण भक्तिमय झाले.**

सायंकाळी ७ वाजून ३ मिनिटांनी श्री दत्त जन्मोत्सव विधीपूर्वक साजरा झाला. त्यानंतर देव भेट, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमास मसुचीवाडी तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. श्री दत्त सेवेकरी मंडळ व मसुचीवाडी ग्रामस्थातर्फे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

## वायरिंगची चोरी

**कोल्हापूर ता.४(प्रतिनिधी)**

पंचतारांकित औद्योगिक वसाहत गोकुळ शिरगाव येथील क्रोना स्टील डेव्हलपर प्रा.लि. कंपनीमधील इलेक्ट्रीक केबल बंडल,वायर बंडल असा ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केला.

श्रीनिवास विष्णूगौडा पाटील (वय ३५, रा.मुधोळ,जि. बागलकोट, कर्नाटक, सध्या अरळीकट्टी कोल्हापूर) यांनी गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात चोरीची फिर्याद दिली आहे. पोलीस नाईक मांडेकर तपास करीत आहेत.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पन्हाळा यांचे कार्यालय**

मेन रोड, छ. ताराराणी मार्केट इमारत, पहिला मजला, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.फोन ०२३२८-२३५०६०

इमेल -arcs.panhala@gmail.com

| | |
|---|---|
| ११०७३/ जा.क्र. सनिप/कक्ष-२/पत/नियो. श्रध्दा ना.पत कोतोली/जाहिर नोटीस / २०२५ | दि.०५/१२/२०२५ |

**जाहीर नोटीस**

पन्हाळा तालुक्यातील सर्व नागरी / ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना कळविणेत येते की, नियोजित श्रध्दा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर व नियोजित श्री. केदारनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या संस्थेचा नोंदणी प्रस्ताव या कार्यालयास दिनांक २४/११/२०२५ रोजी प्राप्त झाला आहे. नियोजित संस्थेच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या पतसंस्थांची सुनावणी घेवून गुणवत्तेनुसार नोंदणी विषयक निर्णय घेणेबाबतची सुनावणी दि. ०२/१२/२०२५ रोजी ठेवणेत आली होती. तथापी सदर दिवशी शासकिय सुट्टी असलेने पुढील सुनावणी दि.१२/१२/२०२५ रोजी ठेवणेत येत आहे.

**ठिकाण :- पन्हाळा.** सही/-

**दिनांक :-** ०५/१२/२०२५. **(चंद्रकांत मगर)**

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पन्हाळा.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद कोल्हापूर**

**जाहीर संक्षिप्त ई-निविदा सूचना क्र. ६९ सन २०२५-२६**

कोल्हापूर जिल्हा परिषदे अंतर्गत बांधकाम विभागाकडील एकूण १८ कामांची ई-निविदा शासनाच्या "http://mahatenders.gov.in" या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) दिनांक ०३/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून प्रसिध्द करणेत येत आली आहे. निविदा ऑनलाईन सादर करणेचा अंतिम दिनांक १०/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत आहे. सदरच्या कामांची सविस्तर माहिती अटी / शर्तीसह शासनाच्या "http://mahatenders.gov.in" या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) पहावयास मिळेल.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, कोल्हापूर | मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर | अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर |

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (SRM E-Tender) from registered contractors/suppliers on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works under 400kV R.S.Division Talandage.

| Sr. No. | RFX No. | Description of work | Tender Amount in Rs. (Incl. Tax) | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | 7000038326 | Tender for Work of Overhauling & servicing of OLTC of 400/220/33kV 315MVA BHEL ICT-II at 400 KV RS Talandage. | Limited to Rs. 7,09,552.95/- only including all taxes | 7095.53/- |

**Last date for submission of Bids online is up to 19.12.2025 up to 23:59 hrs**

**Note:-** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R. S. Division Talandage**

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**1) E-TENDER NOTICE NO: 2025_DOAWB_1226926_2**

**Supply, Installation and Commissioning of Agricultural Machinery & Implements:**

**Tractor 50 HP 2 WD, Two wheeler Trailor 5 Ton, Power Tiller 18 HP, Two furrow Ridger, Rotavator 6 Ft, Cultivator, Two BottamHydraulip Plough, Rota Ridger, Seed Cum Fertilizer Drill 5 Tines, Straw reaper, Maize Reaper 7 Hp**

**2) E-TENDER NOTICE NO: 2025_DOAWB_1226765_2**

**SUPPLY AND INSTALLATION, COMMISSIONING ,TESTING OF SILAGE BALER AND WRAPPER UNIT 5 TPH & CHAFF CUTTER 5 TPH**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Gaurinandan Farmer Producer Company Ltd. Hasurchampu Tal- Gadhinglaj Dist- Kolhapur** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **19/12/2025 up to 3.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist. Kolhapur**

दैनिक
महासत्ता
शुक्रवार, ता. ५ डिसेंबर २०२५





# जुना बुधवार – उत्तरेश्वरची विजयी सुरुवात

## प्रतिस्पर्धी संघांवर मात : तीन गुणांची कमाई



कोल्हापूर, ता.४ (प्रतिनिधी)–

**शाहू छत्रपती केएसए फुटबॉल लीग स्पर्धेत गुरुवारी झालेल्या सामन्यात संयुक्त जुना बुधवार पेठने दिलबहार तालीम मंडळवर २–० ने विजय मिळवला. तसेच उत्तरेश्वर प्रासादिक वाघाची तालीम मंडळने पाटाकडील तालीम मंडळ (ब)वर २–० ने विजय प्राप्त केला. पहिल्याच सामन्यात दोन्ही संघांनी विजयी सुरुवात करून तीन गुणांची कमाई केली.**

छत्रपती शाहू स्टेडियमवर दुपारच्या सत्रात जुना बुधवार आणि दिलबहार संघादरम्यान सामना झाला. सामना सुरु झाल्यावर चौथ्या मिनिटाला प्रथमेश जाधवने गोल नोंदवून जुना बुधवारला आघाडी मिळवून दिली. चढाईतील सातत्य कायम राखत जुना बुधवारने २३व्या मिनिटाला आणखी एक गोल नोंदवून आघाडी २–० अशी केली. रविराज भोसलेने दिलेल्या पासवर प्रथमेश जाधवने वैयक्तिक तसेच संघाचा दुसरा गोल नोंदवला. आघाडी कमी करण्यासाठी दिलबहारच्या प्रथम भोसले, निक्सन, स्वयंम साळोखे, सार्थक मगदूम यांनी केलेल्या चढाया फिनिशिंगअभावी वाया गेल्या. उत्तरार्धात गोलची आघाडी वाढवण्यासाठी जुना बुधवारकडून रविराज भोसले, शुभम जाधव, थुलूंगा, नोन्गान्बा सिंग, प्रथमेश जाधव यांनी खोलवर चाली रचल्या पण त्यांना यश मिळाले नाही. दिलबहारच्या प्रथम भोसले, स्वयंम साळोखे, निक्सन, फेबीन यांनी अखेरपर्यंत गोलसाठी प्रयत्न केले पण समन्वयाचा अभाव आणि दिशाहीन फटके यामुळे ते अपयशी ठरले. अखेर पूर्णवेळेत २–०ची आघाडी कायम राखून जुना बुधवारने विजयावर शिक्कामोर्तब केले.

दुपारच्या सत्रातील पहिल्या सामन्यात उत्तरेश्वरने पूर्वार्धात मिळालेल्या आघाडीच्या जोरावर २–०ने विजय संपादन केला. श्रीकांत माने याने ३३व्या मिनिटाला पहिला गोल केला. त्यानंतर जादावेळेत अथर्व पाटीलने गोल करून आघाडी २–० अशी वाढवली. उर्वरित वेळेत पाटाकडील (ब) ला गोलची आघाडी कमी करता आली नाही. त्यांच्या सार्थक राऊत, गौरव माळी, गुरुराज काटकर, ओमकार देवणे यांनी केलेल्या चढाया व्यर्थ ठरल्या. पूर्वार्धातील २–० गोलची आघाडी कायम राखत उत्तरेश्वरने विजय मिळवला.

**आजचे सामने : संध्यामठ – सुभाषनगर : दुपारी १:३० वाजता, पीटीएम (अ) – बालगोपाल दुपारी ४ वाजता.**

**दोघांना रेडकार्ड**

उत्तरेश्वर आणि पाटाकडील (ब) सामन्यात उत्तरार्धात ४७व्या मिनिटाला हाणामारी केल्याबद्दल रेडकार्ड दाखविण्यात आले. उत्तरेश्वरचा खेळाडू अर्थव मोरे आणि पाटाकडील (ब) च्या रोहित देवणे यांना मुख्यपंचानी थेट रेडकार्ड दाखवून मैदानाबाहेर घालवले. स्पर्धेतील हे पहिलेच रेडकार्ड आहे.

# रो–को ला डिवचणाऱ्यांना रवी शास्त्रींचा इशारा

## रोहित–कोहलीने निर्णय घेतल्यास आजुबाजूचे गायब होतील

मुंबई,ता.४–

**भारताचे माजी क्रिकेटपटू आणि माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी विराट कोहली आणि रोहित शर्माची बाजू घेत त्यांच्या भवितव्याबाबत वावड्या उठवणाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला आहे. आगामी २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी भारताचा संघ कसा असेल आणि त्यात या दोन वरिष्ठ खेळाडूंचे स्थान असेल का? यावरून गेले काही दिवस बरीच उलटसुलट चर्चा सुरू आहे. या चर्चांवर बोलत असताना रवी शास्त्री यांनी संताप व्यक्त केला.**

एका मुलाखतीत रवी शास्त्री यांनी दोन्ही ज्येष्ठ खेळाडूंना बाजूला करणे योग्य नसल्याचे म्हटले. कसोटी आणि टी २० क्रिकेटमधून कोहली आणि रोहितने निवृत्ती घेतल्यानंतर दोन्ही खेळाडूंच्या क्षमतांवर शंका घेणाऱ्यांना रवी शास्त्री यांनी सुनावले.

रवी शास्त्री म्हणाले, विराट कोहली आणि रोहित शर्मा हे दोघेही एकदिवसीय क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू आहेत. तुम्ही अशा गुणवंत खेळाडूंशी गैरव्यवहार करू शकत नाही.यावर त्यांनी कुणाचेही नाव घेतले नाही.रवी शास्त्री म्हणाले, काही लोक असा प्रयत्न करत आहेत. म्हणून मी असे म्हणालो. जर या दोघांनी आपला रोख बदलला आणि योग्य ती कळ दाबली तर जे त्यांच्याबाबत कुचाळक्या करत आहेत, ते कुठच्या कुठे फेकले जातील, असेही ते म्हणाले.

# लियाम लिव्हिंगस्टनची बॅट तळपली

## एकाच षटकात खेचले ५ गगनचुंबी षटकार

अबूधाबी,ता.४–

**अबूधाबीत सध्या आएएल टी–२० लीग २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत अबूधाबी नाईट रायडर्स संघाने शारजाह वॉरियर्स संघावर ३९ धावांनी दमदार विजयाची नोंद केली. अबूधाबी नाईट रायडर्स संघाकडून इंग्लंडचा स्फोटक फलंदाज लियाम लिव्हिंगस्टनची बॅट चांगलीच तळपली. या सामन्यात फलंदाजी करताना त्याने एकाच डावात ३३ धावा वसूल केल्या. यादरम्यान एकाच षटकात त्याने ५ गगनचुंबी षटकार मारले.**



अबूधाबी नाईट रायडर्सचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. प्रथम फलंदाजी करताना या संघातील फलंदाजांनी २३३ धावांचा डोंगर उभारला. या संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या ॲलेक्स हेल्साला हवी तशी सुरूवात करून देता आली नाही. हेल्स अवघ्या ३२ तर अलिशान शराफू देखील अवघ्या ३४ धावा करत माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या लियाम लिव्हिंगस्टन आणि शेरफेन रुदरफोर्डने महत्वपूर्ण भागीदारी केली. दोन्ही फलंदाजांनी विरोधी संघातील गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. लियाम लिव्हिंगस्टनने या डावात फलंदाजी करताना ३८ चेंडूत ८२ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने ८ षटकार खेचले.

या सामन्यात पहिल्या डावातील शेवटचे षटक टाकण्यासाठी ड्वेन प्रीटोरियस गोलंदाजीला आला. या षटकात लियाम लिव्हिंगस्टनने षटकारांचा पाऊस पाडला. या षटकातील पहिलाच चेंडू त्याने सीमारेषेपार पाठवला. त्यानंतर गोलंदाजाने एक वाईड चेंडू टाकला. लियाम लिव्हिंगस्टनने २ धावा धावून पूर्ण केल्या आणि त्यानंतर ४ षटकार मारले. ५ षटकारांसह त्याने या षटकात ३३ धावा वसूल केल्या. या दमदार खेळीच्या बळावर अबूधाबी नाईट रायडर्स संघाने २३३ धावांचा डोंगर उभा केला.

शारजाह वॉरियर्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी २३४ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना शारजाह वॉरियर्स संघाकडून टीम डेव्हिडने दमदार अर्धशतकी खेळी केली. तर गोलंदाजीत ३३ धावा खर्च करणाऱ्या ड्वेन प्रिटोरियसने फलंदाजीत पूर्ण जोर लावला. यादरम्यान त्याने ३९ धावांचे योगदान दिले. या दोन्ही फलंदाजांना वगळले. तर इतर कुठल्याही फलंदाजाला हवी तशी कामगिरी करता आली नाही. शारजाह वॉरियर्स संघाला २० षटकांअखेर १९४ धावांपर्यंत मजत मारता आली.

# जो रूटचे ऑस्ट्रेलियात पहिले कसोटी शतक

ब्रिसबेन,ता.४–

**ऑस्ट्रेलिया – इंग्लंड यांच्यातील ॲशेस मालिकेच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडला सुरूवातीलाच मोठे धक्के बसले. पण जो रूटने आपला अनुभव पणाला लावून एक बाजू धरून ठेवली. दरम्यान त्याने १८१ चेंडूंचा सामना करत ऑस्ट्रेलियात खेळताना पहिले शतक झळकावले आहे. यासह त्याच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.**

जो रूट याच्या कसोटी कारकिर्दीतील हे ४० वे शतक आहे. पण मुख्य बाब म्हणजे त्याला ऑस्ट्रेलियात खेळताना एकही शतकी खेळी करता आली नव्हती. गेल्या कित्येक वर्षांपासून तो ऑस्ट्रेलियात कसोटी क्रिकेट खेळताना शतक झळकावण्याच्या प्रतिक्षेत होता. अखेर ब्रिसबेनच्या मैदानावर त्याने ऑस्ट्रेलियात शतकाचे खाते उघडले आहे. २०२१–२२ मध्ये झालेल्या ब्रिसबेन कसोटीत तो ८९ धावांवर माघारी परतला होता. त्याआधी २०१३–१४ मध्ये झालेल्या ॲडिलेड कसोटीत तो ८७ धावांवर माघारी परतला होता. २०१७–१८ मध्ये झालेल्या सिडनी कसोटीत तो ८३ धावांवर माघारी परतला होता. जो रूटला ऑस्ट्रेलियात शतक झळकावण्यासाठी १२ वर्ष आणि ३० डाव वाट पाहावी लागली आहे.या शतकी खेळीसह जो रूटने श्रीलंकेच्या कुमार संगकाराला मागे टाकले आहे. फलंदाजांच्या यादीत रूट चौथ्या स्थानी पोहोचला आहे.

# रोहित शर्मा टी–२० क्रिकेटमध्ये परतणार ?

मुंबई,ता.४–

**भारतीय संघाचा स्टार फलंदाज रोहित शर्मा सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील बाद फेरीतील सामन्यांमध्ये मुंबईकडून खेळताना दिसू शकतो.**



सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील बाद फेरीतील सामने १२ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत पार पडणार आहेत. सध्या रोहित भारतीय वनडे संघाचा भाग आहे. या मालिकेतील तिसरा वनडे येत्या ६ डिसेंबरला रंगणार आहे. त्यानंतर टी–२० मालिकेला सुरूवात होणार आहे. टी–२० संघाचा भाग नसल्यामुळे रोहितला मोठा ब्रेक मिळणार आहे. त्यामुळे त्याने मुंबईसाठी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेतील बाद फेरीतील सामने खेळण्याची इच्छा व्यक्त केली असल्याचे म्हटले जात आहे. हे सामने इंदुरमध्ये खेळवले जाणार आहेत.

शार्दुल ठाकूरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या मुंबईने या स्पर्धेत आतापर्यंत दमदार कामगिरी केली आहे. साखळी फेरीतील सर्व सामने जिंकून मुंबईचा संघ एलिट ग्रुप ए मध्ये १६ गुणांसह अव्वल स्थानी आहे. त्यामुळे मुंबईचा संघ बाद फेरीत प्रवेश करणार, हे जवळजवळ निश्चित आहे.

# दिगंबरा.. दिगबंरा..च्या गजरात औदुंबरला श्री दत्त जयंती उत्साहात

भिलवडी,ता.४ (वार्ताहर)–

**दिगंबरा.. दिगबंरा.. श्रीपाद वल्लभ दिगबंरा..च्या गजरामध्ये श्री क्षेत्र औदुबंर येथे सायंकाळी ५.३० वाजता दत्त जन्मकाळ झाला. यावेळी मंदिर परिसरामध्ये भाविकांची अलोट गर्दी उसळली. दत्त जयंतीनिमित्त महाराष्ट्रभरातून अनेक भाविक श्री क्षेत्र औदुबंर येथे दाखल झाले होते. पहाटे ५ वाजल्यापासून दत्त मंदिरामध्ये गर्दी झाली होती.**



**औदुंबर येथे श्री दत्त जयंती निमित्त दर्शनासाठी झालेली भाविकांची अलोट गर्दी. ( छाया : घन:शाम मोरे, भिलवडी)**

दिवसभरामध्ये भाविकानी श्री दत्तगुरूंच्या विमल पादुकांचे दर्शन घेतले. रात्री ११ वाजेपर्यंत भाविकांची गर्दी होती. औदुंबरमध्ये येणारे चारही रस्ते गर्दीनी फुलून गेले होते. औदुबंर फाटा या ठिकाणी व औदुबंरला येणारे दोन्ही रस्ते वाहतुकीसाठी बंद केल्याने तसेच रस्ता रुंदीकरण झाल्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली नाही. या मार्गावरील ऊस वाहतूक रात्री १२ पर्यंत बंद केली होती.

पहाटे ५ ते ६. ३० पर्यंत काकड आरती, मंगल आरती दुपारी १२ वा महापूजा, नैवेद्य, महाआरती, दुपारी महाआरतीनंतर श्री दत्त सेवाभावी मंडळातर्फे महाप्रसादाचे आयोजन केले होते. याचा २० हजारहुन अधिक भाविकांनी लाभ घेतला. श्री दत्त जन्माचे कीर्तन असे धार्मिक कार्यक्रम मंदिरामध्ये झाले. ५.३० वाजता श्री दत्त जन्मकाळ व आरती, रात्री १० ते १२ या वेळेत महापूजा करण्यात आली.देवस्थान समितीतर्फे दर्शन रांगा करण्यात आल्या होत्या. त्यामुळे दर्शन सुव्यवस्थितपणे होत होते.

अंकलखोप ग्रांमपंचायतीतर्फे पिण्याचे पाणी व वीज पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली होती. देवस्थानचे अध्यक्ष संतोष पाटील, उपाध्यक्ष इंद्रजीत सुर्यवंशी, धनंजय सुर्यवंशी, अमर पाटील, अमोल सुर्यवंशी, सर्व पदाधिकारी यांनी व्यवस्था केली होती. भिलवडी पोलिस ठाण्याचे पीआय भगवान पालवे यांच्यासह ७ पोलिस अधिकारी, ११८ पोलिस कर्मचारी, वाहतूक शाखेचे ४० कर्मचारी तैनात होते.

आ.डॉ.विश्वजीत कदम,पोलिस अधीक्षक संदिप घुगे,माजी जि.प.अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख यांनी सपत्निक पहाटे पाच वाजता काकड आरतीस उपस्थित राहुन दर्शन घेतले. माजी आ. पृथ्वीराज देशमुख, माजी खा. संजयकाका पाटील, तहसिलदार दिप्ती रिठे, तासगांव उपविभागीय पोलीस अधीक्षक अशोक भवर यांच्यासह अनेकांनी दर्शन घेतले.

# सर्व मानवांचे कल्याण व्हावे हा परमाब्धिचा स्वभाव

## प.पू. परमात्मराज महाराज

कोगनोळी,ता.४ (प्रतिनिधी) –

**परमाब्धि स्वप्न दाखवीत नाही, तर तुम्ही जे स्वप्न बघत असता ते स्वप्न साकारण्यासाठी प्रयत्न करण्यास सुचवितो. तो भाविकांच्या मनात आनंदी विचारांची सभा भरवतो आणि विषादाला दूर करतो. सर्व मानवांचे चांगले व्हावे असे चिंतन करतो, हा परमाब्धिचा स्वभाव आहे. म्हणून पूर्ण विश्वासाने परमाब्धिचा स्वीकार केल्यास निश्चितच कल्याण होईल, असे प्रतिपादन प.पू. परमात्मराज महाराज यांनी केले. ते आडी (ता. निपाणी) येथील संजीवनगिरीवरील श्री दत्त देवस्थान मठाच्या वतीने दत्त जयंती निमित्त आयोजित परमाब्धिविचार महोत्सवाच्या आठव्या दिवशीच्या प्रवचनात बोलत होते.**



**आडी : परमाब्धिविचार महोत्सवात बोलताना प.पू. परमात्मराज महाराज.**

नामजपानंतर आयोजित परमाब्धि विचार प्रवचनात परमाब्धिचा स्वभाव याविषयी प.पू. परमात्मराज महाराज पुढे म्हणाले, इथे होणारे विकास कार्य सर्वसामान्य माणसांच्या भक्तीच्या जीवावर चालू आहे. जनतेचा विश्वास हीच मोठी पुंजी आहे. परमाब्धीचा स्वभाव जनतेमध्ये सुधारणा करण्याचा, परिवर्तन करण्याचा आहे. आत्मतत्व हेएकच तत्व आहे, हे समजावून सांगणारा परमाब्धिचा स्वभाव आहे.

संप्रदाय रूपी नद्यांना परमाब्धिने आपल्यात सामावून घेतले आहे. एकच समुद्ररूपी धर्म आहे. हजारो संप्रदायरूपी नद्यांचे गंतव्य स्थान समुद्रच आहे. आध्यात्मिक आणि व्यावहारिक जीवनातील स्वप्न वास्तवात उतरवण्यासाठी योग्य दिशा दाखविण्यारा परमाब्धि आहे. दोष दुसऱ्यावर ढकलणे हा कोणत्याही माणसाचा स्वभाव आहे. परंतु परमाब्धि हा मनुष्यांना सांगतो की दोष, उणीवा दुसऱ्यांवर ढकलू नका. परमाब्धिची भाषा ही मोजक्या शब्दांमध्ये मत मांडणारी भाषा आहे. सूत्रबद्धता हा परमाब्धिचा स्वभाव आहे.वेद,उपनिषदे इत्यादी सर्वांचा सारांश परमाब्धित आहे. मतभेद सोडून आवश्यक सत्यज्ञान परमाब्धिमध्ये आणि आपल्या अन्य ग्रंथांमध्ये आहे.सर्वांना मिसळून घेणारा स्वभाव या ग्रंथाचा आहे. जोपर्यंत आत्मतत्त्व आहे तोपर्यंत शरीराला किंमत आहे. आत्म स्वभावाचे महत्त्व आहे. माणसाने आत्मभावात रममाण राहावे. परमाब्धि आणि आपले अन्य वाङ्मय यातील ज्ञान खुले आहे. अध्यात्म समजून घेण्यासाठी परमाब्धिवर पूर्ण विश्वास ठेवा,असे प.पू. परमात्मराज महाराज यांनी सांगितले.

यावेळी आडी, बेनाडी, कोगनोळी, हणबरवाडी, निपाणी, कागल आदी गावातील व बेळगांव, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, मुंबई, छ.संभाजीनगर इ.अनेक जिल्ह्यातील भाविकांनी गर्दी केली होती. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा राज्यातून आलेल्या असंख्य भाविकांनी प्रवचन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

# माजी आ. दिनकरराव जाधव यांचा पुण्यस्मरण दिन विविध उपक्रमांनी साजरा

गारगोटी, ता.४ (प्रतिनिधी) –

**भुदरगड –राधानगरीचे माजी आमदार स्व. दिनकरराव जाधव यांचा प्रथम पुण्य स्मरण दिन विविध उपक्रमांनी साजरा झाला. यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेतर्फे त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटूबियांना स्मृतीपत्र अर्पण करण्यात आले.**



**माजी आ. स्व.दिनकरराव जाधव यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनी स्मृतिपत्र देतांना तहसीलदार डॉ.अर्चना पाटील, आ. सतेज पाटील, के. पी. पाटील, सत्यजित जाधव व विश्वजित जाधव.**

तिरवडे (ता. भुदरगड ) येथे त्यांच्या गावी स्व. जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन व दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी मंत्री आ. सतेज पाटील यांच्या हस्ते माजी आ. के. पी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

महाराष्ट्र विधान परिषदेतर्फे शासनाच्या प्रतिनिधी भुदरगडच्या तहसीलदार डॉ.अर्चना पाटील यांनी स्व. जाधव यांचे पुत्र सत्यजित जाधव व विश्वजित जाधव यांच्याकडे स्मृतिपत्र दिले.स्वागत बिद्री कारखान्याचे संचालक सत्यजित जाधव यांनी केले. यावेळी माजी आ. बजरंग देसाई,संजयबाबा घाटगे, बिद्री साखर कारखान्याचे संचालक राहुल देसाई, मधुकर देसाई,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील, गोकुळ दूध संघांचे माजी अध्यक्ष अरुण डोंगळे, अभिजित तायशेटे,चैतन्य महाराज, युवराज पाटील, जिल्हा बँकेचे संचालक ए.वाय. पाटील, कॉग्रेसचे तालुकाध्यक्ष शामराव देसाई, गारगोटीचे सरपंच प्रकाश वास्कर, माजी सरपंच राजू काझी,राजू भाटले, प्रविणसिंह पाटील,भाजपचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील, शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रकाश पाटील यांच्यासह भुदरगड, राधानगरी आणि कागल तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

या निमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धा झाली. त्यामध्ये खुल्या गटात अभिषेक देवकाते (कोल्हापूर) यांनी प्रथम,अनिकेत शिणगारे (कोल्हापूर ) यांनी द्वितीय तर व्यंकटेश वसंत शेंडे (निगवे, ता. करवीर )यांनी तृतीय तर धनाजी गुरखे (कोल्हापूर) व प्रतिक कलोळे (गडहिंग्लज) यांना अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांकाचे उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. लहान गटात संस्कार गुरव (ममदापूर), राजवर्धन पाटील (रा. डेळे), आयान काझी (तिरवडे) यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळविले, तर प्रथमेश कांबळे (गडहिंग्लज ) व श्लोक पाटील (देऊळवाडी) यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमांचे नियोजन दिलीप गुरव, इंजि. अमर मोरे, नंदकुमार जाधव, श्रीकांत वेतूर्लेकर व कार्यकर्त्यांनी केले.